CMYK



## विचारपुष्प

स्वार्थ प्रत्येकालाच असतो. स्वार्थाशिवाय मनुष्य शोधून सापडणार नाही. परंतु या स्वार्थाचे स्वरूप विकसित होऊन तो समाजहिताला पोषक, उदात्त स्वार्थ झाल्याशिवाय मनुष्यजीवनाचे सार्थक होणार नाही. स्व-हिताचे पोषण करणारी क्षुधा उन्नत होऊन ती समाजजीवन सर्वांगपरिपूर्ण करण्यास तत्पर करणारी 'क्षुधा' बनली पाहिजे.
- एकनाथ रानडे रा. स्व. संघाचे पूर्व सरकार्यवाह

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

**आजचा सामना** (TATA IPL)
राजस्थान वि. बेंगलोर
वेळ : सायं.७.३० वाजता
ठिकाण : गुवाहाटी

सोलापूर | शुक्रवार, १० एप्रिल २०२६ | युगाब्द ५१२८ | वर्ष ४२ वे अंक १३२ | पाने १२ | किंमत रु. ८/-

|RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O.|
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com




# मध्यपूर्वेत युद्ध की बुद्ध?

## ● इस्लामाबादेतील शांतता चर्चेकडे जगाचे लक्ष
## ● अमेरिका-इराणकडून स्फोटक विधाने

**◆ तेहरान-वॉशिंग्टन, ९ एप्रिल**



३९ दिवसांच्या भीषण युद्धानंतर अमेरिका आणि इराण यांनी दोन आठवड्यांच्या युद्धविरामावर सहमती दर्शविली आणि शुक्रवारी पाकिस्तानची राजधानी इस्लामाबादमध्ये शांतता चर्चा करण्याचे ठरविले. मात्र, इस्त्रायलने गुरूवारी पहाटे लेबनॉनवर भीषण हल्ले करीत २५० पेक्षा जास्त नागरिकांना ठार केले. यामुळे संतप्त झालेल्या इराणने शस्त्रसंधीच्या तीन अटींचे उल्लंघन केल्याचा आरोप अमेरिकेवर केला आणि चर्चा करणे व्यर्थ असल्याचे म्हटले आहे. दुसरीकडे करार होईपर्यंत पश्चिम आशियातून सैन्य माघार घेणार नाही;वाटाघाटी फिस्कटल्यास पुन्हा हल्ले चढविणार, असा इशारा डोनाल्ड ट्रम्प यांनी दिला. तथापि, चर्चेत सहभागी होण्यास दोन्ही देशांनी तयारी दर्शविली असल्याने इस्लामाबादमध्ये होणाऱ्या शांतता चर्चेकडे जगाचे लक्ष लागले आहे.

अमेरिकेने शस्त्रसंधीच्या तीन महत्त्वाच्या अटींचे उल्लंघन केल्याचा आरोप इराणने केला आहे. अमेरिकेने पुन्हा एकदा विश्वासार्हता गमावली असून आता चर्चा करणे व्यर्थ असेल. लेबनॉनवरील हल्ला अटींचे उल्लंघन आहे, असा आरोप इराणच्या संसदेचे अध्यक्ष मोहम्मद बाकेर गालिबाफ यांनी केला आहे. गालिबाफ यांनी समाज माध्यमावरील पोस्टमध्ये म्हटले की, शस्त्रसंधीची पहिली अट लेबनानमध्ये शांतता प्रस्थापित करण्याची होती. मात्र, अमेरिकेचा मित्रदेश इस्रायल तिथे सातत्याने हल्ले करत आहे. लेबनानमध्ये रक्तपात सुरू असताना शस्त्रसंधी होऊ शकत नाही. दुसरी अट इराणच्या हवाई हद्दीचा आदर करण्याची होती. मात्र, इराणच्या फार्स प्रांतातील लार शहरात घुसखोरी करणारा अमेरिकन ड्रोन आढळला, जो इराणने पाडला आहे. तिसऱ्या अटीनुसार, इराणच्या युरेनियम संवर्धनाच्या अधिकाराला मान्यता मिळणार होती. मात्र, आता अमेरिका या अधिकाराला नकार देत असल्याचे त्यांनी सांगितले.

इराणचे उपपरराष्ट्र मंत्री सईद खातिबजादेह यांनीही जोपर्यंत लेबनॉन सुरक्षित नाही, तोपर्यंत शस्त्रसंधीवर स्वाक्षरी करणे अशक्य असल्याचे ठामपणे सांगितले आहे. ◂(वृत्तसंस्था)

### चर्चेसाठी पाकिस्तानला जाणार



» दोन आठवड्यांच्या संघर्षविरामानंतरही लेबनॉनवरील हल्ल्यामुळे इराण-अमेरिकेत तणाव कायम असताना शनिवारी पाकिस्तानात होणाऱ्या शांतता चर्चेत सहभागी होणार असल्याचे इराणचे उपपरराष्ट्र मंत्री, सईद खतीबजादेह सांगितले. इराणचे संसद अध्यक्ष मोहम्मद बागेर गालिबाफ शिष्टमंडळाचे नेतृत्व करतील. लेबनॉनला वगळून संघर्षविराम होवू शकत नाही. लेबनॉनचा समावेश ही केवळ इराणची मागणी नाही, तर ती एक सामूहिक जबाबदारी असल्याचे वृत्तसंस्थेशी बोलताना खतीबजादेह म्हणाले. ■

### अमेरिकेचे शिष्टमंडळ पाकिस्तानला जाणार



» दोन आठवड्यांचा संघर्षविराम करार काही प्रमाणात पाळला जात असल्याचे दिसून येत असून, गुरुवारी संपूर्ण प्रदेशात हल्ल्यांच्या घटनांचे प्रमाण कमी झाले. चर्चेसाठी अमेरिकेचे एक शिष्टमंडळ पाकिस्तानला जाणार असून, या चर्चेची सुरुवात शनिवारी होईल.संघर्षविरामाच्या घोषणेनंतर होर्मुझच्या सामुद्रीधुनीतून केवळ मोजक्याच जहाजांना जाण्याची परवानगी देण्यात आली. इस्रायलने लेबनॉनवर केलेल्या हल्ल्यांनतर येथून होणारी जलवाहतूक थांबवली. हा हल्ला शस्त्रसंधीचे उल्लंघन असल्याचा दावा इराणच्या इस्लामिक रिव्हॉल्युशनरी गार्ड कॉर्प्सने केला आहे. इराणसोबत करार होईपर्यंत अमेरिकी सैन्य त्यांच्या जागेवरच कायम राहील, असे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी स्पष्ट केले. ■

### जागतिक गुंतवणुकीत भारतच सर्वोच्च

**लंडन, दि.९ एप्रिल**

भारत जागतिक गुंतवणूकदारांसाठी सर्वात आकर्षक बाजारपेठ म्हणून उदयास येत असून, एकूण जागतिक गुंतवणुकीत भारतच सर्वोच्च स्थानी आहे. गुंतवणूकदारांचा भारतावर विश्वास वाढला आहे. आशिया-पॅसिफिक क्षेत्रात भारत सर्वाधिक गुंतवणूकदारांच्या पसंतीचे ठिकाण ठरले असल्याची माहिती ब्रिटनची वित्तीय संस्था मॅकिन्सेच्या अहवालात समोर आली आहे.

आशिया, पॅसिफिकमधील ५० हून अधिक गुंतवणूकदारांपैकी ३१ टक्के गुंतवणूकदारांनी भारताला सर्वोच्च पसंती दिली. तर ७६ टक्के गुंतवणूकदारांनी भारताला त्यांच्या पहिल्या तीन पसंतींमध्ये स्थान दिले आहे. भू-राजकीय आणि आर्थिक दबाव असूनही, भारत गुंतवणूकदारांच्या विश्वासास पात्र ठरल्याचे अहवालात नमूद आहे.

# हिजबुल्लाहचा मोठा नेता ठार




**◆ बैरूत, ९ एप्रिल**

लेबनॉनमध्ये केलेल्या हल्ल्यात हिजबुल्लाहचा प्रमुख नईम कासिमचा सचिव आणि सल्लागार ठार झाला, असा दावा इस्रायली सैन्याने गुरुवारी केला. अली युसुफ हार्शी, असे या सचिवाचे नाव असून तो कासिमचा पुतण्याही होता. इमारतींवर झालेल्या हल्ल्यात २५४ पेक्षा जास्त नागरिक ठार तर शेकडो नागरिक जखमी झाले आहेत.

इराण समर्थित दहशतवादी गट हिजबुल्लाहने अमेरिका-इराण संघर्षविरामाच्या कथित उल्लंघनाला प्रत्युत्तर म्हणून इस्रायलच्या दिशेने रॉकेट डागल्याचे सांगितले होते. लेबनॉनमध्ये होत असलेल्या इस्रायलच्या हल्ल्यांना प्रत्युत्तर देण्याचा आम्हाला अधिकार असल्याचे हिजबुल्लाहने सांगितले. संघर्षविरामाच्या उल्लंघनाला प्रत्युत्तर म्हणून गुरुवारी पहाटे इस्रायली



अली हार्शी

किबुत्झ असलेल्या मनारा येथे रॉकेटचा वर्षाव करण्यात आला, असा दावा हिजबुल्लाहने केला.

एकाच दिवशी झालेल्या हल्ल्यांमध्ये २५४ पेक्षा जास्त बळी गेल्यामुळे आणि ११६५ पेक्षा जास्त लोक जखमी झाल्यामुळे लेबनॉनने एक दिवसाचा राष्ट्रीय शोक जाहीर केला आहे. इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू यांनी म्हटले की, लेबनॉन हा अमेरिका आणि इराण यांच्यातील युद्धविरामाचा भाग नाही. अमेरिकेचे उपराष्ट्राध्यक्ष जे. डी. व्हान्स यांनीही याच भूमिकेचा पुनरुच्चार केला. आम्ही तसे कोणतेही वचन कधीच दिले नव्हते, असे त्यांनी सांगितले.

### दहा मिनिटांत १०० हल्ले

**» इस्रायलच्या लष्कराने दहा मिनिटांच्या कालावधीत १०० पेक्षा जास्त हवाई हल्ले केल्यानंतर बैरूत आणि संपूर्ण लेबनॉनमधील रुग्णालये शेकडो जखमींवरील उपचाराबाबत हतबल ठरले. या हल्ल्यांमध्ये किमान २५४ जणांचा मृत्यू झाला असून, ११०० पेक्षा जास्त जखमी झाले, अशी माहिती नागरी संरक्षण विभागाने दिली.** ■

अटी स्पष्ट असून, वॉशिंग्टनला शस्त्रसंधी किंवा इस्रायलमार्फत सुरू असलेले युद्ध यापैकी एकाची निवड करावी लागेल, असा इशारा अराघची यांनी दिला. ◂(वृत्तसंस्था)

# तिन्ही राज्यांत बंपर मतदान

## पुडुचेरीत ९० आसाम ८५ केरळ ७७ टक्के

**◆ नवी दिल्ली, ९ एप्रिल**

आसाम, केरळ आणि पुडुचेरी या केंद्रशासित प्रदेशातील विधानसभा निवडणुकीसाठीचे मतदान गुरुवारी सायंकाळी ६ वाजेपर्यंत पार पडले. निवडणूक आयोगाच्या माहितीनुसार, आसाममध्ये रात्री आठ वाजेपर्यंत ८५.३५ टक्के मतदान झाले. आसामच्या इतिहासातील हे सर्वाधिक मतदान आहे.केरळम्मध्ये ४९ वर्षांतील दुसऱ्या क्रमांकाचे सर्वाधिक मतदान ७७.९७ टक्के नोंदवले गेले. पुडुचेरीमध्ये ८९.७८ टक्के मतदान झाले.



दारंग जिल्ह्यात ब्रह्मपुत्रा नदी ओलांडून मतदानासाठी जाताना नागरिक

आसाममध्ये निवडणुकीशी संबंधित हिंसाचारात सुमारे ३० जण जखमी झाले आणि सात जणांना अटक करण्यात आली. श्रीभूमी जिल्ह्यातील पाथरकांडी येथे काँग्रेस आणि भाजपा समर्थकांमध्ये झालेल्या संघर्षात सुमारे २५ जण जखमी झाले, त्यापैकी दोघे गंभीर आहेत.

पुडुचेरीत, मन्नादिपेट येथील एका मतदान केंद्रावर काँग्रेस आणि भाजपा समर्थकांमध्ये संघर्ष झाला. पोलिसांनी जमावावर लाठीचार्ज केला. ◂(वृत्तसंस्था)

### तेजीला लगाम

**मुंबई :** भारतीय शेअर बाजारात सलग पाच दिवस सुरू असलेल्या तेजीला गुरुवारी ब्रेक लागला. बुधवारी झालेल्या मोठ्या वाढीनंतर गुरुवारी बाजार दबावाखाली राहिला. प्रामुख्याने वित्तीय आणि बँकिंग क्षेत्रातील समभागांमध्ये झालेल्या विक्रीमुळे निफ्टी-५० निर्देशांक २३,७०० च्या पातळीपर्यंत खाली आला आणि अखेर २३,८०० च्या खाली स्थिरावला.

मध्यपूर्वेतील वाढता तणाव आणि कच्च्या तेलाच्या वाढत्या किमतींमुळे आशियाई बाजारात कमकुवत वातावरण होते. याचा परिणाम भारतीय बाजारावरही दिसून आला. बाजाराची सुरुवातच घसरणीने झाली आणि दिवसभर ही घसरण कायम राहिली. सत्रादरम्यान निफ्टीने २३,६८२.८० चा नीचांक गाठला. दिवसभराच्या व्यवहाराअंती सेन्सेक्स ९३१.२५ अंकांनी (१.२० टक्के) घसरून ७६,६३१.६५ वर बंद झाला.

# मुख्यमंत्र्यांची चाणक्यनीती यशस्वी!

## ● बारामतीत काँग्रेसची माघार ● सुनेत्रा पवारांना निवडणूक सोपी

**◆ मुंबई पुणे ९ एप्रिल**

महाराष्ट्राच्या राजकीय क्षितिजावर गेल्या काही दिवसांपासून धगधगत असलेल्या बारामती पोटनिवडणुकीच्या संघर्षाला अखेर पूर्णविराम मिळाला आहे. राज्याची राजकीय संस्कृती आणि परंपरा जपण्याच्या नावाखाली मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी चालवलेली मुत्सद्देगिरी यशस्वी ठरली असून, काँग्रेसने या निवडणुकीतून माघार घेण्याचा निर्णय घेतला आहे. मुख्यमंत्र्यांच्या एका प्रभावी फोन कॉलने संपूर्ण राजकीय गणिते फिरवली बारामतीची निवडणूक आता सोपी झाली आहे.

बीड जिल्ह्याच्या दौऱ्यावर असताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी या राजकीय घडामोडींचा उलगडा केला. ही निवडणूक बिनविरोध व्हावी, या भूमिकेवर मुख्यमंत्री ठाम होते. त्यासाठी त्यांनी गुरुवारी सकाळीच काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्याशी संपर्क साधून सुसंवाद साधला. या चर्चेनंतर काँग्रेसने नमती भूमिका घेतली आहे. महाराष्ट्रात एखाद्या ज्येष्ठ नेत्याच्या निधनानंतर होणारी निवडणूक बिनविरोध करण्याची परंपरा आहे, याची आठवण करून देताना मुख्यमंत्र्यांनी आर. आर. पाटील यांच्या निधनावेळी भाजपाने घेतलेल्या संयमी भूमिकेचा दाखला दिला.



मुख्यमंत्र्यांच्या या राजकीय खेळीचा प्रभाव केवळ बारामतीपुरता मर्यादित राहिला नाही, तर राहुरी पोटनिवडणुकीतही त्याचे पडसाद उमटले. फडणवीस यांच्या विनंतीला मान देऊन माजी आमदार प्राजक्त तनपुरे यांनीही उमेदवारी अर्ज न भरण्याचा निर्णय घेतला आहे. या मुत्सद्देगिरीबद्दल मुख्यमंत्र्यांनी तनपुरे यांचे जाहीर आभार मानले आहेत. शरद पवार, सुनेत्रा पवार आणि रोहित पवार यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला मुख्यमंत्र्यांच्या मध्यस्थीची जोड मिळाली. ◂(वृत्तसंस्था)

### २३ उमेदवार रिंगणात

**» काँग्रेसच्या उमेदवारासह एकूण ३० उमेदवारांनी माघार घेतली असून आता २३ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उरले आहेत. त्यामुळे ही निवडणूक आता एकतर्फी होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. करुणा मुंडे आणि अभिजित बिचुकलेसारखे प्रसारमाध्यमांमध्ये झळकणारे उमेदवार जरी रिंगणात असले तरी ही निवडणूक सुनेत्रा पवार लाखोंच्या मतफरकाने जिंकतील, असे भाकीत वर्तविले जात आहे.** ■



CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्त्वाचे

### पार्थ पवार यांनी घेतली राज्यसभा सदस्यत्वाची शपथ

**नवी दिल्ली :** राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे नेते पार्थ पवार यांनी गुरुवारी राज्यसभा सदस्यत्वाची शपथ घेतली. महाराष्ट्राचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांचे पुत्र असलेले पार्थ पवार महाराष्ट्रातून राज्यसभेवर अविरोध विजयी झाले आहेत. पार्थ पवार यांना राज्यसभेचे सभापती सी.पी. राधाकृष्णन यांनी आपल्या दालनात शपथ दिली. यावेळी राज्यसभेचे नेते जे.पी. नड्डा, काँग्रेसचे जयराम रमेश, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल, सुनील तटकरे उपस्थित होते. अजितदादांचे आवडते गुलाबी रंगाचे जॅकेट घातलेले पार्थ पवार शपथ घेतांना भावूक झाले होते. महाराष्ट्रातून सातजण राज्यसभेवर अविरोध निवडून आले, आतापर्यंत पार्थ पवार मिळून सहा जणांनी शपथ घेतली. शपथ घेणाऱ्यात राष्ट्रवादी काँग्रेसचे शरद पवार, केंद्रीय मंत्री आरपीआयचे रामदास आठवले, भाजपाचे रामराव वडकुते, माया इवनाते आणि शिवसेना एकनाथ शिंदे गटाच्या डॉ. ज्योती वाघमारे यांचा समावेश आहे. आता फक्त भाजपाचे विनोद तावडे यांचीच शपथ बाकी आहे. ■

# तृणमूलच्या पापाचा घडा भरला

## पंतप्रधान नरेंद्र मोदींचा पश्चिम बंगालमध्ये घणाघात



**आसनसोल, ९ एप्रिल**

पश्चिम बंगालमधील सत्ताधारी तृणमूल काँग्रेसच्या पापाचा घडा भरला असून, या राज्यात सत्तापरिवर्तन अटळ आहे, असा घणाघात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुरुवारी केला. कोळसा आणि औद्योगिक पट्ट्यात भाषणाची सुरुवात करताना स्थानिक देवता-देवी कल्याणेश्वरी आणि घागर बुडी चंडीचे आवाहन करून मोदींनी राज्याच्या आर्थिक अधोगतीवर प्रकाश टाकला. राष्ट्रीय सकल देशांतर्गत उत्पादनामध्ये बंगालचे योगदान यापूर्वी १२ टक्के होते, ते आता घसरून केवळ पाच टक्क्यांवर आले, असे ते म्हणाले.

बंगालमधील सत्तापरिवर्तन आता अटळ झाले असून, बंगालच्या जनतेनेच त्याची मागणी केली आहे. तृणमूलच्या पापांचा घडा आता भरला आहे. आसनसोलवर सध्या सिंडिकेट राज आणि कोळसा व वाळू माफियांनी वर्चस्व गाजवले आहे, असे नरेंद्र मोदी म्हणाले.

सत्तांतरानंतर पश्चिम बंगाल प्रगतीची नवी शिखरे गाठेल,असा दावा त्यांनी केला. एकेकाळी भरभराटीस असलेल्या आसनसोलच्या औद्योगिक पट्ट्यातून गुंतवणूक गायब झाली आहे. केवळ भाजपाचे 'डबल इंजिन'च ही परिस्थिती सुधारू शकते, असे मोदी म्हणाले. आसनसोलमधील उद्योगांच्या पुनरुज्जीवनासाठी केंद्राने ४५ हजार कोटी रुपये मंजूर केले आहेत. तृणमूल काँग्रेसने केवळ क्रूरता दिली आहे. याउलट सत्ताधारी पक्षाने निर्माण केलेले अडथळे असूनही भाजपाने आसनसोलचा विकास घडवून आणला आहे. आसनसोल आणि दुर्गापूर या दोन्ही शहरांमध्ये महानगरे बनण्याची प्रचंड क्षमता आहे, यावर मोदींनी भर दिला. भाजपाच्या नेतृत्वाखलाल रालोआ सरकारच हा विकास घडवून आणेल, असे आश्वासन त्यांनी दिले. ◀(वृत्तसंस्था)

### पंतप्रधानांनी दिलेली हमी

- भाजपा सरकार भीतीचे वातावरण विश्वासात रूपांतरीत करेल. ते कायद्याच्या राज्यावरील विश्वास पुनर्स्थापित करेल.
- भाजपा सरकारच्या अंतर्गत जनतेची सेवा करण्यासाठी असलेली प्रशासकीय यंत्रणा त्या जनतेला पूर्णपणे उत्तरदायी असेल.
- प्रत्येक घोटाळा, प्रत्येक भ्रष्टाचार, आपल्या मुलींवर झालेला प्रत्येक अन्याय आणि बलात्काराच्या प्रत्येक प्रकरणाची संबंधित फाईल्स पुन्हा उघडल्या जातील.
- तृणमूलच्या राजवटीत ज्यांनी भ्रष्टाचार केला, त्याचे स्थान तुरुंगातच राहील. मग, तो मंत्री असो अथवा चौकीदार, कायदा प्रत्येकाला जाब विचारेल.
- निर्वासितांना संविधानाने हमीन दिलेले सर्व अधिकार आणि सवलती प्रदान केल्या जातील. मात्र, घुसखोरांना हाकलून लावले जाईल. त्यांना भारतात राहण्याची परवानगी दिली जाणार नाही.
- भाजपाचे सरकार स्थापन होताच, आम्ही सातवा वेतन आयोग लागू करू. ■

# तामिळनाडूच्या राजकारणावर द्रविड आंदोलनाचा प्रभाव

**श्यामकांत जहागीरदार**




**नवी दिल्ली, ९ एप्रिल**

तामिळनाडू विधानसभेच्या २३४ जागांसाठी २३ एप्रिलला एकाच टप्प्यात मतदान होत आहे. केरळप्रमाणे तामिळनाडूतही नेहमी दोन आघाड्यात निवडणूक होत असते. एक आघाडी द्रमुकच्या नेतृत्वातील असते, तर दुसरी अण्णाद्रमुकच्या. काँग्रेस आणि भाजपा या दोन्ही राष्ट्रीय पक्षांना राज्यातील आपले राजकारण द्रमुक आणि अण्णाद्रमुक यांच्या मदतीने करावे लागते. काँग्रेसने द्रमुकचा हात पकडला तर भाजपाला ऊण्णाद्रमुकचा हात पकडावा लागतो. कधी याच्या उलटही होते.

ब्रिटिश शासनकाळात हा प्रदेश मद्रास प्रेसिडेन्सी म्हणून ओळखला जात होता. स्वातंत्र्यानंतर मद्रास प्रेसिडेन्सीचे विभाजन वेगवेगळ्या राज्यात करण्यात आले. १९५६ मध्ये भाषेच्या आधारावर राज्यांची पुनर्रचना करण्यात आली आणि हा भाग मद्रास राज्य झाले. १९६९ मध्ये मद्रास राज्याचे रुपांतर तामिळनाडूमध्ये झाले.

तामिळनाडूचा राजकीय पाया द्रविड आंदोलनावर अवलंबून आहे. तामीळ भाषा आणि संस्कृतीचा या भागातील लोकांना मोठा अभिमान आहे. त्यामुळे १९३० मध्ये हिंदी भाषा लादण्याच्या विरोधात या भागात मोठे आंदोलन झाले जे द्रविड आंदोलन म्हणून ओळखले जाऊ लागले.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर २० वर्ष म्हणजे १९६७ पर्यंत मद्रास राज्यात काँग्रेसची सत्ता होती. के कामराज काँग्रेसच्या काळातील सर्वात प्रभावशाली नेते होते. टी. प्रकाशम, ओ.पी. रामास्वामी रेड्डी, कुमारस्वामी राजा, सी. राजगोपालाचारी, एम. भक्तवत्सलम आणि के. कामराज असे २० वर्षात राज्यात काँग्रेसचे सहा मुख्यमंत्री झाले. १९६७ मध्ये राज्यात पहिल्यांदा द्रमुकची सत्ता आली. राज्यातील हे पहिले गैरकाँग्रेसी सरकार होते. मात्र त्यानंतर राज्यात काँग्रेसचे सरकार कधी आले नाही. १९७२ मध्ये एम.जी रामचंद्रन यांच्या नेतृत्वात अण्णाद्रमुकचे सरकार आले. तेव्हापासून राज्यात गैरकाँग्रेसी सरकारचे युग सुरु झाले. त्यानंतर राज्यातून काँग्रेसचा प्रभाव हळूहळू कमी झाला. ■

## के. कामराज होते काँग्रेसचे प्रभावशाली नेते

**नवी दिल्ली, ९ एप्रिल**

सी. राजगोपालाचारीच काँग्रेसचे तामिळनाडूतील पहिले मुख्यमंत्री झाले असते, पण के. कामराज यांना ते मान्य नव्हते म्हणून त्यांनी टी. प्रकाशम यांच्या नावाला पाठिंबा दिला आणि प्रकाशम् राज्याचे पहिले मुख्यमंत्री झाले.

प्रकाशम् आपल्या ओंजळीने पाणी पितील, असे कामराज यांना वाटत होते, पण ते कामराज यांना जुमानत नव्हते. कारण प्रकाशम् हे तेलगू होते, त्यामुळे ते तामिळनाडू प्रदेश काँग्रेस समितीला फारसा भाव देत नव्हते. त्यामुळे १९४७ मध्ये कामराज यांनी प्रकाशम् यांना मुखृयमंत्रिपदावरुन खाली खेचत ओ.पी. रामास्वामी रेड्डी यांना मुख्यमंत्री बनवले. रामास्वामी तामीळ होते. पण त्यांचे आणि कामराज यांचेही फार दिवस जमले नाही. त्यामुळे रामास्वामी यांचेही मुख्यमंत्रिपद गेले. त्यामुळे १९४९ मध्ये कामराज यांनी कुमारस्वामी राजा यांना मुख्यमंत्री केले. १९५२ पर्यंत कुमारस्वामी राजा मुख्यमंत्री होते. मुख्यमंत्र्यांचे पाय ओढण्याची आणि त्याला फटाके लावण्याची परंपरा ही काँग्रेसमध्ये तेव्हापासूनची आहे.

१९५२ च्या राज्यातील विधानसभा निवडणुकीत काँग्रेसला बहुमत मिळाले नाही, ३७५ सदस्यांच्या विधानसभेत काँग्रेसला फक्त १५२ जागा मिळाल्या, त्या बहुमतापेक्षा कमी होत्या. काँग्रेस सरकार बनवण्याच्या स्थितीत नसल्यामुळे कम्युनिस्ट पक्षाने राज्यातील छोट्या पक्षांना सोबत घेऊन आघाडी सरकार स्थापन करण्याचा प्रयत्न केला. युनायटेड डेमोक्रेटिक फ्रंट नावाच्या या आघाडीने १६६ सदस्यांच्या पाठिंब्याचे पत्र राज्यपालांना सादर करत सरकार स्थापन करण्याचा दावा केला. मात्र तत्कालिन राज्यपाल महाराजा कृष्णकुमारसिंह भावसिंह यांनी कोणताही निर्णय घेतला नाही. त्यांनी हे प्रकरण राष्ट्रपती राजेंद्रप्रसाद यांच्याकडे पाठवले. राष्ट्रपतींनी तत्कालिन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु यांचा सल्ला घेतला. कामराज मात्र या आघाडी सरकारच्या बाजूने होते. आघाडी सरकार फारकाळ टिकणार नाही आणि काँग्रेसला लवकरच राज्यात परत सत्तेवर येण्याची संधी मिळेल, असे कामराज यांची भूमिका होती. अखेर कम्युनिस्टविरोधी विचारधारेसाठी ओळखले जाणारे सी. राजगोपालाचारी यांची काँग्रेसने मुख्यमंत्रिपदी निवड केली. राजगोपालाचारी यांनी मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली, आणि जोडतोड करत कसेतरी तब्बल तीन महिन्यांनी विधानसभेत बहुमत सिध्द केले. राजगोपालाचारी मुख्यमंत्री होऊ नये, असे कामराज यांना वाटत असतांना बदलत्या राजकीय परिस्थितीत कामराज यांना राजगोपालचारी यांनाच मुख्यमंत्री म्हणून स्वीकारावे लागले. ◀(तभा वृत्तसेवा)

# ...तरच आत्मनिर्भर भारताचे स्वप्न होईल साकार : गडकरी

### छत्रपती शिवाजी महाराज संग्रहालयाचे लोकार्पण




**नवी दिल्ली, ९ एप्रिल**

छत्रपती शिवाजी महाराज संपूर्ण भारतवर्षाचे प्रेरणास्त्रोत आहे. त्यांच्या विचारांवर आधारित भविष्यातील युवकांची पिढी घडवल्यानंतरच आत्मनिर्भर तसेच विश्वगुरु भारताचे आमचे स्वप्न आणि संकल्प साकार होऊ शकेल, असे प्रतिपादन केंद्रीय भूपृष्ठ परिवहन आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी केले.

वीरयोध्दा छत्रपती शिवाजी महाराज स्मारक राष्ट्रीय समितीतर्फे कुतुब इन्स्टिट्युशनल भागात उभारण्यात आलेल्या श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवन चरित्रावर आधारित अत्याधूनिक तंत्रज्ञानाचा वापर करत उभारण्यात आलेल्या संग्रहालयाचे गुरुवारी नितीन गडकरी यांच्या हस्ते लोर्कापण करण्यात आले, यावेळी ते संबोधित करत होते.

स्मारक समितीचे अध्यक्ष माजी केंद्रीय मंत्री विजय नवल पाटील, महासचिव कर्नल मोहन काकतीकर, भाजपा नेते श्याम जाजू, खासदार रामवीरसिंह बिधुरी, सिंघानिया विद्यापीठाचे अध्यक्ष रवी सिंघानिया आणि अन्य मान्यवर यावेळी उपस्थित होते.

भूतकाळाच्या इतिहासाचे वर्तमानात स्मरण करतच भविष्याचे धोरण आखता येते, याकडे लक्ष वेधत गडकरी म्हणाले की, शिवाजी महाराजांचा जाज्वल्य इतिहास आधूनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून आजच्या युवा पिढीपर्यंत पोहोचवण्यत हे संग्रहालय अनन्यसाधारण योगदान देईल, यात शंका नाही.

नागपुरात फुटाळा तलावावर आंतरराष्ट्रीय ख्यातीचा संगीत फवारा उभारण्यात आला आहे, त्यातील लाईट शोतून शिवाजी महाराजांचा इतिहास सादर करण्याचा आपला प्रयत्न असल्याचे गडकरी यांनी यावेळी सांगितले. प्रारंभी स्मारक समितीचे अध्यक्ष विजय नवल पाटील यांनी प्रास्ताविक केले. समितीचे महासचिव कर्नल मोहन काकतीकर यांनी स्मारकाच्या प्रगतीचा अहवाल सादर केला. ऐतिहासिक असे स्मारक दिल्लीत उभारण्यात मौल्यवान योगदान देणारे राजीव जालनापूरकर आणि संजय दाबके यांचा यावेळी गडकरी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. समितीचे महासचिव मिलिंद पाटील यांनी आभार मानले. ◀(तभा वृत्तसेवा)

# पीएम सूर्यघरमध्ये नागपूर अव्वल; पुणे जिल्ह्याला १.३८ कोटींचे अनुदान

**पुणे, ९ एप्रिल**

केंद्र सरकारच्या पीएम सूर्यघर मोफत वीज योजनेने महाराष्ट्र राज्यात मोठी गती घेतली असून, ३० जून २०२५ पर्यंतच्या आकडेवारीनुसार राज्यात १ लाख ९१ हजार ५८५ निवासी ग्राहकांनी आपल्या छतावर सौर संच बसवले आहेत. या योजनेला प्रोत्साहन दिल्याबद्दल केंद्र सरकारकडून संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांना (ग्रामपंचायत, नगरपालिका, महापालिका) प्रति सौर संच १ हजार रुपये याप्रमाणे एकूण १९ कोटी १५ लाख ८५ हजार रुपयांचे प्रोत्साहन अनुदान वितरित करण्यात येणार आहे. यामध्ये सर्वाधिक ३.०२ कोटी रुपयांचे अनुदान नागपूर जिल्ह्याला मिळणार असून, पुणे जिल्ह्याला १.३८ कोटी रुपयांचे अनुदान प्राप्त होणार आहे.



दरमहा ३०० युनिटपर्यंत वीज वापरणाऱ्या कुटुंबांना शून्य वीज बिलाचा लाभ मिळवून देण्यासाठी ही योजना देशभरात राबविली जात आहे. या योजनेंतर्गत ३ किलोवॅटपर्यंतचा सौर प्रकल्प बसविण्यासाठी ग्राहकांना ७८ हजार रुपयांपर्यंत सरकारी अनुदान दिले जाते.

उर्वरित रकमेसाठी राष्ट्रीयकृत बँकांमार्फत विनातारण आणि कमी व्याजदरात कर्ज उपलब्ध करून दिले जात आहे. विशेष म्हणजे, ज्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कार्यक्षेत्रात अधिक सूर्यघर प्रकल्प उभारले जातील, त्यांना विकासासाठी हे विशेष प्रोत्साहन अनुदान दिले जात आहे. ◀(तभा वृत्तसेवा)

### १० हजारांपेक्षा जास्त सूर्यघर झालेले जिल्हे

**नागपूर :** ३० हजार २३२ (प्रोत्साहन अनुदान: ३.०२ कोटी)
**जळगाव :** १४ हजार ४९४ (प्रोत्साहन अनुदान: १.४४ कोटी)
**पुणे :** १३ हजार ८२० (प्रोत्साहन अनुदान: १.३८ कोटी)
**छत्रपती संभाजीनगर :** १२ हजार ९४४ (प्रोत्साहन अनुदान: १.२९ कोटी)
**नाशिक :** १२ हजार ४९३ (प्रोत्साहन अनुदान: १.२४ कोटी)
**अमरावती :** १० हजार ८४९ (प्रोत्साहन अनुदान: १.०८ कोटी)

# एमपीएससी परीक्षेत विजय लामकाने पहिला

### आरती जाधव महिलांमध्ये अव्वल

**मुंबई, ९ एप्रिल**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे (एमपीएससी) २७ ते २९ मे, २०२५ या कालावधीत घेण्यात आलेल्या राज्य सेवा (मुख्य) परीक्षा-२०२४ चा अंतिम निकाल आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आला आहे. या परीक्षेमध्ये सोलापूर जिल्हातील विजय नागनाथ लामकाने (६२४ गुण) हे सर्वसाधारण तथा इतर मागासवर्ग उमेदवारांमधून राज्यात प्रथम तर सोलापूर जिल्ह्यातील आरती परमेश्वर जाधव (६०१) या महिलांमधून राज्यात प्रथम आल्या आहेत.



आयोगाने विविध २० संवर्गातील एकूण ४६१ पदांवर उमेदवारांची शिफारस केली आहे. उमेदवारांच्या माहितीसाठी निकाल व प्रत्येक प्रवर्गासाठी शिफारसपात्र ठरलेल्या शेवटच्या उमेदवाराचे गुण (सीमांकन गुण) आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले. अर्जातील माहिती चुकीची आढळल्यास किंवा आवश्यक कागदपत्रे सादर न केल्यास उमेदवारी कोणत्याही टप्प्यावर रद्द केली जाऊ शकते, असेही आयोगाने नमूद केले आहे. दरम्यान, समांतर आरक्षणासह विविध मुद्यांवर न्यायालयात प्रलंबित असलेल्या प्रकरणांतील अंतिम निर्णयाच्या अधीन राहून हा निकाल जाहीर करण्यात आल्याचे आयोगाने स्पष्ट केले. तसेच दिव्यांग, अनाथ, खेळाडू आणि मागासवर्गीयांसाठी आरक्षित पदांवरील उमेदवारांच्या शिफारशी सक्षम प्राधिकरणाच्या तपासणीनंतरच अंतिम मानल्या जाणार आहेत. ◀(वृत्तसंस्था)

# बनावट शिक्षक प्रकरणी विशेष तपास पथकाला तीन महिने मुदतवाढ

**मुंबई, ९ एप्रिल**

राज्यातील अपात्र शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची नावे वेतन प्रणालीमध्ये नियमबाह्य पद्धतीने समाविष्ट करून त्यांना वेतन अदा केल्याच्या गंभीर प्रकरणाचा तपास अद्याप अपूर्ण असल्याने राज्य शासनाने विशेष तपास पथकाला (एसआयटी) आणखी तीन महिन्यांची मुदतवाढ दिली आहे.

या प्रकरणाची व्याप्ती मोठी असल्याने आणि तपासासाठी अधिक वेळ आवश्यक असल्याचे लक्षात घेऊन ही मुदतवाढ देण्यात आली आहे. आता हे विशेष तपास पथक ८ मार्च २०२६ ते ७ जून २०२६ या कालावधीत पुढील चौकशी पूर्ण करणार आहे. ◀(तभा वृत्तसेवा)

# शबरीमलाचा निकाल पुरुषांच्या श्रेष्ठत्वाच्या कल्पनेवर आधारित

## केंद्राचा सुप्रीम कोर्टात युक्तिवाद

**नवी दिल्ली, ९ एप्रिल**

केरळमधील शबरीमला मंदिरात महिलांच्या प्रवेशावरून सुरू असलेल्या वादाबाबतची सुनावणी सर्वोच्च न्यायालयाच्या नऊ न्यायमूर्तींच्या घटनापीठासमोर सुरू आहे. या प्रकरणामुळे धार्मिक स्थळांमध्ये महिलांच्या प्रवेशाबाबत आणि धार्मिक स्वातंत्र्याच्या व्याप्तीबाबत व्यापक प्रश्न उपस्थित होतात, असा दावा केंद्र सरकारच्या वतीने गुरुवारी सुनावणीवेळी करण्यात आला.



केंद्र सरकारच्या वतीने बाजू मांडताना न्यायाभिकर्ता तुषार मेहता यांनी सांगितले की, हे प्रकरण कोणत्याही एका लिंगाची बाजू घेणे किंवा त्याला विरोध करणे याबद्दल नसून, ते धार्मिक परंपरा आणि श्रद्धांशी संबंधित आहे. उदाहरणे देत त्यांनी निदर्शनास आणून दिले की, देशभरात अशी अनेक मंदिरे आहेत जिथे पुरुषांच्या प्रवेशावरही निर्बंध आहेत किंवा जिथे पुरुषांना विशिष्ट परंपरांचे पालन करणे अनिवार्य असते.

सुनावणीदरम्यान, केरळमधील कोट्टनकुलंगारा श्री देवी मंदिरात पुरुष पारंपरिकपणे महिलांप्रमाणेच साडी नेसून पूजा-अर्चा करतात, या गोष्टीवरही प्रकाश टाकण्यात आला. ही परंपरा अनेक वर्षांपासून चालत आली आहे आणि ती धार्मिक श्रद्धांचा एक अविभाज्य भाग आहे. प्रत्येक धार्मिक स्थळाच्या स्वतःच्या अशा विशिष्ट परंपरा असतात आणि त्याकडे एकाच, समान दृष्टिकोनातून पाहिले जाऊ शकत नाही, असा युक्तिवाद केंद्र सरकारने केला. धार्मिक अधिकारांचे संरक्षण करण्यासाठी अनुच्छेद २५ आणि २६ अंतर्गत एक त्रिस्तरीय यंत्रणा अस्तित्वात आहे, असे नटराज यांनी न्यायालयासमोर नमूद केले. सरन्यायाधीश सूर्य कांत यांनी संविधानातील अनुच्छेद २५ आणि २६ यांचा अर्थ लावताना काही महत्त्वपूर्ण निरीक्षणे नोंदवली. ते म्हणाले की, अनुच्छेद २५ हे व्यक्तीच्या धार्मिक स्वातंत्र्याशी संबंधित आहे; तर अनुच्छेद २६ हे व्यक्तीच्या समूहाचे किंवा एखाद्या धार्मिक संप्रदायाचे अधिकार सुरक्षित ठेवते.

**प्रवेश नाकारल्यास फूट पडू शकते**

प्रत्येकाला सर्व मंदिरे आणि मठांमध्ये प्रवेश मिळणे आवश्यक आहे. एखाद्या संप्रदायाला यातून वगळल्यास त्याचा हिंदू धर्मार विपरित परिणाम होईल आणि समाजात फूट पडेल, असे निरीक्षण सर्वोच्च न्यायालयाने नोंदवले. ◀(वृत्तसंस्था)

### सिक्कीममध्ये अडकलेल्या १,३२१ पर्यटकांची सुटका

**गंगटोक, ९ एप्रिल**

भूस्खलनामुळे अनेक रस्त्यांचा संपर्क तुटल्यानंतर सिक्कीमच्या मंगन जिल्ह्यातील लाचेन येथून हजारपेक्षा जास्त अडकलेल्या पर्यटकांची सुटका करण्यात आली, अशी माहिती अधिकाऱ्यांनी गुरुवारी दिली. उत्तर सिक्कीममधील लाचेन येथे ५ एप्रिलपासून पर्यटक अडकले होते.

१,३२१ पर्यटक आणि ८४ स्थानिकांची गुरुवारी सुटका करण्यात आली, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली. मंगनचे जिल्हाधिकारी अनंत जैन यांच्या देखरेखीखाली तसेच लष्कर, बीआरओ, लाचेन झुम्सा आणि पर्यटन क्षेत्रातील संबंधितांच्या सक्रिय समन्वयाने मोहीम राबवण्यात आली, असे त्यांनी सांगितले.

तारांग चू येथून पर्यटकांना चुंगथांगपर्यंत आणि तिथून पुढे गंगटोकपर्यंत नेण्यासाठी बस आणि पर्यटन वाहनांची विशेष व्यवस्था करण्यात आली होती.

ताराम चू येथील स्थलांतर प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर, स्थानिक आमदार आणि सिक्कीमचे समाजकल्याण मंत्री समदूप लेपचा यांनी भारतीय लष्कर आणि बीआरओच्या अधिकाऱ्यांशी संवाद साधला आणि त्यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांबद्दल आभार मानले. ◀(वृत्तसंस्था)

# जि.प, ग्रामपंचायत निवडणुका लांबणीवर?

## आरक्षण व न्यायालयीन पेच; पावसाळ्यानंतर शक्यता

**प्रवीण राऊत**

**मुंबई, ९ एप्रिल**

राज्यातील सुमारे १५ हजार ग्रामपंचायतींच्या आणि १७ जिल्हा परिषदेच्या सार्वत्रिक निवडणुका तातडीने होण्याची शक्यता धूसर झाली आहे. आरक्षण मर्यादा आणि न्यायालयीन प्रक्रियांमुळे या निवडणुका पावसाळ्यानंतरच पार पडण्याची शक्यता अधिक बळावली आहे. परिणामी ग्रामीण भागातील राजकीय हालचालींना काहीसा विलंब होणार असला, तरी निवडणूकपूर्व समीकरणे मात्र तापू लागली आहेत.



सध्या प्रशासनाकडून ग्रामपंचायत प्रभाग रचनेची प्रक्रिया सुरू असून ती ४ मेपर्यंत पूर्ण पार पडणार आहे. मात्र, १५ जिल्ह्यांत आरक्षणाची एकूण टक्केवारी ५० टक्क्यांपेक्षा जास्त झाल्याचे समोर आल्याने निवडणूक प्रक्रियेत मोठा पेच निर्माण झाला आहे.

यामुळे काही ठिकाणी प्रभाग रचना नव्याने करावी लागण्याची शक्यता वर्तवली जात आहे. याशिवाय प्रभाग रचनेत होणारा विलंब, कालावधी अधिक होणार असल्याने नव्याने मतदार याद्यांमध्ये आवश्यक सुधारणा, तसेच मनुष्यबळ व सुरक्षा व्यवस्थेचे नव्याने नियोजन या बाबीही निवडणुका पुढे ढकलण्यामागील कारणांमध्ये भर घालत आहेत. एकूणच, आरक्षणाचा पेच, न्यायालयीन निर्णयाची प्रतीक्षा आणि पावसाळी अडथळे यामुळे राज्यातील ग्रामपंचायत निवडणुकांचा "बार" आता पावसाळ्यानंतरच उडण्याची शक्यता अधिक स्पष्ट होत आहे. ■

### जुलैमध्ये सर्वोच्च न्यायालयात सुनावणी

आरक्षण मर्यादेबाबतचा महत्त्वाचा मुद्दा सध्या सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असून २१ आणि २२ जुलै रोजी सुनावणी होणार आहे. न्यायालयाच्या निर्णयावरच जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायतच्या सार्वत्रिक निवडणुकांचे वेळापत्रक अवलंबून राहणार आहे. त्यामुळे प्रशासनाने सध्या सावध भूमिका घेतली आहे. दरम्यान, जुलैमध्ये न्यायालयाचा निर्णय आल्यास पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर तातडीने निवडणुका घेणे कठीण ठरणार आहे. त्यामुळे निवडणुका पुढे ढकलण्याचा पर्याय अधिक व्यवहार्य मानला जात आहे. ■

# 'बीकेआय'चे मॉड्युल उद्ध्वस्त

## पंजाबमध्ये दोघांना अटक ● ग्रेनेड, आयईडीचे साहित्य जप्त

**चंदीगड, ९ एप्रिल**

पाकिस्तानची पाताळयंत्री गुप्तचर संस्था आयएसआयचे पाठबळ असलेली खलिस्तानी दहशतवादी संघटना बब्बर खालसा इंटरनॅशनलचे (बीकेआय) मॉड्युल उद्ध्वस्त करीत दोन अतिरेक्यांना अटक करण्यात आली, अशी माहिती पंजाब पोलिसांनी गुरुवारी दिली. राज्यातील शांतता बिघडवण्यासाठी अत्यंत गंभीर स्वरूपाचे दहशतवादी हल्ले घडवून आणण्याची तयारी या मॉड्युलने केली होती.

आकाश मसीह आणि जबलौन अशी अटक केलेल्या अतिरेक्यांची नावे आहेत. ते दोघेही गुरदासपूर जिल्ह्यातील दुल्ला नांगल भागाचे रहिवासी आहेत. दोन्ही आरोपींची गुन्हेगारी पृष्ठभूमी असल्याचे त्यांनी सांगितले. त्यांच्या अटकेमुळे मोठ्या प्रमाणात शस्त्रसाठा व दारुगोळा जप्त करणे शक्य झाले. जप्त केलेल्या शस्त्रसाठ्यात पाच ग्रेनेड, दोन विशेष डिटोनेटर्स, आयईडीचे साहित्य यात खिळे भरलेले एक किलो स्फोटकाचा समावेश, कोडर आणि डिकोडरसह 'पुश टू टॉक' टायमर, नऊ व्होल्टची बॅटरी, केबलसह एक बाओफेंग वॉकीटॉकी आणि आयईडीचे ट्रिगर मॅकेनिझमचा समावेश आहे.



अमृतसर ग्रामीण पोलिस, गुरदासपूर पोलिस, अमृतसरमधील विशेष कारवाईम पथक आणि केंद्रीय यंत्रणांनी केलेल्या संयुक्त कारवाईत हे मॉड्युल उद्ध्वस्त करण्यात आले, अशी माहिती बॉर्डर रेंजचे पोलिस महानिरीक्षक संदीप गोयल यांनी दिली. आयएसआय समर्थित दहशतवादी गट विदेशातील सूत्रधारांकडून चालवला जात होता, असे प्राथमिक तपासात निष्पन्न जाल्याचे त्यांनी सांगितले. ◀(वृत्तसंस्था)

# युद्धामुळे ४० लाख कोटींचे नुकसान

## आठ हजारांहून अधिक लोकांचा मृत्यू; ४३ हजार क्षेपणास्त्रे, ड्रोन्सचा मारा

◆ **वॉशिंग्टन, ९ एप्रिल**

मध्य-पूर्वेत अमेरिका, इस्रायल आणि इराण यांच्यात सुरू असलेल्या ४० दिवसांच्या युद्धामुळे पश्चिम आशियात प्रचंड विध्वंस झाला आहे. युद्धाच्या काळात सुमारे ४३,००० क्षेपणास्त्रे, ड्रोन्स आणि बॉम्बहल्ले झाले, ज्यात ८,७१० लोकांचा मृत्यू झाला आणि ४०,००० हून अधिक लोक जखमी झाले, तर ४० लाख कोटींचे आर्थिक नुकसान झाल्याची माहिती 'वॉशिंग्टन पोस्ट'मध्ये प्रसिद्ध झालेल्या अहवालातून समोर आली.



मध्यपूर्वेतील संघर्षाचा परिणाम १७ देशांवर झाला असून, एकूण जागतिक आर्थिक नुकसान अंदाजे ४० लाख कोटी रुपयांपर्यंत पोहोचले असल्याचे अहवालात नमूद आहे. अनेक देशांच्या अर्थव्यवस्था दबावाखाली आहेत, विशेषतः चीन, जपान आणि दक्षिण कोरिया, आणि मंदीची चिन्हे दिसत आहेत. प्रभावित अर्थव्यवस्थांना सावरण्यासाठी एक ते दोन वर्षे, तर पुनर्बांधणीसाठी २० ते ३० वर्षे लागू शकतात. संघर्षविरामानंतर इराणकडे अजूनही किती क्षेपणास्त्रे प्रक्षेपित करण्याची क्षमता आहे याची माहिती समोर आलेली नाही. एका अंदाजानुसार त्यांच्या २० टक्के प्रक्षेपक यंत्रणा अजूनही कार्यरत असू शकते. इराणची युद्धनीती केवळ त्यांच्या शस्त्रांचे संरक्षण करत नाही, तर भविष्यात दीर्घकाळ चालणाऱ्या संघर्षाच्या परिस्थितीत त्यांना सामरिक फायदाही मिळवून देऊ शकते. शांततेची आशा असली तरी, कायमस्वरूपी तोडगा अजूनही हाती लागलेला नाही. ◀(वृत्तसंस्था)

### इराणची अर्थव्यवस्था खिळखिळी

युद्धाचा सर्वात मोठा फटका इराणला बसला आहे. तेथील पायाभूत सुविधा नष्ट झाल्या, अनेक शिक्षक आणि कलाकार आता ऑनलाइन वर्ग घेऊ शकत नाहीत. युद्धाने केवळ इमारतीच उद्ध्वस्त झाल्या नाही, तर दैनंदिन जीवनही विस्कळीत केले आहे. इराणला १३ लाख कोटी रुपयांचे नुकसान झाले आहे. जीडीपीमध्ये २० टक्क्यांपर्यंत घट अपेक्षित आहे. पर्यावरणाची हानी आणि पायाभूत सुविधांच्या नुकसानीमुळे अंदाजे ४ कोटी लोक दारिद्र्यरेषेखाली ढकलले जाऊ शकतात. ■

### अमेरिकेचेही मोठे नुकसान

युद्धाची अमेरिकेलाही मोठी किंमत मोजावी लागली आहे. अहवालानुसार, त्यांचे १५ सैनिक मारले गेले, तर ३०० हून अधिक जखमी आहे. आखाती देशातील अमेरिकेचे अनेक तळ आणि विमानांचे नुकसान झाले आहे. स्वस्त इराणी ड्रोन रोखण्यासाठी अमेरिकेने महागडी प्रणाली वापरली यामुळे आर्थिक भार वाढला. अमेरिकेचे चार लढाऊ विमाने नष्ट झाली. जगातील सर्वात महागडे विमान-३५ची किंमत ७,६६०९,१०० कोटी आणि एमक्यू-९ रीपर (एक ड्रोन) ची किंमत २००२,५०० कोटी आहे. ■

# शांतता चर्चेत युरेनियम संवर्धन राहणार मुख्य मुद्दा

### इराणची प्रमुख अट

◆ **तेहरान, ९ एप्रिल**

इराण आणि अमेरिकेतील तणाव आणि त्यानंतर जाहीर करण्यात आलेला संघर्षविराम नाजूक वळणावर आहे. अणुकार्यक्रमांतर्गत युरेनियम संवर्धनाचा अधिकार कायम ठेवणे हा अमेरिकेसोबत होणाऱ्या कोणत्याही करारासाठी प्रमुख अट असेल, असे इराणच्या अणुसंस्थेचे प्रमुख मोहम्मद इस्लामी यांनी गुरुवारी स्पष्ट केले.

२८ फेब्रुवारीपासून सुरू झालेले हे भीषण युद्ध थांबवण्यासाठी संघर्षविरामाची घोषणा करण्यात आली. मात्र, सद्यपरिस्थिती पाहता हा संघर्षविराम तकलादू ठरणार असल्याचे दिसत आहे. याचे कारण म्हणजे, पाकिस्तानमधील इराणचे राजदूत अमिरी मुगाद्दम यांनी इस्लामाबाद येथे होणाऱ्या अमेरिका-इराण संघर्षविराम चर्चेसाठी प्रतिनिधीमंडळ आल्याची समाज माध्यमावरील पोस्ट हटवली. ही पोस्ट हटवल्यानंतर चर्चेबाबत संशय वाढला आहे तसेच पाकिस्तानच्या भूमिकेवर प्रश्न उपस्थित होत आहेत.

यापूर्वी संघर्षविरामाच्या घोषणेनंतर काही तासांतच इस्रायलने लेबनॉनची राजधानी बैरूत येथे जोरदार हल्ले केले. बुधवारी हे युद्ध खूपच हिंसक झाले. इस्रायलने केलेल्या हल्ल्यात २५० पेक्षा जास्त ठार झाले. संघर्षविरामात लेबनॉनचाही समावेश होता, असा दावा इराणने केला आहे. मात्र, अमेरिका आणि इस्रायल यास नकार देत आहेत. जगातील २० टक्के तेल व्यपारासाठी महत्त्वपूर्ण असलेल्या होर्मुझवर इराणचे नियंत्रण कायम आहे. लेबनॉनवर झालेल्या हल्ल्यांनंतर इराणने ही सामुद्रीधुनी पुन्हा बंद केली आहे. लेबनॉनवरील हल्ले थांबले नाही, तर होर्मुझ सामुद्रधुनी पूर्ण बंद होईल, असे संकेत इराणी माध्यमांनी दिले आहेत. दुसरीकडे, ट्रम्प पुन्हा धमकी देत आहेत. इराणने कराराच्या अटींचे पालन केले नाही, तर या देशाला अत्यंत घातक हल्ल्यांना तोंड द्यावे लागेल, असे डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटले आहे. ◀(वृत्तसंस्था)

### सौदी अरब-इराणच्या परराष्ट्र मंत्र्यांत चर्चा

पाकिस्तानमध्ये होणाऱ्या चर्चेपूर्वी सौदी अरबचे परराष्ट्र मंत्री प्रिन्स फैजल बिन फरहान आणि इराणचे परराष्ट्र मंत्री अब्बास अराघची यांच्यात दूरध्वनीवर महत्त्वपूर्ण चर्चा झाली. पश्चिम आशियातील वाढता तणाव कमी करण्यासाठी तसेच प्रदेशात स्थैर्य प्रस्थापित करण्याच्या विविध मार्गांवर चर्चा केली. लेबनॉन आणि होर्मुझच्या सामुद्रधुनीवरील इस्रायली हल्ल्यांमुळे संघर्षविरामाला धोका निर्माण झाला असताना, इराणने सौदी अरबसोबत साधलेला संपर्क दर्शवतो की, वाटाघाटींपूर्वी ते प्रादेशिक शक्तींसोबत समन्वय प्रस्थापित करण्याचा आणि दबाव निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहेत. ■

# अमेरिकेचे सैन्य माघारी फिरणार नाही

## डोनाल्ड ट्रम्प यांची घोषणा, करार अयशस्वी झाल्यास हल्ले

◆ **वॉशिंग्टन, ९ एप्रिल**

दोन्ही देशांमध्ये अंतिम आणि ठोस करार होत नाही, तोपर्यंत अमेरिकेचे सैन्य इराणच्या सीमांपासून मागे हटणार नाही. करार अयशस्वी झाल्यास इराणवर आतापर्यंतचा सर्वात मोठा हल्ला केला जाईल, अशी धमकी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी दिली आहे.

ट्रम्प यांनी समाज माध्यमावरील पोस्टमध्ये म्हटले की, अमेरिकेच्या सर्व युद्धनौका, विमाने, लष्करी कर्मचारी आणि अतिरिक्त दारूगोळा इराणच्या आसपास तैनात राहतील. आधीच खिळखिळ्या झालेल्या शत्रूचा पूर्णपणे नायनाट करण्यासाठी आवश्यक असलेली सर्व सामग्री सज्ज ठेवली जाईल.



जोपर्यंत खऱ्या अर्थाने झालेला करार पूर्णपणे अंमलात येत नाही, तोपर्यंत आमचे सैन्य माघारी फिरणार नाही. ट्रम्प यांनी इराणला कराराच्या अटींची आठवण करून देताना म्हटले की, हॉर्मुझची सामुद्रधुनी पूर्णपणे खुली राहील आणि इराण कोणत्याही अण्वस्त्रांची निर्मिती करणार नाही, असे आश्वासन देण्यात आले आहे. या अटींचे उल्लंघन झाल्यास इराणला कधीही न पाहिलेल्या भीषण हल्ल्याचा सामना करावा लागेल.

**मध्यपूर्वेत तणाव कायम**

अमेरिका आणि इराणमध्ये युद्धविराम झाला असला, तरी मध्यपूर्वेतील परिस्थिती अजूनही स्फोटक आहे. अमेरिका-इराण करार झाल्यानंतर काही वेळातच इस्रायलने लेबनॉनमधील हिजबुल्लाहच्या ठिकाणांवर भीषण हवाई हल्ले केले. यामुळे इराण संतप्त झाला असून, त्यांनी कराराच्या अटींच्या उल्लंघनाचा आरोप केला. ◀(वृत्तसंस्था)

### नेपाळने सहा देशांतील राजदूतांना परत बोलावले

**काठमांडू** : नेपाळच्या नव्या सरकारने भारत आणि ऑस्ट्रेलियासह सहा देशांतील राजदूतांना परत बोलावण्याचे आदेश दिले. या नियुक्त्या मागील ओली सरकारने केल्या होत्या. पंतप्रधान बालेंद्र शाह यांच्या मंत्रिमंडळाने या राजदूतांना एका महिन्याच्या आत मायदेशी परतण्यास सांगितले आहे. ज्या देशांमधून राजदूतांना परत बोलावण्यात आले आहे, त्यामध्ये भारत, ऑस्ट्रेलिया, श्रीलंका, डेन्मार्क, दक्षिण कोरिया आणि दक्षिण आफ्रिका यांचा समावेश आहे. नेपाळ सरकारच्या या निर्णयानंतर, भारतातील नेपाळचे राजदूत शंकर प्रसाद शर्मा यांना आता परतावे लागेल. ■

# मुख्य निवडणूक आयुक्तांनी हाकलल्याचा तृणमूलचा दावा

◆ **नवी दिल्ली, ९ एप्रिल**

तृणमूल काँग्रेसच्या शिष्टमंडळाने खासदार डेरेक ओब्रायन यांच्या नेतृत्वात बुधवारी दिल्ली येथे मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांची भेट घेतली. या बैठकीत ओब्रायन यांनी आयुक्तांना तुम्ही भ्रष्ट अधिकाऱ्यांच्या बदल्या कशा करत आहात आणि मुक्त व निष्पक्ष निवडणुका कशा घेणार आहात, असे प्रश्न विचारले. यावर उत्तर देण्याऐवजी त्यांनी सात मिनिटांतच शिष्टमंडळाला इथून चालते व्हा, असे बजावले. आयुक्तांच्या या वर्तनावर नाराजी व्यक्त करत ओब्रायन यांनी आयोगावर गंभीर आरोप केले.

या बैठकीनंतर खासदार ओब्रायन यांनी माध्यमांना सांगितले की, आम्ही मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांची नऊ पत्रे मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांना सादर केली होती. त्याकडे दुर्लक्ष करण्यात आले.

तृणमूल काँग्रेसच्या नेत्यांनी निवडणूक आयोगाला अशा अनेक घटनांची माहिती दिली, ज्यात काही निवडणूक अधिकाऱ्यांवर भाजपाशी संबंध असल्याचा आरोप होता. तसेच त्यांच्या बदलीची मागणी केली. यासंदर्भात एक निवेदन सादर करण्यात आले.

**तृणमूलला आयोगाचा इशारा**

एक्सवरील एका पोस्टमध्ये, आयोगाने म्हटले की, आयुक्तांनी तृणमूल काँग्रेसच्या शिष्टमंडळाशी थेट संवाद साधला. शिष्टमंडळ आयुक्तांवर आरडाओरड करत होते. आयुक्तांनीओब्रायन यांना सभागृहात प्रतिष्ठा राखण्याची विनंती केली. तसेच आरडाओरडा करणे आणि असभ्य वर्तन करणे योग्य नाही, असे बजावले. ◀(वृत्तसंस्था)

# तीन महिन्यांत १४०० तस्करांना अटक

### पंजाबचे मुख्यमंत्री मान यांची माहिती

◆ **चंदीगड, ९ एप्रिल**

पंजाब पोलिसांनी जानेवारी ते मार्च या तीन महिन्यांत मादक पदार्थ आणि शस्त्र तस्करीविरोधात राबवलेल्या मोहीमेत ४४ हजारहून अधिक ठिकाणी छापे टाकले, यात १४०० तस्करांना अटक करण्यात आली. या कारवाईत शस्त्रे, दारुगोळा, रोकड आणि सोने जप्त करण्यात आल्याची माहिती मुख्यमंत्री भगवंत मान यांनी दिली.

गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी पंजाब पोलिस राज्यभरात मोहीम राबवत आहे. या मोहिमेचा उद्देश गुन्हेगारांचे जाळे,अमली पदार्थांच्या तस्करीचे सिंडिकेट्स आणि त्यांच्या साथीदारांना संपवणे असल्याच मान यांनी पत्रपरिषदेत सांगितले. पोलिसांनी मोस्टवॉंटेड ७१४ गुन्हेगारांना अटक केली, जे बऱ्याच काळापासून पसार होते.◀(वृत्तसंस्था)

# संयुक्त राष्ट्रांच्या चार परिषदेत भारताचा दबदबा

## बिनविरोध निवड, जागतिक स्तरावर मजबूत स्थान

◆ **संयुक्त राष्ट्रे, ९ एप्रिल**

संयुक्त राष्ट्रांशी संलग्न असलेल्या चार संस्थांच्या निवडणुकांमध्ये भारताची बिनविरोध निवड झाली. विज्ञान आणि तंत्रज्ञान विकास आयोग, गैर-सरकारी संस्था समिती आणि कार्यक्रम व समन्वय समितीशी संबंधित चार संस्था आहे.

चारही परिषदांच्या निवडणुकांमध्ये भारताची निवड एकमताने झाली, जे जागतिक स्तरावर भारताचे मजबूत स्थान दर्शवते. याव्यतिरिक्त, ज्येष्ठ भारतीय राजनैतिक अधिकारी प्रीती सरन यांची आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक हक्क समितीवर पुन्हा निवड झाली आहे. त्यांनी यापूर्वी या समितीच्या एका सत्राचे अध्यक्षपद भूषवले आहे. प्रीती सरन यांना ३६ वर्षांचा राजनैतिक अनुभव आहे, ज्यामध्ये व्हिएतनाममधील भारताच्या राजदूत म्हणून काम करण्याचा आणि टोरोंटो, जिनिव्हा, ढाका, कैरो व मॉस्को यांसारख्या महत्त्वाच्या ठिकाणी प्रमुख पदांवर काम करण्याचा समावेश आहे. संयुक्त राष्ट्रांच्या परिषदा आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक हक्कांवरील आंतरराष्ट्रीय करारांच्या पालनावर देखरेख ठेवतात. याशिवाय विज्ञान आणि तंत्रज्ञान आयोग विकास आणि शाश्वत भविष्याशी संबंधित मुद्द्यांसाठी दिशा ठरवतो आणि समन्वय समिती संयुक्त राष्ट्रांच्या संस्थांमध्ये समन्वय सुनिश्चित करते. ◀(वृत्तसंस्था)

# इम्रानच्या बहिणींवर दहशतवादाचा गुन्हा

### तुरुंगाबाहेर आंदोलनाचे प्रकरण

◆ **रावळपिंडी, ९ एप्रिल**

पाकिस्तानच्या रावळपिंडीतील आदियाला रोडवर झालेल्या आंदोलनाशी संबंधित प्रकरणात पोलिसांनी माजी पंतप्रधान इम्रान खान यांच्या बहिणींसह १,४०० जणांवर दहशतवाद कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केला.

पोलिसांचा आरोप आहे की, आंदोलकांनी कायदा आणि सुव्यवस्थेला आव्हान दिले, दगडफेक केली आणि पोलिसांवर हल्ला केला, ज्यात किमान नऊ पोलिस जखमी झाले. एफआयआरमध्ये हत्येचा प्रयत्न आणि सरकारी कामात अडथळा आणणे यासारख्या गंभीर आरोपांचा समावेश आहे. तुरुंगात असलेल्या इम्रान खान यांना भेटण्यास बंदी घालण्यात आली होती, याविरोधात पाकिस्तान तेहरीक-ए-इन्साफ (पीटीआय) पक्षाच्या कार्यकर्त्यांनी तुरुंगाबाहेर आंदोलन केले होते. पोलिसांनी आंदोलन करणाऱ्या पक्षाच्या नेत्यांना आणि कार्यकर्त्यांना ताब्यात घेतले. यामध्ये इम्रान खान यांच्या बहिणी, नूरीन नियाझी आणि उझमा खानम यांचा समावेश होता. याच प्रकरणात पोलिसांनी आता दहशतवाद कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केला आहे. आंतरराष्ट्रीय मानवाधिकार संघटना ॲम्नेस्टी इंटरनॅशनलने या कारवाईवर तीव्र टीका केली आहे. ◀(वृत्तसंस्था)

# हिंदू संघटना न्यायालयात; जातीय भेदभावावरून लक्ष्य केल्याचा आरोप

◆ **न्यू यॉर्क, ९ एप्रिल**

अमेरिकेतील जातीय भेदभावावरील वाद पुन्हा एकदा तीव्र झाला आहे. हिंदू अमेरिकन फाऊंडेशनने (एचएएफ) कॅलिफोर्नियाच्या नागरी हक्क नियामक संस्थेविरोधात नवव्या सर्किट अपील न्यायालयात याचिका दाखल करीत जातीय भेदभावाचा आरोप केला. संस्थेने जातीचा मुद्दा चुकीच्या पद्धतीने हिंदू धर्माशी जोडून भारतीय आणि दक्षिण आशियाई समुदायांना लक्ष्य केल्याचे याचिकेत नमूद करण्यात आले.

संस्थेचा आरोप आहे की, कनिष्ठ न्यायालयाने त्यांच्या दाव्यांमागील मूलभूत मुद्द्यांचा विचार न करताच खटला फेटाळून लावला. हा संपूर्ण वाद कॅलिफोर्निया नागरी हक्क विभागाने सिस्को प्रणाली आणि तिच्या दोन व्यवस्थापकांविरुद्ध दाखल केलेल्या तक्रारीतून उद्भवला आहे. या तक्रारीत जातीय भेदभावाचा आरोप करण्यात आला होता. नागरी हक्क विभागाच्या अहवालात हिंदू धर्म तसेच भारतीय वंशाच्या कर्मचाऱ्यांना जोडण्याचा प्रयत्न केला. एचएएफने आरोप केला की, अहवालात जात या शब्दाचा वारंवार वापर करण्यात आला आणि भारतीय कर्मचाऱ्यांमध्ये जातीय भेदभाव अस्तित्वात आहे, असा समज निर्माण करण्यात आला. विभागाने नंतर तो वादग्रस्त शब्दप्रयोग काढून टाकला आणि हे प्रकरण असंबद्ध असल्याचे घोषित केले, तरी संस्थेचे म्हणणे आहे की यामुळे मूळ समस्येचे निराकरण होत नाही. ◀(वृत्तसंस्था)



पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीचा प्रचार आता चांगलाच रंगात आला आहे. भारतीय जनता पार्टीच्या प्रचारार्थ गुरुवारी भाजपा नेते आणि अभिनेते मिथुन चक्रवर्ती यांच्या 'रोड शो'चो आयोजन करण्यात आले होते. यावेळी कडक सुरक्षा बंदोबस्त ठेवला होता

## चित्रपट वार्ता

### 'धुरंधर-२'ने मोडला 'दंगल'चा रेकॉर्ड

**मुंबई-**: धुरंधर-२ हा चित्रपट प्रदर्शनाच्या पहिल्या दिवसापासूनच बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घालत आहे . १९ मार्च २०२६ रोजी थिएटरमध्ये प्रदर्शित झालेल्या या चित्रपटाने फक्त तीन आठवड्यातच




जगभरात १६०० कोटी रुपयांची कमाई करून बॉलिवूडच्या इतिहासात आपले नाव कोरले आहे. चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर एक महत्त्वाचा विक्रम मोडला आहे. २०१६ मध्ये प्रदर्शित झालेल्या आमिर खानच्या 'दंगल' चित्रपटाने तेव्हापासून वर्ल्डवाइड २००० कोटी रुपयांपेक्षा अधिक कमाई करत पहिल्या क्रमांकावर आपले स्थान टिकवले होते. परंतु सर्वात जलद गतीने १६०० कोटी रुपये कमावण्याचा विक्रम आता 'धुरंधर-२'ने आपल्या नावावर केला आहे. 'दंगल'ला हा आकडा गाठण्यासाठी २५ दिवस लागले होते, तर प्रभासच्या मुख्य भूमिकेतल्या 'बाहुबली-२' ने २८ दिवसात हे साधले होते. मात्र रणवीरच्या या चित्रपटाने अवघ्या १८ दिवसांत हा इतिहास रचला आहे. ■

### 'बिग बॉस मराठी' ठरला महाराष्ट्रातील नंबर वन शो

**मुंबई**: मराठी दूरचित्रवाणी क्षेत्रात 'बिग बॉस मराठी' या लोकप्रिय वास्तव कार्यक्रमाने पुन्हा एकदा आपले वर्चस्व सिद्ध केले आहे. अलीकडील आकडेवारीनुसार, महाराष्ट्रातील अ-काल्पनिक कार्यक्रमांमध्ये 'बिग बॉस मराठी'ने या आठवड्यात सर्वाधिक दर्शकसंख्या मिळवत अव्वल स्थान पटकावले आहे. या यशामुळे कार्यक्रमाला प्रेक्षकांकडून मिळणारे सातत्यपूर्ण प्रेम अधोरेखित झाले असून, विविध भाषांमधील 'बिग बॉस' मालिकेची लोकप्रियता आणखी मजबूत झाल्याचे दिसून येत आहे. सध्या या कार्यक्रमाचे सहावे पर्व सुरू असून, लोकप्रिय अभिनेता रितेश देशमुख यांच्या प्रभावी सूत्रसंचालनामुळे या सिझनला विशेष रंग चढला आहे. त्यांच्या सहजसुंदर आणि प्रभावी शैलीमुळे प्रेक्षकांशी कार्यक्रमाची जवळीक वाढल्याचे मानले जाते.या यशाबद्दल प्रतिक्रिया देताना निर्मात्यांनी आनंद व्यक्त करत सांगितले की, विविध भाषांमध्ये दर्जेदार वास्तव कार्यक्रम सादर करण्याच्या त्यांच्या प्रयत्नांना प्रेक्षकांनी भरभरून प्रतिसाद दिला आहे. 'बिग बॉस मराठी'च्या या विक्रमी यशाचा भाग असल्याचा त्यांना अभिमान असल्याचे त्यांनी नमूद केले. ■

### 'मटका किंग'चा थरारक ट्रेलर प्रदर्शित

**मुंबई**: अभय कोरान्ने लिखित आणि नागराज मंजुळे यांच्या दिग्दर्शनाखाली तयार झालेली 'मटका किंग' या मालिकेचा ट्रेलर नुकताच




प्रदर्शित झाला आहे. ट्रेलर १९६० च्या दशकातील वेगाने बदलणाऱ्या बॉम्बेची कथा रंगवतो, जिथे एक महत्त्वाकांक्षी कापूस व्यापारी 'मटका' नावाचे धाडसी जुगार साम्राज्य उभारतो. मालिकेत विजय वर्मा प्रमुख भूमिकेत असून, कृतिका कामरा, सई ताम्हणकर, सिद्धार्थ जाधव, भूपेंद्र जादावत आणि गुलशन ग्रोवर हे महत्त्वाचे कलाकार आहेत. तसेच भारत जाधव, गिरीश कुलकर्णी, जेमी लीवर, किशोर कदम, सायरस साहूकार, अर्पिता सेठिया, संभाजी तांगडे, इश्तियाक खान, संजीव जोटांगिया आणि सिमरन अश्विनी यांच्याही भूमिका या मालिकेत पाहायला मिळणार आहेत. ही मालिका १७ एप्रिलपासून भारतासह जगभरातील २४० देशांमध्ये प्रदर्शित होणार आहे. ■

# शरणागत माओवादी देणार जवानांना प्रशिक्षण

## सुरक्षा दलांना शिकवणार आयईडीविरोधी कौशल्य; कार्यक्षमता वाढवणार

◆ **रायपूर, ९ एप्रिल**

जवानांना आयईडी विरोधातील कौशल्याचे धडे देण्यासाठी सुरक्षा दल शरण आलेल्या तज्ज्ञ माओवाद्यांचा वापर करून घेणार आहे. यामुळे सुरक्षा दलाची कार्यक्षमता वाढेल, अशी माहिती एका अधिकाऱ्याने गुरुवारी दिली. मागील चार दशकांपासून माओवादाचा प्रभाव अशलेल्या बस्तर क्षेत्र ३१ मार्च रोजी सशस्त्र माओवाद्यांपासून मुक्त झाल्याचे घोषित करण्यात आले होते. त्यानंतर ही रणनीती समोर आली आहे.



शरणागत माओवाद्यांच्या कौशल्याचा वापर करून बस्तरमधील आयईडी शोधून ते नष्ट करणे सुरक्षा दलांना सोपे होणार आहे. त्यामुळे हे पाऊल महत्वपूर्ण ठरेल, अशी माहिती एका अधिकाऱ्याने दिली. या भागात माओवाद्यांचा प्रभाव असताना पेरून ठेवेले आयईडी शोधून त्याच्या धोक्यापासून स्थानिक तसेच सुरक्षा दलाच्या जवानांनाही वाचवणे शक्य होईल. कांकेर जिल्ह्यातील दहशतवादविरोधी आणि जंगल युद्ध महाविद्यालयातील प्रशिक्षण कार्यक्रमांमध्ये मदत करण्यासाठी जवळपास २० माजी माओवाद्यांची निवड करण्यात आली आहे. यापैकी अनेकांना आयईडी हाताळण्याचा आणि त्यांचा वापर करण्याचा यापूर्वीचा अनुभव आहे, अशी माहिती बस्तर परिक्षेत्राचे पोलिस महानिरीक्षक सुंदरराज पी. यांनी दिली.

अशा उपकरणांची दाट जंगलातील प्रदेशात कशा प्रकारची जुळणी केली जाते, ती कशी लवपली जातात आणि कशी कार्यान्वित केली जातात, याविषयीचे प्रत्यक्ष क्षेत्रातील व व्यावहारिक ज्ञान सामायिक करण्यावर त्यांची भूमिका केंद्रित असेल. नागरी सुरक्षा सर्वोच्च प्राधान्याने जपत, सुरक्षा दलांची कार्यक्षमता वाढवणे हेच या उपक्रमाचे उद्दिष्ट असल्याचे त्यांनी सांगितले.

आत्मसमर्पण केलेल्या कार्यकर्त्यांच्या अनुभवांचा वापर करून या उपकरणांना अधिक चांगल्या प्रकारे समजून घेणे आणि त्यांना निष्प्रभ करणे, याद्वारे हा प्रदेश आयईडीच्या धोक्यांपासून मुक्त करणे हा या प्रयत्नांचा उद्देश आहे, असे सुंदरराज यांनी सांगितले. निवडलेल्या अनेकांनी माओवादी गटांमध्ये आयईडी हाताळणी आणि प्रशिक्षणात प्रमुख कार्यकारी भूमिका बजावल्या होत्या, असे त्यांनी सांगितले. ◀(वृत्तसंस्था)

### धोके कमी करण्यासाठी कार्यक्रम

हा प्रशिक्षण कार्यक्रम केवळ शोध घेण्याची आणि निकामी करण्याची क्षमता बळकट करण्यासाठीच नव्हे, तर आयईडी पेरलेल्या दुर्गम व वनक्षेत्रांमधील धोके कमी करण्यासाठी आणि स्थानिक जनतेचे प्राण व मालमत्ता सुरक्षित राखण्यासाठी तयार करण्यात आला आहे, असे सुंदरराज यांनी सांगितले. ■

### कच्च्या तेलाचे दर १८ टक्क्यांनी घसरले

**नवी दिल्ली** : कच्च्या तेलाचे दर फ्युचर ट्रेडिंगमध्ये १८ टक्क्यांनी कोसळून ८,७७५ रुपये प्रति बॅरलवर आहे. अमेरिका आणि इराणमधील दोन आठवड्यांच्या युद्धविरामावर आणि होर्मुझ सामुद्रधुनी पुन्हा सुरू करण्यावर सहमती झाल्यानंतर, भू-राजकीय जोखमीशी संबंधित अतिरिक्त दर संपुष्टात आल्यामुळे व्यापाऱ्यांनी मोठ्या प्रमाणात विक्री केली. सलग तीन दिवसांच्या तेजीला ब्रेक लावत, एमसीएक्सवर एप्रिल डिलिव्हरीचे कच्च्या तेलाचे वायदे सहा टक्क्यांनी घसरून १०,०२९ रुपये प्रति बॅरल या त्यांच्या 'लोअर सर्किट' मर्यादेवर उघडले. त्यानंतर या करारातील घसरण अधिकच तीव्र झाली. मागील बंद किंमत असलेल्या १०,६६९ रुपये प्रति बॅरवरून हा दर १,८९४ रुपयांनी म्हणजे १७.७५ टक्क्यांनी घसरून ८,७७५ रुपये प्रति बॅरलवर पोहोचला. ■

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## अग्रलेख...

# नि:श्वास की रोखलेला श्वास?

काही मुठी झाकलेल्या असतात तोवर त्यांच्या शक्तीच्या काल्पनिक भयाने अनेक जण थरकापून राहतात. पण दर्पोक्तीच्या फुत्कारांचे फवारे आदळून मूठ सैल होत गेली की आवळलेल्या मुठीमध्ये काहीच नाही, याची जगाला जाणीव होते आणि दर्पोक्तीचे हसे होते. आपल्या दुसऱ्या सत्ताकाळात, सन २०२५ पासून अमेरिकेला सर्वोच्च स्थानावर राखण्याचे सारे श्रेय स्वतःकडे ठेवण्याच्या हट्टापायी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी आपल्या कारकीर्दीत जेव्हा जेव्हा कोलांटउड्या मारल्या, तेव्हा तेव्हा ती झाकली मूठ उघडी होत गेली आणि ट्रम्प यांच्यावरील हेकेखोरीचा शिक्का ठळक होत गेला. जगात शांतता नांदावी यासाठी आपण अथक परिश्रम घेत असल्याचे भासविण्यामागेही, शांततेचे नोबेल पारितोषिक मिळविणे हाच हेतू असल्याचा अनेकांचा दावा पुढे त्यांच्या प्रत्येक कृतीनंतर सबळ होत गेला आणि ट्रम्प यांची झाकली मूठ उघडी पडत गेली. गेल्या वर्षभरात ट्रम्प यांनी शांतता करार घडविल्याचे आणि युद्धे थांबविण्याचे अनेक दावे केले, त्यामागेही शांततेचे नोबेल मिळविण्याची त्यांची धडपड होती हे स्पष्ट झाले. आपण सहा ते नऊ युद्धे संपविली आणि शांतता प्रस्थापित केली, अशी दर्पोक्ती करीत जगाच्या कल्याणासाठी आपला जन्म झाला असल्याचा व आपण सर्वशक्तिमान असल्याचा आभास निर्माण करणाऱ्या या नेत्याच्या कार्यशैलीमुळे जगाच्या नजरेसमोर असलेली 'शक्तिमान राष्ट्र' ही अमेरिकेची प्रतिमा आता संकटात सापडली असून शांतिदूत म्हणून मिरविण्याच्या धडपडीतून ट्रम्प यांच्यावर युद्धखोरीचा ठपका बसण्याच्या शक्यतेमुळे अमेरिकेच्या प्रतिष्ठेलाही धक्का बसला आहे.

२०२५ मध्ये नोबेल पुरस्कार मिळविण्याचे सारे प्रयत्न फोल ठरल्यानंतर २०२६ मध्ये तरी या पुरस्काराचे दावेदार ठरावे यासाठी गाझा संघर्षविरामाचे आणि अन्य राजनैतिक यशाचे पाढे स्वमुखाने वाचणाऱ्या ट्रम्प यांच्या कारकीर्दीला इराणविरुद्धच्या युद्धातील अविचारी हिंसाचाराची काजळी लागल्यामुळे जी काही नामुष्की झाली आहे, त्यातून सावरण्यासाठी व झाकली मूठ ताकदवान असल्याची जाणीव जगाला पुन्हा करून देण्यासाठी अमेरिकेला काही दशकांचा भविष्यकाळ कामी लावावा लागणार आहे. केवळ काही दिवसांत इराणची खामेनेई सत्ता उलथून टाकू आणि तेथील जनतेला अपेक्षित असलेली सत्ता प्रस्थापित करून देऊ, अशी दर्पोक्ती करीत तब्बल ४० दिवस इराणच्या विध्वंसाकरिता इरेस पेटून सारी ताकद पणाला लावलेल्या ट्रम्प यांच्या हेकेखोरीमुळे उद्भवलेल्या आर्थिक अस्थिरतेमुळे अवघ्या जगाने भविष्यभयाने आपला श्वास रोखून धरला होता. इराणची संपूर्ण संस्कृती इतिहासजमा करून इराणला पुन्हा अश्मयुगात धाडण्याचा अविवेकी इशारा देत आपल्या युद्धपिपासेचे विकृत दर्शन घडविणाऱ्या दर्पोक्तीच्या अंमलबजावणीच्या अखेरच्या क्षणी मात्र अचानक माघार घेत शांतता प्रस्थापित करण्याच्या प्रयत्नांचे श्रेय स्वतःच्या नावे जमा करण्याचा ट्रम्प यांचा नवा प्रयत्न म्हणूनच युद्धबंदीच्या या हतबल निर्णयाची नोंद घ्यावी लागेल. इराणची संस्कृती नष्ट करण्याचा इशारा देऊन त्यासाठी दिलेल्या मुदतीचा अंतिम क्षण नजीक येण्याच्या जेमतेम ९० मिनिटे अगोदर ट्रम्प यांनी पाकिस्तानला पुढे करून मांडला गेलेला युद्धबंदी प्रस्ताव मान्य केला आणि हजारोंचे बळी घेणारे हे युद्ध तात्पुरत्या स्वरूपात तरी थांबल्याच्या जाणिवेने जगाने नि:श्वास सोडला. पुढच्या दोन आठवड्यांत होऊ घातलेल्या वाटाघाटी आणि करारादी राजनैतिक औपचारिकतेतून जे काही निष्पन्न होईल, त्यावर या युद्धाचेच नव्हे, तर ट्रम्प यांच्या प्रतिमेचे आणि अमेरिकेच्या जागतिक वर्चस्वाचेही भवितव्य ठरणार असल्याची धाकधूक मात्र अजूनही संपलेली नाही. कारण युद्धबंदीचा प्रस्ताव उभय बाजूंनी स्वीकारल्यानंतर काही तासांतच पुन्हा इस्रायलने लेबनॉनवर भीषण हल्ला केल्याने मध्यपूर्वेतील युद्धाचे ढग अजूनही कायमच आहेत. बुधवारी इस्रायलने लेबनॉनवर केलेल्या हल्ल्यांचे रूप आतापर्यंतच्या संघर्षातील सर्वात भीषण होते. यामध्ये शेकडो निष्पाप नागरिकांचा मृत्यू झाला असून इराणने पुन्हा युद्धाचा इशारा जारी केला आहे. त्यामुळे युद्धबंदीचा हा निर्णय टिकणार की केवळ फार्स ठरणार, याकडे लक्ष लागलेल्या जगाचा श्वास पुन्हा एकदा रोखला गेला आहे. अमेरिकेसोबत शांतता करार करण्याबाबत वाटाघाटी होणार किंवा नाही, यावरच विचार करण्याची वेळ आल्याचा इशारा या हल्ल्यानंतर इराणने दिल्यानंतर, अमेरिका मात्र वाटाघाटींसाठी आग्रही असल्याचे जे चित्र रंगविले जात आहे, ते पाहता, अमेरिकेस या युद्धस्थितीतून बाहेर पडणे अपरिहार्य असल्याचेही स्पष्ट होऊ लागले आहे.

या अपरिहार्यतेची अनेक कारणे आहेत. पहिले म्हणजे, खामेनेई या इराणच्या सर्वोच्च नेत्याच्या मृत्यूनंतर अमेरिकेस अपेक्षित सत्तापालट घडवून आणणे शक्य झालेले नाहीच; उलट या हत्येमुळे इराणची प्रतिशोधाची ऊर्मी अधिक उफाळल्याने अमेरिकेच्या प्रत्येक हल्ल्यास जोरदार प्रत्युत्तर देत इराणने अमेरिकेस जेरीस आणले. ट्रम्प यांच्या दर्पोक्तीपुढे गुडघे न टेकता प्रत्येक आव्हानाचे उत्तर देण्याचा इराणचा निर्धार अखेरच्या क्षणापर्यंत अमेरिकी सैन्याचे मनोबल खच्ची करत होता आणि लक्षावधी डॉलर्सच्या युद्धसामग्रीचा पुरता विध्वंस झाल्याने अमेरिकेची युद्धक्षमताही खिळखिळी झाली होती. अमेरिका जेवढा काळ मैदानात असेल, तेवढ्या काळापर्यंत चिवट लढा देण्याचा इरादा वारंवार स्पष्ट करून इराणने अमेरिकेसमोर न झुकण्याचा घेतलेला पवित्रा हा अमेरिकेच्या सहज विजयाच्या स्वप्नरंजनास जबर धक्का देणारा ठरल्याने तेथील नागरिकांमध्येही ट्रम्प यांच्या हेकेखोर युद्धखोरीविषयी नाराजीचे स्पष्ट संगरूर उमटू लागले होते. इस्रायलचे बोट धरून ट्रम्प यांनी अमेरिकेस युद्धाच्या खाईत ढकलल्याची जाणीव व्यक्त होऊ लागल्यावर ट्रम्प यांच्या प्रतिमानिर्मितीच्या स्वघोषित प्रयत्नांना उतरती कळा लागल्याचे स्पष्ट झाले. अशा वेळी पाकिस्तानच्या हतबलतेचा फायदा घेण्याचा शहाणपणा ट्रम्प प्रशासनाने वेळीच दाखविला आहे. युद्धबंदीसाठी व संघर्ष थांबवून शांतता प्रस्थापित करण्यासाठी पाकिस्तान पुढाकार घेत असल्याचे चित्र जगासमोर आणले गेले आणि अमेरिकेचाच युद्धबंदीचा अप्रत्यक्ष प्रस्ताव पाकिस्तानमार्फत मांडला गेला.

शस्त्रसंधीच्या या पाकिस्तानी प्रस्तावावर बुधवारी इराण आणि अमेरिका-इस्रायल यांच्यात मतैक्य झाले असले, तरी हा शस्त्रसंधी दोन आठवडे टिकेल, याची खात्री नाही. या मतैक्यानंतर लगेचच इस्रायलने लेबनॉनला प्रस्तावाच्या कक्षेतून वगळण्याचा पवित्रा घेत केलेल्या हल्ल्यांमुळे युद्धाचे वातावरण पुन्हा चिघळले आणि शांतता प्रस्थापित करण्यासाठी पाकिस्तानला पुढे करण्याच्या प्रयत्नांवरही पाणी पडले. येत्या शनिवारपासून या प्रस्तावावर पाकिस्तानात अमेरिका-इराण यांच्यात चर्चा होणार असली, तरी इस्रायलचे हल्ले आणि इराणचे प्रतिहल्ले यांच्यामुळे या शस्त्रसंधीचे गांभीर्य हरवले आहे. इराणी संस्कृती इतिहासजमा करण्याच्या धमकीनंतर इराणवर आणि जगावर विध्वंसाच्या भीतीचे सावट गडद झाले होते, पण इराणचा बाणा आणि अमेरिकेतील जनमानसाचा कल यामुळे ट्रम्प यांना माघारीचा पर्याय निवडण्यासाठी हा प्रस्ताव उपयुक्त ठरला, एवढेच या प्रस्तावाचे नेमकेपण म्हणावे लागेल. लेबनॉनमधील धुमश्चक्रीनंतर पुन्हा एकदा होर्मुझ सामुद्रधुनीची नाकेबंदी झाली आहे. या सामुद्रधुनीवरील इराणचे वर्चस्व मोडून काढणे व इराणमध्ये सत्तापालट घडवून आणणे ट्रम्प यांच्या हेकेखोर प्रशासनास शक्य झालेले नाही. मग ४० दिवस विध्वंसक युद्ध करून, जगाला आर्थिक संकटात ढकलून आणि भावी पिढ्यांच्या भविष्यावर काजळी फेरणारी कारवाई करून ट्रम्प यांनी काय मिळविले, हा प्रश्न आता त्यांना जगभरातून विचारला जाणार आहे. या युद्धात सर्वाधिक होरपळ झालेल्या पाकिस्तानला सावरण्यासाठी त्यांच्या शांतिदूत भूमिकेचा काय फायदा होतो, हेदेखील या अशांत वातावरणाच्या अनिश्चिततेतून उघड होणार आहे. युरोपीय देशांनी या युद्धाकडे तटस्थतेने पाहिले. अशी भूमिका अंतिमतः राजनैतिकदृष्ट्या योग्य ठरली, हे येत्या दोन आठवड्यांतील घडामोडींनंतर जेव्हा जगाला पटेल, तेव्हा ट्रम्प यांच्या प्रतिमेचे भविष्य काय असेल, याचे उत्तरही सापडलेले असेल.

## अर्थविशेष

**हितेश पारसे**

# नागरिक, व्यावसायिक व करदात्यांसाठी टीडीएस मार्गदर्शक; आर्थिक वर्ष २०२५-२६ व २०२६-२७

भारताची करप्रणाली अधिक पारदर्शक, शिस्तबद्ध आणि डिजिटल करण्याच्या उद्देशाने स्रोतावर कर कपात (टीडीएस) ही प्रणाली अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावत आहे. पूर्वी टीडीएस हा केवळ कंपन्या किंवा मोठ्या व्यवसायांपुरता मर्यादित आहे, असा सर्वसामान्य समज होता; मात्र आजच्या काळात तो प्रत्येक आर्थिक व्यवहाराचा अविभाज्य भाग बनला आहे. आता सामान्य व्यक्ती किंवा एच.यू.एफ.सुद्धा अनेक व्यवहारांमध्ये टी.डी.एस. कापण्यास बांधील आहेत. त्यामुळे प्रत्येक करदात्याने टी.डी.एस.चे नियम, त्याची अंमलबजावणी आणि त्याचे परिणाम समजून घेणे अत्यंत आवश्यक झाले आहे.

टी.डी.एस. म्हणजे एखाद्या व्यक्तीला किंवा संस्थेला पैसे देताना त्या रकमेवर ठरावीक दराने कर कपात करून तो थेट सरकारकडे जमा करणे. ही प्रणाली कर संकलनाची आगाऊ पद्धत आहे, ज्यामुळे सरकारला वेळेवर महसूल मिळतो आणि करचुकवेगिरी कमी होते. टी.डी.एस. लागू होणारे घटक पाहता कंपन्या, पार्टनरशिप फर्म, एलएलपी तसेच ठरावीक टर्न ओव्हर मर्यादा ओलांडणारे प्रोप्रायटर्स यांना तर टी.डी.एस. कापणे बंधनकारक आहेच; परंतु सामान्य व्यक्तीलाही काही विशिष्ट व्यवहारांमध्ये टी.डी.एस. लागू होतो. उदाहरणार्थ, रु. ५०,००० पेक्षा जास्त मासिक घरभाडे देताना, रु. ५० लाखांपेक्षा जास्त किमतीची मालमत्ता खरेदी करताना किंवा कंत्राटदार/व्यावसायिकाला मोठे पेमेंट करताना टी.डी.एस. कापणे आवश्यक आहे. अनेकदा व्यक्ती या नियमांकडे दुर्लक्ष करतात, ज्यामुळे पुढे आयकर विभागाकडून नोटीस, व्याज आणि दंडाचा सामना करावा लागतो.

व्यक्तींसाठी विशेष महत्त्वाचे टी.डी.एस. नियम समजून घेतले तर घरभाड्यावर लागू होणारा टी.डी.एस. हा अत्यंत महत्त्वाचा आहे. कलम १९४ आयबी (नवीन ३९३आयबी) नुसार, जर एखाद्या व्यक्तीने दरमहा रु. ५०,००० पेक्षा जास्त भाडे दिले, तर त्यावर ५ टक्के टी.डी.एस. कापणे आवश्यक आहे. येथे विशेष बाब म्हणजे, व्यवसाय नसलेल्या व्यक्तीलाही हा नियम लागू होतो आणि टी.ए.एन. घेण्याची आवश्यकता नसते. वर्षातून एकदाच टी.डी.एस. कापून जमा करता येतो. त्याचप्रमाणे, मालमत्ता खरेदी करताना (कलम १९४ आयए/नवीन ३९३ आयए) जर मालमत्तेची किंमत रु. ५० लाखांपेक्षा जास्त असेल, तर १ टक्का टी.डी.एस. कापणे बंधनकारक आहे. हा नियम प्रत्येक खरेदीदाराला लागू आहे, जरी तो पहिल्यांदाच घर घेत असला तरी. तसेच, कंत्राटदार किंवा व्यावसायिकाला वर्षात रु. ५० लाखांपेक्षा जास्त पेमेंट केल्यास (कलम १९४ एम/नवीन ३९३ एम) २ टक्के टी.डी.एस. कापावा लागतो.




आर्थिक वर्ष २०२५-२६ साठी विविध व्यवहारांवर टी.डी.एस. चे दर निश्चित करण्यात आले आहेत. पगारावर टी.डी.एस. हा स्लॅबनुसार लागू होतो, तर बँक व्याजावर १० टक्के, कंत्राटावर १ टक्का किंवा २ टक्के, प्रोफेशनल फीवर १० टक्के, व्यावसायिक भाड्यावर १० टक्के, व्यक्तींकडून दिल्या जाणाऱ्या उच्च भाड्यावर ५ टक्के, मालमत्ता खरेदीवर टक्का आणि मोठ्या पेमेंटवर २ टक्के टी.डी.एस. लागू होतो. याशिवाय, एक अत्यंत महत्त्वाचा बदल म्हणजे १ एप्रिल २०२५ पासून लागू झालेला कलम १९४ टी (नवीन ३९३ टी). या तरतुदीनुसार, पार्टनरशिप फर्मने आपल्या पार्टनरला दिलेल्या वेतन, कमिशन, बोनस किंवा व्याजावर १० टक्के टी.डी.एस. कापणे आवश्यक आहे. जर एकूण रक्कम रु. २०,००० पेक्षा जास्त असेल. हा बदल विशेषतः लहान आणि मध्यम फर्मसाठी महत्त्वाचा आहे. कारण अनेकांना अजूनही याची पूर्ण माहिती नाही. वर्षाच्या शेवटी टी.डी.एस.चे पालन (वर्षाअखेरीस अनुपालन) करणे अत्यंत आवश्यक आहे. ३१ मार्चपर्यंत सर्व संबंधित खर्चांवर टी.डी.एस. कापणे बंधनकारक आहे तर ३० एप्रिलपर्यंत तो सरकारकडे जमा करणे आवश्यक आहे. यामध्ये ऑडिट फी, प्रोफेशनल फी, कंत्राट खर्च, कमिशन, भाडे, व्याज तसेच पार्टनरचे वेतन यांचा समावेश होतो. विशेष लक्षात ठेवण्याची बाब म्हणजे, जरी प्रत्यक्ष पैसे दिले नसले, तरी फक्त तरतूद केल्यावरही टी.डी.एस. कापणे आवश्यक असते. जर टी.डी.एस. नियमांचे पालन केले नाही तर त्याचे गंभीर परिणाम होऊ शकतात. संबंधित खर्च आयकर गणनेत नकार होतो, ज्यामुळे करदायित्व वाढते. तसेच, टी.डी.एस. न कापल्यास दरमहा १ टक्का आणि कापूनही जमा न केल्यास १.५ टक्के व्याज लागू होते. याशिवाय दंड आणि कायदेशीर कारवाईची शक्यतादेखील असते. आर्थिक वर्ष २०२६-२७ मध्ये काही महत्त्वाचे बदल करण्यात आले आहेत.

सर्वात महत्त्वाचा बदल म्हणजे विभाग क्रमांक मध्ये बदल, ज्यामध्ये १९४ मालिकेतील सर्व कलमे आता ३९३ मालिकेत रूपांतरित करण्यात आली आहेत (उदा. १९४ सी? ३९३ सी, १९४ जे? ३९३ जे, १९४ आयबी? ३९३ आयबी). त्यामुळे करदात्यांनी नवीन सेक्शन नंबर समजून घेणे अत्यावश्यक आहे. याशिवाय आर्थिक वर्ष आणि मूल्यांकन वर्ष ऐवजी 'कर वर्ष' ही संकल्पना लागू करण्यात येत आहे तसेच संपूर्ण प्रणाली अधिक सुलभ आणि डिजिटल करण्यात आली आहे, ज्यामुळे ए.आय.एस. आणि फॉर्म २६ एएस अधिक प्रभावी झाले आहेत. या बदलांमुळे भाडे व्यवहार, मालमत्ता व्यवहार आणि इतर आर्थिक व्यवहार अधिक पारदर्शक होणार असून करचुकवेगिरी करणे कठीण होणार आहे. सर्वसामान्य नागरिकांसाठी काही महत्त्वाच्या सूचना म्हणजे, भाडेकरूंनी रु. ५०,००० पेक्षा जास्त भाडे असल्यास टी.डी.एस. कापणे आवश्यक आहे, तर मालकांनी टी.डी.एस. कापला आहे का, हे तपासून आय.टी.आर.मध्ये त्याचा क्रेडिट घ्यावा. घर खरेदी करणाऱ्यांनी रु. ५० लाखांपेक्षा जास्त व्यवहारात १ टक्का टी.डी.एस. कापणे विसरू नये. तसेच व्यवसाय करणाऱ्यांनी ३१ मार्चपूर्वी सर्व टी.डी.एस. तपासून ३० एप्रिलपूर्वी तो जमा करणे अत्यावश्यक आहे. आजच्या काळात टी.डी.एस. हा केवळ व्यवसायापुरता मर्यादित राहिलेला नसून प्रत्येक व्यक्तीच्या आर्थिक व्यवहाराचा महत्त्वाचा भाग बनला आहे. रु. ५०,००० पेक्षा जास्त भाडे, रु. ५० लाखांपेक्षा जास्त मालमत्ता व्यवहार, वर्षअखेरीचे टी.डी.एस. पालन आणि नवीन सेक्शन नंबर यांची योग्य माहिती असणे अत्यावश्यक आहे. योग्य प्रकारे टी.डी.एस. पालन केल्यास आपण केवळ दंड वाचवत नाही, तर आपल्या आर्थिक व्यवहारांमध्ये पारदर्शकता, विश्वासार्हता आणि कायदेशीर सुरक्षितता सुनिश्चित करतो.

९०९६३३२३५३

(लेखक कर व मालमत्ता हस्तांतरण सल्लागार आहेत.)

## वेध

**प्रफुल्ल क. व्यास**

# पुणे तिथे काय उणे... बघा वाढताहेत गुन्हे!

महाराष्ट्रात झपाट्याने वाढणाऱ्या सायबर फसवणुकीच्या घटना समाजाच्या प्रत्येक स्तराला स्पर्श करीत आहेत. शेअर ट्रेडिंगमध्ये प्रचंड नफा, कमी कालावधीत पैसे दुप्पट, इनसाईड टिप्स अशा गोडबोल्यांनी लोकांना जाळ्यात ओढणाऱ्या टोळ्या आता अधिक संघटित, चलाख व निर्दयी झाल्याचे पावलोपावली जाणवू लागले आहे. पुण्यासारख्या शिक्षणनगरीत, जिथे जागरूकता आणि 'आयटी हब'मध्ये तिथेच दोन-सव्वादोन वर्षांत साडेचारशे कोटी रुपयांची फसवणूक होणे धक्कादायक आहे. मोबाईलवर आलेला एक कॉल, व्हॉट्सॲपवर आलेला एक मेसेज किंवा सोशल मीडियावर दिसलेली एक जाहिरात यातून लोकांच्या आयुष्यभराच्या बचतीवर डल्ला मारला जातो; नव्हे बरेचदा आपण स्वत:च तो फास स्वत:च्या गळ्यात टाकून घेतो. पुण्यात २०२४ मध्ये १९७ कोटी ६१ लाख, २०२५ मध्ये १६२ कोटी १९ लाख तर २०२६ मध्ये अवघ्या ४ महिन्यात ९२ कोटी २२ लाख असे ९८२ घटनांमध्ये साडेचारशे कोटींची फसवणूक झाल्याचे पुढे आले आहे. या व्यतिरिक्त पुण्यातील काही लोकांनी आपली फसवणूक झाली, यातून बदनामी होईल या भीतीपोटी तक्रारी दाखल केल्या नसतील. त्यांची संख्याही मोठी असण्याची शक्यता आहे. या सायबर अटॅकमध्ये शिक्षित, व्यावसायिक, निवृत्त व्यक्ती सर्वच वर्गातील लोक अडकले जातात. 'डिजिटल इंडिया'च्या युगात डिजिटल फसवणूकही तितक्याच वेगाने वाढते आहे, हे या निमित्ताने पुढे येत आहे. फसवणूक होत असल्याची जनजागृती केली जात असतानाही पुण्यासारख्या बुद्धिजीवींचे पैसे एका क्लीकमध्ये उडवण्याची शक्कल असलेले चोरटे किती हुशार असतील? विशेष म्हणजे कोणालाही ओटीपी देऊ नका, एटीएमची पिन कोणाला सांगू नका, असे आवाहन करीत असतानाही आपण फक्त आणि फक्त दुप्पटच्या मोहात अडकले जात आहोत. हा प्रताप केवळ पुण्यातच होतो आहे, असे अजिबात नाही. राज्यातच नव्हे, तर देशात 'विश्वास' देणाऱ्यांपेक्षा 'विश्वासघात' करणाऱ्यांची संख्या झपाट्याने वाढते आहे. अशा घटना राज्यात, देशात होऊ लागल्या आहेत. मात्र, घडणाऱ्या गुन्ह्यांच्या तुलनेत गुन्हेगार उघड होण्याची टक्केवारी नाममात्र आहे. त्यामुळे 'दुप्पट' पैसा करून देणाऱ्यांची संख्या 'दुप्पट'च्या वर गेली आहे. पुण्यात बुद्धी आणि पैशांनाही कमी नाही. हडपसर परिसरात वृद्ध 'डॉक्टर'ला कमी कालावधीत भरघोस परतावा देण्याचे आमिष दाखवून तब्बल १२ कोटी ३१ लाख रुपयांची फसवणूक करण्यात आली. समाजात उच्चशिक्षित आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम मानल्या जाणाऱ्यांचीही यातून सुटका नाही. नव्हे, या जाळ्यात अडकणाऱ्यांमध्ये त्यांचीच संख्या आहे. लवकर श्रीमंत होण्याची इच्छा, इतरांपेक्षा पुढे जाण्याची घाई, मोठ्या परताव्याची लालसा याचा गैरफायदा घेत चोरटे डल्ला मारत आहेत. बनावट प्रोफाईल तयार करून, खोटे स्क्रीनशॉट्स दाखवून, बनावट वेबसाईट्स तयार करून विश्वास निर्माण केला जातो. 'कस्टमर केअर'च्या नावाखाली संपर्क करून लोकांची वैयक्तिक माहिती घेतली जाते. काही ठिकाणी शेतकऱ्यांना शेतीसंबंधित गुंतवणुकीच्या नावाखाली फसवले जाते तर काही ठिकाणी तरुणांकडून नोकरीच्या नावाखाली पैसे उकळले जातात. शहरांमध्ये शेअर मार्केट आणि क्रिप्टोकरन्सीच्या नावाखाली लोकांना लुबाडणूक होण्याची संख्या वाढत चालली आहे. या पृष्ठभूमीवर पोलिस यंत्रणेसमोर मोठे आव्हान उभे राहिले आहे. कमी वेळात जास्त नफा फसवणुकीशिवाय मिळूच शकत नाही, हे सूर्यप्रकाशाएवढे स्पष्ट असतानाही आम्ही मात्र दुप्पटच्या मागे लागतो आणि लाखोची रक्कम हरवून बसतो. एखाद्या गरजूला (अडचणीत असलेल्या नातेवाईकांना) आर्थिक मदत देताना हजारदा विचार केला जातो. मात्र, कमी वेळात जास्त नफा मिळविण्याच्या नादात एका मिनिटात करोडे रुपये उडवले जातात. तंत्रज्ञान जितक्या वेगाने पुढे जात आहे, तेवढ्याच वेगाने फसवणुकीची नवनवीन शक्कलही लढवली जात आहे. आयते खाण्याची प्रवृत्ती वाढीस लागली आहे. या गुन्ह्यांमध्ये तरुणांचाच नव्हे, तर तरुणींचाही समावेश वाढतो आहे. राजस्थानातील एका मुलीने चक्क एका युवकाला प्रेमपाशात अडकवण्याचा प्रयत्न करून त्याची आर्थिक बाजू समजावून घेतल्याचा प्रकार गेल्या ऑगस्ट-सप्टेंबरमध्ये घडला. महिंद्रा कोटक नावाच्या एका फ्रॉड कंपनीने तर शेअर बाजारात टाकण्यासाठी स्वत: काही रक्कमही देण्याचा प्रकार घडला होता. या लोभात अनेक वर्धेकर अडकले आहेत. पावलोपावली फसगतीचा प्रकार घडत असतानाही आपण बेसावध का? फक्त पैशांसाठीच ना! पुणेकरांचाच विचार केल्यास 'पुणेकर गुंतले, ठग फक्त हसले' ही अजून एक नवीन म्हण प्रचलित होऊ नये म्हणजे झाले.

९८८१९०३७६५

## विशेष

**डॉ. संजय तांबे**


# होमिओपॅथीचे जनक डॉ. सॅम्युअल हॅनेमन

एप्रिल १७५५ हा दिवस मानवजातीच्या इतिहासामध्ये सुवर्णाक्षरांनी लिहिला गेला. कारण याच दिवशी जर्मनीमधील मैसेन या गावात वैद्यकीय क्षेत्रातील एका क्रांतिकारी युगपुरुषाचा जन्म झाला. डॉ. सॅम्युअल हॅनेमन यांनी होमिओपॅथी या नैसर्गिक, शास्त्रीय व मानवतावादी उपचार पद्धतीचा शोध लावून संपूर्ण जगाला एक अनमोल देणगी दिली. प्रतिकूल परिस्थितीशी झुंज देत, अपार कष्ट, अचाट बुद्धिमत्ता, ज्ञानलालसा आणि योग्य तेच स्वीकारण्याची दुर्दम्य इच्छाशक्तीच्या जोरावर त्यांनी मानवाला एक सुरक्षित व प्रभावी उपचार पद्धती प्रदान केली.

डॉ. हॅनेमन यांचे वडील चिनीमातीच्या भांड्यांचे रंगारी होते. घरची परिस्थिती अत्यंत बिकट असल्यामुळे त्यांना वयाच्या १२ व्या वर्षी प्रथम शाळेत जाण्याची संधी मिळाली. लहानपणापासूनच त्यांना गणित, भाषा व वनस्पतिशास्त्र यांची विशेष आवड होती. वयाच्या २० व्या वर्षी त्यांनी वैद्यकीय शिक्षणास सुरुवात केली आणि 'कमवा व शिका' या तत्त्वावर त्यांनी आपले शिक्षण पूर्ण केले. वयाच्या २४ व्या वर्षी एम.डी. पदवी संपादन करून त्यांनी वैद्यकीय व्यवसाय सुरू केला.

सुमारे १२ वर्षांच्या ॲलोपॅथिक व्यवसायानंतर त्यांना त्या काळातील अमानुष उपचार पद्धतींबद्दल वैफल्य वाटू लागले. रुग्णांना उपाशी ठेवणे, फटके मारणे, बांधून ठेवणे अशा पद्धती त्यांना मान्य नव्हत्या. त्यांनी या पद्धतींचा विरोध करून रुग्णांना सुसह्य उपचार मिळावेत यासाठी जर्मन सरकारकडे तक्रार केली. 'सर्वच रुग्ण वेडे नसतात, ते फक्त मानसिकदृष्ट्या आजारी असतात-' ही मानवी दृष्टिकोनाची संकल्पना त्यांनी सर्वप्रथम मांडली.

कुलन यांच्या 'मटेरिया मेडिका' या पुस्तकाचे भाषांतर करीत असताना त्यांना सिंकोना या वनस्पतीबद्दल माहिती मिळाली की, तिचा अर्क मलेरिया बरा करतो. याबद्दल संशय आल्याने त्यांनी स्वतःवर प्रयोग केला. काही दिवसांनी त्यांना मलेरियासारखी लक्षणे दिसू लागली. या अनुभवातून त्यांनी सखोल संशोधन करून एक महान सिद्धांत मांडला- 'जो पदार्थ निरोगी माणसात रोग निर्माण करू शकतो, तोच पदार्थ अशा प्रकारचा रोग असलेल्या रुग्णाला बरा करू शकतो.' यालाच 'समः समं शमयाति' किंवा 'जशास तसे' हा सिद्धांत म्हणतात. याच सिद्धांतातून होमिओपॅथी शास्त्राचा जन्म झाला.



डॉ. हॅनेमन यांनी आपल्या आयुष्यभर अथक परिश्रम करून ऑर्गनॉन, मटेरिया मेडिका आणि रिपर्टरी यांसारखे मौल्यवान ग्रंथ निर्माण केले. त्यांनी रोग, उपचार, आरोग्य आणि चेतनाशक्ती यांचा सखोल अभ्यास करून संपूर्ण वैद्यकीय क्षेत्रात नवा दृष्टिकोन दिला. त्यांनी असा तर्क मांडला की, कॉलरासारखे साथीचे रोग सूक्ष्म जिवांमुळे होतात. त्या काळी सूक्ष्मदर्शक (मायक्रोस्कोप) उपलब्ध नव्हता; परंतु नंतर मायक्रोस्कोपच्या शोधानंतर त्यांचा तर्क अचूक ठरला. त्यामुळे त्यांना एक निरीक्षणक्षम वैज्ञानिक, तत्त्वज्ञ, रसायनशास्त्रज्ञ, वनस्पतिशास्त्रज्ञ आणि भाषातज्ज्ञ अशा अनेक पदव्या देता येतात.

### भारत आणि होमिओपॅथी

भारतामध्ये सन १८३९ मध्ये होमिओपॅथीचा प्रवेश झाला. पंजाबचे महाराजा रणजितसिंह यांना झालेल्या आजारावर यशस्वी उपचार केल्यानंतर ही उपचार पद्धती भारतात लोकप्रिय झाली. सन १९३६ मध्ये सरकारमान्यता प्रक्रियेला सुरुवात झाली आणि १९५८ मध्ये विविध राज्यांमध्ये होमिओपॅथीला अधिकृत मान्यता मिळाली. आज भारतात जवळपास दोन लाखांहून अधिक होमिओपॅथिक चिकित्सक कार्यरत आहेत. महान कवी रवींद्रनाथ टागोर यांनी होमिओपॅथीला शास्त्रीयदृष्ट्या मान्यता दिली होती, तर राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी असे म्हटले आहे की, 'आरोग्यसेवेत होमिओपॅथीच भारतासारख्या गरीब व विकसनशील देशाला तारू शकते.'

### होमिओपॅथीचे प्रमुख फायदे

१. शरीर, मन व व्यक्तीच्या एकत्रित अभ्यासावर आधारित उपचार पद्धती.
२. आवश्यक तेवढ्याच तपासण्या व कमी खर्चिक औषधे.
३. औषधांचे व्यसन लागत नाही.
४. औषधे घेणे सोपे व चवीस रुचकर.
५. अत्यंत सुरक्षित व दुष्परिणामविरहित उपचार.
६. सर्व वयोगटातील रुग्णांसाठी उपयुक्त.
७. तीव्र, जुनाट व साथीच्या रोगांवर प्रभावी उपचार.
८. अनेक वेळा शस्त्रक्रिया टाळता येऊ शकते.
९. कुटुंब वैद्य (फॅमिली डॉक्टर) संकल्पना प्रत्यक्षात वापरली जाते.
१०. रुग्णाची प्रतिकारशक्ती वाढवून त्याला निसर्गाच्या जवळ नेते.

अशा या लोकविलक्षण, महान व मानवतावादी व्यक्तिमत्त्वाने जगाला दिलेली 'होमिओपॅथी' ही समाजोपयोगी उपचार प्रणाली आजही लाखो रुग्णांना आरोग्य व आशा देत आहे. अशा या होमिओपॅथीचे जनक ठरलेल्या डॉ. सॅम्युअल हॅनेमन यांना आज त्यांच्या २७१ व्या जयंतीनिमित्त शतशः प्रणाम.

(लेखक होमिओपॅथिक मेडिकल असोसिएशन ऑफ इंडियाचे उपाध्यक्ष आहेत.)

## सुरक्षित मातृत्व : प्रत्येक महिलेचा अधिकार

महिलांच्या सर्वांगीण विकासासोबतच सुरक्षित मातृत्व यासाठी प्रधानमंत्री मातृवंदन योजना लोकप्रिय होत आहे. गर्भवती महिला व स्तनदा मातेला सकस आहार घेण्यासाठी प्रोत्साहित करण्यासोबतच काम करणाऱ्या महिलांना वेतनातील नुकसान भरपाई मिळत असल्यामुळे राज्यात सुमारे ५ लाख ७० हजारांपेक्षा जास्त महिलांनी नोंदणी केली आहे. या योजनेमुळे मातामृत्यू तसेच बालमृत्यूचे प्रमाण कमी होण्यास मदत होत आहे. नागपूर विभागात चांगला प्रतिसाद असून जिल्ह्यात १८ हजार २६२ महिलांनी नोंदणी केली आहे. या माध्यमातून गरोदर माता आणि बालकांच्या सुदृढ आरोग्यासाठी लाभार्थीला आर्थिक मदत देण्यात येत आहे. पहिल्या मुलाच्या जन्माच्या वेळी ५ हजार रुपये तसेच दुसऱ्या मुलीच्या जन्माच्या वेळी ६ हजार रुपये थेट बँक खात्यात जमा करण्यात येतात. केंद्र शासनाच्या महिला आणि बाल विकास विभागामार्फत मातृवंदन योजना राज्यात राबविण्यात येत आहे. गर्भवती मातेला दैनंदिन मजुरी करावी लागू नये तसेच मजुरीमुळे होणारे आर्थिक नुकसान भरपाई देण्यासाठी या योजनेत तरतूद करण्यात आली आहे. त्यासोबतच दवाखान्यात प्रसूती आणि बालकांचे वेळेवर लसीकरण होत आहे. या योजनेसाठी लाभार्थी मातेचे आधार कार्ड आणि बँक खाते आधारशी लिंक करणे आवश्यक आहे. या योजनेच्या लाभासाठी लाभार्थ्यांचे उत्पन्न मर्यादा ८ लक्ष रुपये असणे आवश्यक आहे. योजना ऑनलाईन पद्धतीने राबविण्यात येत आहे. राज्यात ४२ लाख ९९ हजार महिला लाभार्थ्यांना प्रत्यक्ष लाभ मिळाला आहे. आतापर्यंत १ हजार ९३३ कोटी ९७ लक्ष रुपये पात्र लाभार्थी महिलांच्या बँक खात्यात थेट जमा करण्यात आले आहेत. नागपूर विभागात दिलेल्या उद्दिष्टांमध्ये नागपूर जिल्ह्यात १८ हजार २६२ लाभार्थ्यांच्या नोंदणीचे उद्दिष्ट देण्यात आले होते. पैकी १६ हजार २२० लाभार्थ्यांची नोंदणी झाली असून १५ हजार १६९ महिलांना थेट लाभ मिळाला आहे. १ एप्रिलपासून नव्याने ७८९ नवीन लाभार्थ्यांची नोंदणी झाली आहे. योजनेच्या लाभासाठी १८ ते ५५ वयोगटातील महिला पात्र आहे. अनुसूचित जाती व जमाती प्रवर्गासाठी उत्पन्नाची अट नाही. योजनेच्या लाभासाठी राज्य अथवा केंद्र शासनाच्या तसेच खाजगी आरोग्य केंद्रात गर्भधारणेची नोंदणी आवश्यक आहे.

**अनिल गडेकर** / नागपूर

## वाचक पत्रे

### प्लॅस्टिकमुक्त भारत

'प्लॅस्टिकमुक्त भारत' हा एक महत्त्वाचा उपक्रम आहे. याचा उद्देश पर्यावरण वाचवणे आणि प्रदूषण कमी करणे हा आहे. प्लॅस्टिक हा नष्ट न होणारा पदार्थ असून तो माती, पाणी आणि हवेच्या प्रदूषणाला मोठ्या प्रमाणात कारणीभूत ठरतो. यामुळेच भारत सरकारने प्लॅस्टिकमुक्त भारत मोहीम सुरू केली आहे. प्लॅस्टिकच्या पिशव्या, बाटल्या आणि अन्य वस्तू मोठ्या प्रमाणात वापरण्यात येतात. मात्र त्यांची विल्हेवाट लावणे कठीण होते. त्यामुळे नद्या, समुद्र आणि जमिनी प्रदूषित होतात. प्लॅस्टिकमुळे प्राण्यांचे आणि पक्ष्यांचे आरोग्य धोक्यात येते. माणसाच्या आरोग्यावरही वाईट परिणाम होतो. प्लॅस्टिकमुक्त भारतासाठी आपण कापडी पिशव्या, कागदी पिशव्या, स्टीलच्या भांड्यांचा वापर करायला हवा. सरकारने अनेक ठिकाणी सिंगल युज प्लॅस्टिकवर बंद घातली आहे. या मोहिमेत प्रत्येक नागरिकाने सहभागी होऊन पर्यावरण संरक्षणासाठी योगदान द्यावे. 'प्लॅस्टिकमुक्त भारत : सुंदर आणि निरोगी भारत' हे ध्येय डोळ्यांसमोर ठेवून आपण सगळ्यांनी प्रयत्न केले तर भविष्यातील पिढीसाठी एक स्वच्छ आणि प्रदूषणमुक्त भारत तयार करू शकतो.

**सोहम प्रशांत पेंडसे** / ९०२८६७५५१८

### मोबाईलच्या आहारी बालपण आणि तरुण पिढी

आज मोबाईल प्रत्येकाच्या आयुष्याचा अविभाज्य भाग बनला आहे. लहानांपासून तरुणांपर्यंत सर्वजण मोबाईलच्या वापरात गुंतलेले दिसतात. तंत्रज्ञानाने मानवाचे जीवन सोपे केले असले, तरी त्याचे दुष्परिणामही तितकेच गंभीर आहेत. विशेषतः बालपण आणि तरुण पिढी मोबाईलच्या आहारी जात असल्याची चिंताजनक स्थिती आहे. पूर्वीची बालपणं खेळ, मैदानी उपक्रम, मित्रांसोबतची मस्ती आणि कुटुंबातील संवाद यातून समृद्ध होत असे. आजचे बालपण मोबाईलच्या स्क्रीनमध्ये कैद झाले आहे. मुले तासन्तास व्हिडीओ गेम्स, कार्टून, यूट्यूब किंवा सोशल मीडियामध्ये गुंतलेली दिसतात. यामुळे त्यांच्या शारीरिक आणि मानसिक विकासावर विपरीत परिणाम होतो. तरुण पिढीमध्येही मोबाईलचे व्यसन वाढत आहे. सोशल मीडिया, ऑनलाईन गेम्स, नोटिफिकेशन्स यामुळे लक्ष विचलित होते. मोबाईल अतिवापरामुळे डोळ्यांचे विकार, लठ्ठपणा, चिडचिडेपणा, एकाग्रतेचा अभाव यांसारख्या समस्या उद्भवतात. तसेच, इंटरनेटवर उपलब्ध असलेली चुकीची माहिती किंवा अयोग्य कंटेंट मुलांच्या मनावर नकारात्मक परिणाम करू शकतो. मानसिक विकृतीची समस्या निर्माण तर होतेच; मुलं हिंसकही बनताहेत. मोबाईल व सातत्याने गेम खेळल्याने मुलांची कागदावर लिहिण्याची गती कमी झाली आहे; नव्हे त्यांना लिहिताच येत नाही. या समस्येवर उपाय म्हणून पालकांनी आणि शिक्षकांनी सजग राहणे आवश्यक आहे. मुलांनीही मोबाईलचा मर्यादित आणि योग्य वापर कसा करावा. मैदानी खेळ, वाचन, सर्जनशील उपक्रमांकडे वळले पाहिजे. कुटुंबात संवाद वाढविणे आणि मोबाईलशिवाय वेळ घालवण्याची सवय लावणेही महत्त्वाचे आहे.

**अनंत कपाळे** /९३७३१०२८९८

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# कर्ज फेडण्यासाठी ३ लाख देण्यावरून विवाहितेचा छळ

**सोलापूर, दि. ९ एप्रिल-**

तुझ्या आई व भाऊ याच्याकडे आमचे कर्ज फेडण्याकरिता ३ लाख रुपये घेऊनच ये तू जोपर्यंत माहेरून ३ लाख रुपये घेऊन येत नाही तोपर्यंत तू आमच्याकडे नांदण्यास यायचे नाही असे म्हणत विवाहितेचा पती, सासू व नणंद यांनी छळ केला.

यात हकीकत अशी की, दि. २६ नोव्हेंबर २०१० ते २४ ऑक्टोंबर २०२४ पर्यंत उज्वला रामा फाळके, वय २८, रा. पांढरे वस्ती झोपडपट्टी, जुना कारंबा नाका रोड, सोलापूर ही सासरी नांदत असताना रामा (पती), छाया (सासू), संगीता (नणंद) सर्व रा. एकतपुर, ता. सांगोला जि. सोलापूर यांनी तू फुकटची आमच्या घरात सून म्हणून आली आहे. तुझ्या लग्नात तुझ्या आई, वडील व भाऊ यांनी काही एक चांगला मानपान केला नाही. आम्हाला कर्ज झालेले आहे ते फेडण्याकरता तुझ्या आई-वडील व भाऊ यांच्याकडून ३ लाख रुपये आणून दे. तुझ्या आई व भाऊ याच्याकडे आमचे कर्ज फेडण्याकरिता ३ लाख रुपये घेऊनच ये तू जोपर्यंत माहेरून ३ लाख रुपये घेऊन येत नाही तोपर्यंत तू आमच्याकडे नांदण्यास यायचे नाही असे म्हणत शिवीगाळ, दमदाटी व मारहाण करून छळ केला. मानसिक व शारीरिक त्रास दिला. याबाबत दि. ९ एप्रिल रोजी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात तिघां विरोधात गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास ढोबळे करत आहेत.

---

## महाराष्ट्र महसूल व वन विभाग
## तहसीलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी कार्यालय अक्कलकोट यांच्या न्यायालयात
### संकलन अभिलेख कक्ष

दूरध्वनी नं. ९४२१९६९५१६ Email- tahakkalkot@.gmail.com

जा.क्र. २०२६/जन्म-मृत्यू/कावि/७७०/२०२६ दि. ०९/०४/२०२६

### जाहिर प्रसिध्दीकरण

प्रति,
**श्री. खादिर हुसेनी कटकटे** - **अर्जदार**
रा. बादोले बु. ता. अक्कलकोट
विरुध्द
**जन्म-मृत्यू नोंदणी, कार्यालय** - **सामनेवाला**
**ग्रामपंचायत, बादोले बु. ता. अक्कलकोट**

ज्याअर्थी, यातील श्री. खादिर हुसेनी कटकटे यानी त्यांचे वडील कै. हुसेनी इस्माईल कटकटे यांचा मृत्यू दि. ०४/०३/१९८४ रोजी मौजे बादोले बु. ता. अक्कलकोट येथील राहत्या घरी झालेला आहे. परंतु त्यांच्या मृत्यूची नोंद हे सामनेवाला यांच्या दप्तरी आढळून आले नाही. त्यामुळे. खादिर हुसेनी कटकटे यांनी त्याच्या वडीलांच्या मृत्यूची नोंद करुन घेऊन मृत्यू दाखला मिळण्याकामी जन्म-मुत्यू नोंदणी (दुरुस्ती) अधिनियम २०२३ चे कलम १३ (२) (३) प्रमाणे मा. तहसिलदार अक्कलकोट यांच्या न्यायालयात दि. ०३/१२/२०२५ अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदर अर्जाकामी अर्जदार यांनी त्यांच्या वडीलांच्या नावे हुसेनी इस्माईल कटकटे यांचा मृत्यू दाखला मिळणेकामी कोणाची हरकत अथवा म्हणणे असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात स्वतः अथवा आपल्या वकिलामार्फत हजर राहून आपले लेखी म्हणणे मांडावे. मुदतीत कोणचाही काही हरकत अथवा म्हणने न आल्यास कोणाचीही हरकत नाही असे समजून या अर्जाची चौकशी होऊन अर्जदारास संबंधीत दाखला देण्यात येईल. हे आज दि.०९/०४/२०२६ रोजी आमचे सहीने व कोर्टाचे शिक्याने प्रसिध्द केले असे.

(शिक्का)

**सही/-**
**(विनायक सुधीर मगर)**
**तहसीलदार, अक्कलकोट**

---

## करमाळा नगरपरिषद, करमाळा, जि. सोलापूर
### निविदा प्रसिध्दीकरण सुचना

जा.क्र.बावि/साशा/४७०/२०२६ दि. ०९/०४/२०२६

विविध शासकीय योजने अंतर्गत अनुभव पात्र असलेल्या वास्तुविराशद / आर्किटेक्ट / तांत्रिक सल्लागार यांचे कडून वैशिष्टयपूर्ण योजनेंतर्गत नमो उद्यान विकसित करणे या कामाकरीता वास्तुविराशद / आर्किटेक्ट / तांत्रिक सल्लागार नेमणूक करणे कामी अर्ज तांत्रिक, शैक्षणिक आर्हतेच्या व अनुभवाच्या कागदपत्रासह मागविण्यात येत आहेत.

अर्ज करमाळा नगरपरिषद कार्यालयामध्ये दि.१०/०४/२०२६ रोजी सकाळी ११.०० वा. ते दि. १३/०४/२०२६ रोजी दु. ४.०० वा. पर्यंत या कालावधीत सादर करावेत. या मुदतीनंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. तांत्रिक व शैक्षणिक आर्हता तपासणी शक्य झाल्यास दि. १५/०४/२०२६ दु. ५.०० वा. करणेत येईल.

कोणतेही अर्ज स्विकारण्याचा अथवा नाकरण्याचा अधिकार मुख्याधिकारी, करमाळा नगरपरिषद यांना राहिल.

**सही/-**
**अश्विनी जाधव**
**स्थापत्य अभियंता**
**मुकरमाळा नगरपरिषद**

**सही/-**
**सचिन तपसे**
**मुख्याधिकारी**
**मुकरमाळा नगरपरिषद**

---

### जाहीर प्रसिध्दीकरण

दिवाणी किरकोळ अर्ज नं. १४/२०२६
नि. १४

## बार्शी येथील मे. सिव्हील जज्ज ज्युनियर डिव्हीजन साहेब यांचे कोर्टात

१) **वाल्मीक नारायण जगताप**
वय - ५७ वर्षे, धंदा - शेती,
रा. गाडेगाव रोड, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर
२) **ऋषीकेश वाल्मीक जगताप**
वय २० वर्षे, धंदा - शिक्षण,
रा. गाडेगाव रोड, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर
— **सामनेवाला**
विरुध्द
**कोणी नाही** - **सा.वाला**

ज्याअर्थी संगीता वाल्मीक जगताप या दि. २७/०९/२०२५ रोजी बार्शी येथे मयत झालेले आहेत, त्यांचे कायदेशीर वारस म्हणून अर्जदार यांनी या मे. कोर्टात सदरहु मयत संगीता वाल्मीक जगताप यांचे पश्चात वारसा हक्क सांगण्यासाठी वारस प्रमाणपत्र मिळावे यासाठी अर्ज केला आहे.

त्याआर्थी सदरहु मयताचे अर्जदार वारस नाहीत अथवा अन्य कोणी वारस आहेत. असे कोणास सांगावयाचे असेल तर संबंधीतांनी या जाहिर प्रसिध्दीकरणाच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत अथवा नेमली ता. १८/०६/२०२६ रोजी या मे. कोर्टात हजर होऊन आपल्या लेखी हरकती दाखल कराव्यात. सदरहु मदतीत कोणाचे हरकती न आल्यास सदरहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल पुरावा घेऊन त्यांना मयत संगीता वाल्मीक जगताप यांचे पश्चात कायदेशीर वारस म्हणून वारस प्रमाणपत्र देईल. हे जाहिरप्रसिध्दीकरण दिले. ता. २५/०३/२०२६

**सही/-**
**कनिष्ठ लिपीक**

(कोर्टाचा शिक्का)

**सही/-**
**सहाय्यक अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय क. स्तर. बार्शी**

---

## सोलापूर महानगरपालिका, सोलापूर
**इंद्रभुवन आंबेडकर चौक, रेल्वे लाईन्स, सोलापूर ४१३००१**
**सार्वजनिक आरोग्य अभियंता (जलवितरण विभाग)**
**smcphewtr@gmail.com**

जा.क्र. साआअ/जल/०८ दिनांक :-०८/०४/२०२६

**सोलापूर महानगरपालिका, सोलापूर सार्वजनिक आरोग्य अभियंता कार्यालय**
**पाणीपुरवठा विभाग पाणी पुरवठा संबंधीचे निवेदन**

सोलापूर महानगरपालिका पाणी पुरवठा अंतर्गत जुळे सोलापूर MBR उंचावरील टाकीवरुन पाणी पुरवठा करणारी मुख्य पिण्याची पाईप लाईन आसरा पुलालगत कल्याणनगर जवळ रेल्वे ट्रॅक खाली नादुरुस्त होऊन पाण्याची मोठया प्रमाणात गळती होत आहे. सदर गळती दुरुस्तीचे फाम रेल्वे विभागाच्या संमतीने शुक्रवार, दि. १०/०४/२०२६ रोजी सोलापूर महानगरपालिकेमार्फत हाती घेणेत येणार आहे. दुरुस्तीचे काम रेल्वे रुळाच्या खाली व रेल्वे सिग्नलसाठी कार्यरत असलेले केबलची काळजी घेऊन करावे लागणार आहे. त्यामुळे दुरुस्तीचे काम करणेस बराच कालावधी लागणार असल्यामुळे संपूर्ण शहराचा पाणीपुरवठा शुक्रवार, दि. १०/०४/२०२६ पासून एक रोटेशन एक दिवसाने पुढे जाणार आहे. तरी कृपया नागरीकांनी दैनंदिन पाण्याचा वापर काटकसरीने करुन महानगरपालिकेस सहकार्य करावे ही विनंती आहे. क.दि. ०७/०४/२०२६

सही/- **उपायुक्त**
**सोलापूर महानगरपलिका, सोलापूर**

---



## कपडे खरेदी करायवास गेलेल्या महिलेची पर्स लंपास

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा दि.९ एप्रिल-**

मंगळवेढा शहरात कपडे खरेदी करावयास गेलेल्या एका ३८ वर्षीय महिलेची दुकानाच्या काऊन्टरवरुन पैसे असलेली पर्स पळविण्याचा प्रकार घडला असून या प्रकरणी अज्ञात चोरट्याविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे. यातील फिर्यादी रुपाली अंकुश भैसारे (रा.उजनी वसाहत,मित्रनगर) या दिनांक ८ एप्रिल रोजी सायंकाळी ६.३० वाजता मैत्रीणीसोबत कपडे खरेदी करण्यासाठी कपड्याच्या दुकानात गेल्या होत्या. यावेळी फिर्यादीने आपली पर्स काऊंटरवर ठेवून कपडे पाहत असताना चोरट्याने फिर्यादीची नजर चुकवून पैसे व आधार कार्ड,एटीएम कार्ड असलेली पर्स चोरुन नेली असल्याचे दिलेल्या फिर्यादीत म्हटले असून याचा अधिक तपास महिला पोलीस हवालदार सुनिताताई चवरे ह्या करीत आहेत.

---

## महाळुंग श्रीपूर नगरपंचायत, महाळुंग श्रीपूर
### जाहीर प्रसिध्दीकरण

**जा.क्र.९/२०२६** **दिनांक १०/०४/२०२६**

या जाहीर प्रसिध्दीकरणाद्वारे मर्व पुरवठादार यांना कळविण्यात येते की. महाळुंग श्रीपूर नगरपंचायत पाणीपुरवठा विभागाकरीता खालील तक्यातील मागणीप्रमाणे निविदा मागविणेत येत आहेत. पुढीलप्रमाणे सविस्तर बाबनिहाय माहिती व निविदा नगरपंचायत कार्यालयात कार्यालयीन वेळेन दिनांक १०/०४/२०२६ ते १७/०४/२०२६ रोजी पर्यंत उपलब्ध राहील तपशीलप्रमाणे रक्कम भरलेल्या दरपत्रके बंद लिफाफा पध्दतीत नगरपंचायत कार्यालयात दिनांक १०/०४/२०२६ ते १७/०४/२०२६ रोजी कार्यालयीन वेळेपर्यंत स्वीकारल्या जातील मुदतीनंतर आलेले दरपत्रके विचारात घेतल्या जाणार नाहीत. एक व कोणतीही दरपत्रके स्विकारणे अथवा नाकारणेच्या अधिकार नगरपंचायतकडून राखुन ठेवण्यात आलेला आहे.

| अ. न. | कामाचे नाव | बयाणा रक्कम | निविदा फी |
|---|---|---|---|
| १ | महाळुंग श्रीपूर नगरपंचायत जमदाडे प्लॉटिंगमध्ये नवीन ७५ मि.मी. ९०० फूट पीव्हीसी पाईपलाईन करणे | १,०००/- | ५००/- |
| २ | प्रभाग ८ बाबरी पुल येथे ७०० फूट ६३ मि.मी. पीव्हीसी पाईपलाईन करणे. | १,०००/- | ५००/- |
| ३ | महाळुंग श्रीपुर नगरपंचायत पाणीपुरवठा विभागाकडील १ एचपी ते ४५ एचपीपर्यंत विविध प्रकारचे पंप व मोटारी दुरुस्ती करणे. | १,०००/- | ५००/- |
| ४ | नगरपंचायत पाणीपुरवठा विभागाकरिता विहिरीवरील नवीन १२ एचपी पाणबुडी मोटारसंच २, व १० एचपी उजनी कॉलनी संपामधील पाणबुडी मोटरसंच २ पुरवठा करणे. | १,०००/- | ५००/- |
| ५ | महाळुंग श्रीपूर नगरपंचायत पाणीपुरवठा विभागाकरीता साहित्य पुरवठा करणे. | १,०००/- | ५००/- |
| ६ | ४ इंची एचडीपी पाईप ८० मीटर व एचडीपी पाईपचे जोडफिटिंगचे साहित्य पुरवठा करणेबाबत. | १,०००/- | ५००/- |

**टिप :- अ)** लिफाफा क्र. १ मध्ये पुढील कागदपत्रे जोडावीत. १. बयाणा रक्कम भरलेली पावाती. २. आधार कार्ड ३. पॅनकार्ड ३. उद्योम आधार जीएसटीसह लिफाफा क्र २ मध्ये अक्षरी व अंकात नमुद केलेले दर व योग्य पध्दतीने निविदाधारकांचे नमुद केलेप्रमाणे सांक्षाकित केलेल्या मुळ प्रतीतील निविदा दरपत्रक द्यावे.

(शिक्का)

**सही/-**
**मुख्याधिकारी**
**महाळुंग श्रीपूर नगरपंचायत**

---

## सुमित्रा ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या., अकलुज ता. माळशिरस जि. सोलापूर
### जाहीर फेर लिलाव क्रं. १

तमाम लोकांस/जनतेस कळविणेत येते की, खालील नमुद केलेल्या थकबाकीदार/जामिनदारांकडून सुमित्रा ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या. अकलूज, ता. माळशिरस, जि. सोलापूर या संस्थेच्या थकबाकी वसुलीपोटी त्यांच्या नावासमोर नमुद केलेल्या त्यांच्या मालकीची स्थावर मालमत्ता महाराष्ट्र सहकारी कायदा १९६० व महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ च्या नियम १०७ (१०) अन्वये जप्त केलेली आहे. सदरहु मिळकत खाली नमुद केलेल्या दिवशी ठिकाणी खाली सही करणारे वसुली व विक्री अधिकारी सुमित्रा ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या. अकलूज, ता. माळशिरस जि. सोलापूर यांचे समक्ष जसे आहे तसे या तत्वानुसार जाहीर लिलावाने विक्री करण्यात येईल.

| अ. क्र. | कर्जदार / जामिनदारांचे नाव | पत्ता | मिळकतदाराचे नाव | मिळकत ठिकाण | मिळकत क्रमांक | क्षेत्र हे.आर/चौ.मी. | दि. २८/०२/२०२६ अखेर येणे | फेर लिलाव दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | **सुजाता प्रमोद क्षिरसागर**<br>जा. १) किर्ती प्रमोद क्षिरसागर<br>जा. २) जैनुद्दिन अकबर शेख<br>जा. ३) अनिल विनायक माने | अकलूज<br>अकलूज<br>अकलूज<br>अकलूज | प्रमोद बाबूराव क्षिरसागर (संमतीदार) | अकलूज ता. माळशिरस | ९६/१/ब/२/प/५ | १८५.९७.०० हे.आर. चौ.मी. | ६८८५३०/- | २४/०४/२०२६ वार : शुक्रवार |
| २ | **सौ. महानंदा नागनाथ जमदाडे**<br>जा. १) शांतय्या इरय्या हिरेमठ<br>जा. २) शिवानंद धोंडीराम खताळ | महाळूंग<br>अकलूज<br>२१ चारी माळीनगर | महानंदा नागनाथ जमदाडे | महाळूंग ता. माळशिरस | ८७५/१<br>८८७/१ | १.६० हे.आर<br>०.५७ हे.आर | २३४५९१८/- | २४/०४/२०२६ वार : शुक्रवार |
| ३ | **राजेंद्र नागन्राय जमदाडे (मयत) वारस महानंदा नागन्राथ जमदाडे व नागन्राथ माधव जमदाडे**<br>जा. १) हनुमंत निवृत्ती यादव<br>जा. २) धोंडीराव महादेव खताळ | महाळुंग<br>बिजवडी<br>२१ चारी माळीनगर | महानंदा नागनाथ जमदाडे व नागनाथ महादेव जमदाडे | महाळूंग ता. माळशिरस | ८७५/२ | ३.०० हे.आर | २१९८१५६/- | २४/०४/२०२६ वार : शुक्रवार |
| ४ | **माधव तुकाराम जमदाडे (मयत) वारस**<br>१. सुशिला माधव जमदाडे<br>२. नागन्राथ माधव जमदाडे<br>२. भानुदास माधव जमदाडे<br>४. सखुबाई दादाराव कौलगे<br>५. शांताबाई मधुकर कौलगे<br>६. विमल सुनिल माने<br>७. बबीता विलास शिंदे<br>जा. १) महानंदा नागन्राथ जमदाडे<br>जा. २) शिवानंद धोंडीराम खताळ | महाळूंग<br>महाळूंग<br>२१ चारी माळीनगर | १. सुशिला माधव जमदाडे<br>२. नागनाथ माधव जमदाडे<br>३. भानुदास माधव जमदाडे<br>४. सखुबाई दादाराव कौलगे<br>५. शांताबाई मधुकर कौलगे<br>६. विमल सुनिल माने<br>७. बबीता विलास शिंदे | महाळूंग ता. माळशिरस | ८८७/२ | ३.०० हे.आर | २३०८४५१/- | २४/०४/२०२६ वार : शुक्रवार |

**लिलावाचे ठिकाण** : सुमित्रा ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था, मर्या., अकलूज, ता. माळशिरस, जि. सोलापूर

**टिप -** लिलावाच्या अटी व शर्ती संस्थेच्या कार्यालयात पहावयास मिळतील. कोणत्याही कारणाशिवाय लिलाव रद्द व तहकूल करण्याचा अधिकार वसुली अधिकारी यांनी राखून ठेवले आहे.

**दिनांक : ०९/०४/२०२६**
**ठिकाण : अकलूज**

(शिक्का)

**सही/-**
**वसुली व विक्री अधिकारी**
**सुमित्रा ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या.**
**अकलुज, ता. माळशिरस, जि. सोलापूर**

---

## भूमी संपादन पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम ११ (१) नुसार अधिसुचना

**क्र./एलएक्यू/एसआर/पोफळज/०३/२०२५**
**उपविभागीय अधिकारी कार्यालय माढा विभाग, कुर्डूवाडी दि.१२/०३/२०२६**

ज्या अर्थी, महाराष्ट्र शासन महसूल व वन विभागाची अधिसूचना क्र. मिस-११/२०१४/सी.आर.७७ (पार्ट-२)/ए-२ दि.११ सप्टेंबर २०१५ (यास यापुढे सदर अधिसुचना असे संबोधले जाईल) भूमी संपादन पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा वापार करुन असेल अधिसुचीत केले आहे की सदर अधिनियमाच्या कलम ३ (झ अ) अन्वये सार्वजनिक जमिनीच्या संपादनाबाबत १०,००० हेक्टर क्षेत्राच्या मर्यादेपर्यंत भूसंपादना संबंधात, अशा जिल्हयाचा जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी, **'समुचित शासन'** असल्याचे मानण्यात येईल.

त्या अर्थी, सदर अधिसुचने अन्वये जिल्हाधिकारी, सोलापूर हे समुचित शासन आहे. त्या अर्थी, परिशिष्ट १ मध्ये नमूद जमिन ही सार्वजनिक प्रयोजनासाठी संपादित करण्याची आवश्यकता आहे. किंवा आवश्यकता भासू शकते तसेच सार्वजनिक प्रयोजनाबाबतचे निवेदन परिशिष्ट २ मध्ये करण्यात आले आहे. त्या अर्थी सदर कायद्याचा कलम ११ उपकलम (१) अन्वये अधिसुचीत करण्यात येते की, सार्वजनिक प्रयोजनासाठी सदर जमिन संपादनाची आवश्यकता आहे किंवा आवश्यकता भासू शकते.

त्या अर्थी, परिशिष्ट ३ मध्ये भूसंपादनामुळे विस्थापित कुटूंबासाठी प्रस्तावित जमिन संपादनाची माहिती विनिर्दिष्ट करण्यात आली आहे.

आणि त्या अर्थी, परिशिष्ट ४ मध्ये समाजिक आघात निर्धारणाबाबतची संक्षिप्त माहिती विनिर्दिष्ट करण्यात आली आहे.

आणि त्या अर्थी, परिशिष्ट ५ मध्ये सदर कायद्याच्या कलम ४३ उपकलम (१) अन्वये कामकाज पार पाडणाऱ्या प्रशासकाचा तपशिल देण्यात आला आहे.

त्या अर्थी, सदर कायदद्याच्या कलम ११ उपकलम ४ अन्वये असे जाहिर करण्यात येते की, सदरची अधिसुचना प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून सदर कायद्याच्या प्रकरण ४ मधील कार्यवाही पूर्ण होईल अशा वेळेपर्यंत कोणतीही व्यक्ती, प्राथमिक अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या जमिनीचा कोणताही व्यवहार/हस्तांतर करणार नाही किंवा अशा जमिनीवर कोणताही बोजा निर्माण करणार नाही.

परंतु जिल्हाधिकारी अशा प्रकारे अधिसुचित केलेल्या जमिनीच्या मालकाने अर्ज केल्यावर लेखी नोंदवावयाच्या विशेष परिस्थितीमध्ये या पोटकलमाच्या अंमलबजावणीतून अशा जमिन मालकास सूट देऊ शकेल परंतु आणखी असे की, कोणत्याही व्यक्तीने, या तरतूदीचे जाणीवपुर्वक उल्लंघन केल्यामुळे तिला सोसाव्या लागलेल्या कोणत्याही नुकसानीची किंवा क्षतीची जिल्हाधिकाऱ्याद्वारे भरपाई करण्यात येणार नाही.

सदर कायद्याच्या कलम ११ चे उपकलम ५ व भूमी संपादन पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम २००४ चे कलम ५० उपकलम ३ अन्वये जिल्हाधिकारी विहित करण्यात येईल त्याप्रमाणे भूमी अभिलेख अद्यावत करण्याचे काम हाती घेईल.

आणि ज्या अर्थी, सदर कायद्याचे कलम ३ उपकलम (ग) अन्वये जिल्हाधिकारी, सोलापूर हे समुचित शासन असल्याने **उपविभागीय अधिकारी, माढा विभाग कुर्डूवाडी** यांना जिल्हाधिकारी यांचेवतीने कामे पार पाडण्यासाठी प्राधिकृत करीत आहे.

### परिशिष्ट १
**जमिनीचे वर्णन**

**गांवाचे नाव** : पोफळज **तालुका** :- करमाळा **जिल्हा** :- सोलापूर

| अ.क्रं. | गट नंबर | क्षेत्र (हे.आर) |
|---|---|---|
| १ | २३६ | २.४७ |

### परिशिष्ट २

**प्रकल्पाचे नाव** :- कुकडी डावा कालवा अंतिम वितरीका डावी चारी क्र. २, ३, ४, ५ व उजवी चारी क्र. ३, ४, ५ करिता उमरड चारी मौजे पोफळज ता. करमाळा, जि. सोलापूर
**प्रकल्पाचे विवरण** :- कुकडी डावा कालवा अंतिम वितरीका डावी चारी क्र. २, ३, ४, ५ व उजवी चारी क्र. ३, ४, ५ करिता मौजे पोफळज ता. करमाळा, जि. सोलापूर
**सामाजिक फायदे** :- जलसिंचन (सामाजिक, आर्थिक व इतर फायदे)

### परिशिष्ट ३
**पुनर्वसन विषयक बाबीचे विवरण**

**गांवाचे नाव** : पोफळज **तालुका** :- करमाळा **जिल्हा** :- सोलापूर

| अ.क्रं | स.नं/गट नं. | क्षेत्र (हे-आर) |
|---|---|---|
| | लागू नाही | - |

### परिशिष्ट ४
**सामाजिक आघात निर्धारण अहवालाचा गोषवारा**

### अनुसूची - चार

(सामाजिक प्रभाव निर्धारण अभ्यास करणाऱ्या अधिकाऱ्याने दिलेला) मा. अवर सचिव, महाराष्ट्र शसन यांचेकडील क्रमांक संकीर्ण-२०२५ प्र.क्र.४७/अ-३, दिनांक १६ सप्टेंबर २०२५ अन्वये सदर प्रकल्पाचे काम संपादन मडंळाने ताबा घेऊन पूर्ण झाले असल्याचे नमूद केले आहे. त्यामुळे प्रकल्प पूर्ण झाला असल्याने विधी व न्याय विभागाने अन्य प्रकरणी दिलेल्या अभिप्रायानुसार भूसंपादन अधिनियम, २०१३ मधील कलम १० (क) नुसार सदर प्रस्तावास पूर्वलक्षी प्रभावाने SIA सूट देता येऊ शकत नाही.

### परिशिष्ट ५

**प्रशासक नियुक्तीचे विवरण**
**१) प्रशासकाचे पदनाम** :- लागू नाही
**२) प्रशासकाचा कार्यालयीन पत्ता** :- लागू नाही
**३) ज्या अधिसुचनेद्वारे प्रशासकाची नियुक्ती केली ते नमूद करावे** :- लागू नाही

सदर अधिसुचनेद्वारे ज्या जमिनीची सार्वजनिक प्रयोजनाची आवश्यकता आहे किंवा आवश्यकता भासण्याचा संभव असल्याचे कायद्याच्या कलम ११ चे उपकलम १ खाली अधिसुचित करण्यात आले आहे. प्रारंभिक अधिसुचनेच्या प्रकाशनाच्या तारखेपासून ६० दिवसाच्या आत उपविभागीय अधिकारी, माढा विभाग कुर्डूवाडी यांचे कार्यालयात आक्षेप नोंदविता येईल.

**नोट - प्रस्तूत जमिनीचा नकाशा पाहणीसाठी उपविभागीय अधिकारी माढा विभाग, कुडूवाडी यांचे कार्यालयात उपलब्ध आहे.**

**स्थळ:- कुर्डूवाडी**
**दिनांक : १२/०३/२०२६**

**सही/-**
**(जयश्री आव्हाड)**
**उपविभागीय अधिकारी**
**माढा विभाग, कुर्डूवाडी**

**जिमाका/सो/जाहि/१४/२०२६-२७**






## महत्त्वाचे

### टेबल टेनिस : १९ वर्षांखालील मुलींची चमकदार कामगिरी

**शिमला :** येथे गुरुवारी पार पडलेल्या आशियाई युवा टेबल टेनिस अजिंक्यपद स्पर्धेच्या प्रादेशिक पात्रता फेरीत भारताच्या १९ वर्षांखालील मुलींच्या संघाने सलग केलेल्या वर्चस्वपूर्ण कामगिरीसह आपली अजिंक्य मालिका कायम राखली. सांघिक स्पर्धा पूर्ण झाल्यानंतर गुरुवारी हाती आलेल्या निकालांनुसार, भारताने चारपैकी तीन सांघिक विजेतेपदे - १९ वर्षांखालील मुली, १५ वर्षांखालील मुले आणि १५ वर्षांखालील मुली - पटकावलीत. या कामगिरीने कनिष्ठ स्तरावर देशाची ताकद व खेळाडूंची सखोल गुणवत्ता अधोरेखित झाली आहे. यजमान भारताला हुकलेले एकमेव विजेतेपद १९ वर्षांखालील मुलांच्या गटातील होते, या गटात अत्यंत चुरशीच्या लढतीत बांगलादेशने अव्वल स्थान पटकावले. या गटात भारताने आपला संघ मैदानात उतरवला नव्हता, कारण गत वर्षी ताश्कंद येथे झालेल्या आशियाई अजिंक्यपद स्पर्धेदरम्यानच भारताने या गटासाठीची पात्रता आधीच निश्चित केली होती. गुरुवारी यजमान भारताने नेपाळ, मालदीव आणि बांगलादेश यांच्यावर ३-० अशा एकतर्फी आणि निर्णायक विजयांची नोंद केली. यासह राऊंड-रॉबिन गुणतालिकेत भारताने सहजपणे अव्वल स्थान पटकावले. तत्पूर्वी, बुधवारीही यजमान संघाने श्रीलंकेचा अशाच मोठ्या फरकाने पराभव केला होता. चारही लढतींमध्ये विजय मिळवित भारताने या गटातील सुवर्णपदक केवळ कायमच राखले नाही, तर आगामी खंडीय अजिंक्यपद स्पर्धेसाठी अव्वल मानांकित संघ म्हणून पात्रताही मिळविली. दुसऱ्या स्थानावर राहिलेल्या श्रीलंकेने या प्रदेशातून पात्रतेचे दुसरे स्थान निश्चित केले. विविध गटांमधील एकेरी आणि दुहेरीच्या स्पर्धांना शुक्रवारपासून सुरुवात होणार आहे.

### राष्ट्रीय सब-ज्युनियर हॉकी पंजाब, मध्यप्रदेश उपांत्य फेरीत

**राजगीर :** येथे सुरू असलेल्या १६ व्या हॉकी इंडिया सब-ज्युनियर राष्ट्रीय हॉकी स्पर्धेच्या अ गटात गुरुवारी आपापल्या उपांत्यपूर्व सामन्यांमध्ये पंजाब, उत्तर प्रदेश आणि मध्य प्रदेश या संघांनी विजय नोंदविला आणि उपांत्य फेरीत धडक मारली. दादरा आणि नगर हवेली व दमण आणि दीव हॉकी संघाने चंदीगडचा २-१ ने पराभव करीत विजय मिळवला. दुसऱ्या उपांत्यपूर्व सामन्यात पंजाबने झारखंडविरुद्धच्या चुरशीच्या लढतीत ५-३ ने विजय संपादन केला. तिसऱ्या उपांत्यपूर्व सामन्यात उत्तर प्रदेशने ओडिशाचा ६-३ ने पराभव करीत विजय नोंदवला. मध्य प्रदेश आणि हरयाणा यांच्यातील सामना ०-० अशा बरोबरीत सुटला; त्यानंतर झालेल्या शूटआउटमध्ये मध्य प्रदेशने ४-३ ने बाजी मारीत विजय मिळविला.

### ब्राझीलच्या लॉरा कार्डोसोचा टी-२० मध्ये नऊ बळींचा विक्रम

**गॅबोरोन :** ब्राझीलची वेगवान गोलंदाज लॉरा कार्डोसोने विक्रमांच्या पुस्तकात आपले नाव कोरले आहे. पुरुष किंवा महिला २० क्रिकेटमध्ये एकाच डावात नऊ बळी घेणारी ती पहिलीच खेळाडू ठरली आहे. गॅबोरोन येथील बोत्सवाना क्रिकेट संघटनेच्या ओव्हल २ मैदानावर सुरू असलेल्या कालाहारी महिला २० स्पर्धेत कार्डोसोने लेसोथोविरुद्ध प्रभावी गोलंदाजी केली. तिने आपल्या तीन षटकांत ४ धावा देऊन ९ बळी अशी विलक्षण कामगिरी नोंदविली. टी-२० क्रिकेटच्या इतिहासातील ही आतापर्यंतची सर्वोत्तम गोलंदाजी आकडेवारी ठरली आहे. यापूर्वीचा विक्रम भूतानच्या सोनम येशेच्या नावावर होता. त्याने २०२५ मध्ये म्यानमारविरुद्धच्या पुरुष २० सामन्यात केवळ ७ धावा देऊन ८ बळी मिळवले होते.

### सोलापूर जिल्हा १३ वर्षांखालील बास्केटबॉल संघ निवड चाचणी

**सोलापूर :** ५१ व्या राज्यस्तरीय १३ वर्षांखालील बास्केटबॉल स्पर्धेसाठी सोलापूर जिल्हा मुले व मुलींचा संघ निवड चाचणी रविवारी १२ एप्रिल रोजी सायंकाळी ५ वाजता होम मैदानावरील बास्केटबॉल क्रीडांगण येथे होणार आहे. चाचणी या स्पर्धेसाठी १ जानेवारी २०१३ किंवा त्यानंतर जन्मलेले खेळाडू पात्र असतील. निवड चाचणीतून निवडलेले खेळाडू राज्य स्पर्धेत सोलापूर जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करतील. अधिक माहितीसाठी दिनेश सारंगी (मो. ९३५९४४४८५६) किंवा मुकिम खान (मो. ९९६०७९२४२२) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन शहर व जिल्हा बास्केटबॉल असोसिएशनचे सचिव साकीब शेख यांनी केले आहे.



आसाम विधानसभा निवडणुकीदरम्यान, क्रिकेटपटू रियान पराग मतदान करण्यासाठी गुवाहाटी येथील एका मतदान केंद्रावर दाखल झाला

### रियान परागने केले गुवाहाटीमध्ये मतदान

**गुवाहाटी :** आयपीएल फ्रॅन्चायझी असलेल्या राजस्थान रॉयल्सचा कर्णधार रियान पराग याने गुरुवारी आसाम विधानसभा निवडणुकीसाठी, आपले मूळ गाव असलेल्या गुवाहाटी येथे मतदान केले. सध्या सुरू असलेल्या इंडियन प्रीमियर लीग हंगामातील संघाचे सामने खेळण्यासाठी हा क्रिकेटपटू येथे उपस्थित आहे. हे सामने आसाम क्रिकेट संघटनेच्या स्टेडियमवर होत असून, हे स्टेडियम राजस्थान रॉयल्ससाठी दुसरे गृह मैदान आहे. रियानसोबत त्याचे आई-वडील, माजी प्रथम-श्रेणी क्रिकेटपटू पराग दास आणि राष्ट्रीय विक्रमवीर माजी जलतरणपटू मिथू बरुआदेखील उपस्थित होते. त्यांनी शहरातील खारघुली भागातील लाल सिंग अकादमी मतदान केंद्रावर आपले मतदान केले.

# राजस्थान-बंगळुरू सामना चुरशीचा होणार

◆ **गुवाहाटी, ९ एप्रिल**

१९ व्या इंडियन प्रीमियर लीग हंगामात फॉर्मात असलेला राजस्थान रॉयल्स शुक्रवारी येथे होणाऱ्या आयपीएल सामन्यात गतविजेत्या रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूशी (आरसीबी) दोन हात करणार आहे. राजस्थान आपले वर्चस्व कायम ठेवण्याचा प्रयत्न करेल, तर गतविजेता बंगळुरू सलग तिसरा विजय नोंदविण्यास उत्सुक असेल. त्यामुळे उभय संघादरम्यानचा हा सामना चुरशीचा होणार आहे, हे निश्चित.

आरसीबीची आघाडीची फळी विराट कोहलीच्या देखरेखीखाली स्थिर आहे. २०२४ मध्ये टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांपासून दूर राहूनही कोहलीच्या खेळात कोणताही गंज चढलेला दिसत नाही, तर फिल सॉल्टनेही गत सामन्यात तडाखेबंद फलंदाजी केली. तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजी करणाऱ्या देवदत्त पडिक्कलने आपला देशांतर्गत फॉर्म आयपीएलमध्येही कायम ठेवला आहे. देवदत्तने आक्रमक पण नियंत्रित दृष्टिकोनासह आपल्या सर्वोत्तम लयीत परतण्याचे संकेत दिले आहेत.



रजत पाटीदार



रियान पराग

गत हंगामात आरसीबीमध्ये देवदत्तचे पुनरागमन एक महत्त्वपूर्ण ठरले, कारण फ्रॅन्चायझीला अखेर पहिले आयपीएल विजेतेपद मिळवून देण्यात त्याने महत्त्वाची भूमिका बजावली. डावखुऱ्या फलंदाज देवदत्तने या हंगामाच्या सुरुवातीला सलग दोन अर्धशतके झळकावली आहेत. त्याने चेन्नईविरुद्ध ५० धावा व हैदराबादविरुद्ध ६१ धावा केल्या आणि ता आपला हा उत्कृष्ट फॉर्म कायम ठेवण्याचा प्रयत्न करेल.

कर्णधार रजत पाटीदार व फटकेबाज ऑस्ट्रेलियन खेळाडू टिम डेव्हिड यांच्यासारखे खेळाडू आरसीबीच्या मधल्या फळीत भक्कम आधार देतात. दुसरीकडे, यशस्वी जयस्वाल व युवा सनसनाटी वैभव सूर्यवंशी या सलामीच्या जोडीच्या जोरावर राजस्थान रॉयल्स संघ या हंगामातील सर्वात स्फोटक फलंदाजी करणाऱ्या संघांपैकी एक म्हणून उदयास आला आहे. या जोडीने सातत्याने दमदार सुरुवात करून दिली आहे, आणि निर्भय फटकेबाजीसह प्रतिस्पर्धी संघाच्या गोलंदाजीवर सुरुवातीलाच दबाव आणला आहे. सूर्यवंशीने विशेषतः आपल्या धाडसी फटकेबाजीने लक्ष वेधून घेतले आहे. त्याने गत सामन्यात जसप्रीत बुमराहच्या पहिल्याच चेंडूवर षट्कार मारला. एकीकडे या १५ वर्षीय वैभवने मथळ्यांमध्ये वर्चस्व गाजवले असले तरी, जयस्वालने शांतपणे आपला दर्जा दाखवविा आहे. त्याने मुंबई इंडियन्सविरुद्ध नाबाद ७७ धावा करून डावाला स्थैर्य दिले, यात त्याने संयम व आक्रमकतेचा मिलाफ साधला. त्यांची गोलंदाजीही अचूक ठरली आहे; स्पष्ट योजना आखून व त्यांची अचूक अंमलबजावणी करून, मग ते अचूक टप्प्यावर चेंडू टाकणे असो किंवा अखेरच्या षटकांमध्ये अचूक यॉर्कर टाकणे असो, राजस्थानला एक परिपूर्ण संघ बनवले आहे. ◀(वृत्तसंस्था)

**आजचा सामना**

**राजस्थान रॉयल्स वि. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू**
**स्थळ :** बारसपारा स्टेडियम, गुवाहाटी
**वेळ :** सायंकाळी ७.३० वाजतापासून
**थेट प्रसारण :** स्टार स्पोर्ट्सवर

# भारताची इंडोनेशियाविरुद्ध पिछाडी

## बिली जीन किंग चषक टेनिस ● वैष्णवीचा लढा अपुरा ठरला

◆ **नवी दिल्ली, ९ एप्रिल**

गुरुवारी नवी दिल्ली येथे पार पडलेल्या बिली जीन किंग चषकाच्या एशिया/ओशनिया गट-१ टेनिस स्पर्धेतील तिसऱ्या सामन्यात भारताला इंडोनेशियाविरुद्ध ०-१ ने पिछाडीवर जावे लागले.

या सामन्याची सुरुवातच भारतासाठी निराशाजनक ठरली; पहिल्या एकेरीच्या लढतीत वैष्णवी अडकरचा शर्थीचा लढा असूनही, तिला प्रिस्का मॅडेलिन नुग्रोहोकडून हृदयद्रावक पराभवाला सामोरे जावे लागले.

पुण्याची रहिवासी असलेली व जागतिक क्रमवारीत ३९१ व्या स्थानी असलेली ही २१ वर्षीय खेळाडू, वैष्णवी, डीएलटीए



स्टेडियमवर तब्बल तीन तास आणि सहा मिनिटे झुंजली. तिने आपल्या खेळातील सर्वस्व पणाला लावले असले तरी, जागतिक क्रमवारीत ४१९ व्या स्थानी असलेल्या प्रिस्काचा अडथळा पार करण्यात तिला अपयश आले. अखेर ७-६ (३), ६-७ (३), ३-६ अशा गुणांनी तिला पराभव पत्करावा लागला. आता भारतासमोर कठीण आव्हान उभे राहिले आहे. पुढील सामन्यात सहाजा यमलपल्लीचा सामना जागतिक क्रमवारीत ४१ व्या स्थानी असलेल्या जॅनिस त्जेनशी होणार आहे. तर, या फेरीतील तिसऱ्या सामन्यात दुहेरीची जोडी असलेल्या अंकिता रैना व ऋतुजा भोसले यांना अल्डिला सुत्जियादी आणि जॅनिस या जोडीचा सामना करावा लागेल.

बुधवारी थायलंडकडून १-२ असा पराभव पत्करावा लागल्यानंतर, भारताने न्यूझीलंडवर ३-० असा विजय नोंदवला. केवळ अव्वल दोन संघच प्ले-ऑफ फेरीसाठी पात्र ठरतील, तर तळाच्या दोन संघांची २०२७ सालासाठी गट-२ मध्ये अवनती होईल. भारत हा इंडोनेशिया, कोरिया, मंगोलिया, न्यूझीलंड आणि थायलंड या संघांच्या गटात समाविष्ट आहे. ◀(वृत्तसंस्था)

# भारताचे सर्वात वयस्कर कसोटीपटू गोपीनाथ यांचे निधन

◆ **चेन्नई, ९ एप्रिल**

भारताचे सर्वात वयस्कर हयात असलेले कसोटी क्रिकेटपटू सी. डी. गोपीनाथ यांचे गुरुवारी निधन झाले. ते ९६ वर्षांचे होते.



मिळालेल्या माहितीनुसार, गोपीनाथ यांचे चेन्नईच्या अड्यार येथील त्यांच्या मुलीच्या घरी, झोपेतच निधन झाले.

१९५२ मध्ये मद्रास येथे इंग्लंडविरुद्ध झालेल्या कसोटी सामन्यात भारताला पहिला-वहिला कसोटी विजय मिळवून देणाऱ्या संघातील हयात असलेले ते शेवटचे सदस्य होते.


आता ९५ वर्षीय, भारताचे व मुंबईचे माजी यष्टिरक्षक चंदू पाटणकर हे भारताचे सर्वात वयस्कर हयात असलेले कसोटी क्रिकेटपटू ठरले आहेत.

भारताचे सर्वात वयस्कर हयात असलेले कसोटी क्रिकेटपटू सी. डी. गोपीनाथ हे १९५१-५२ च्या मालिकेत भारताला पहिला कसोटी विजय मिळवून देणाऱ्या संघाचा भाग होते, त्यांचे निधन झाले आहे. एक खऱ्या अर्थाने सज्जन असलेले गोपीनाथ यांनी खेळाडू, निवड समिती सदस्य व प्रशासक म्हणून आपल्या कारकिर्दीत भारतीय क्रिकेटमध्ये मोलाचे योगदान दिले. भावपूर्ण श्रद्धांजली, असे पत्रकार राजदीप सरदेसाई यांनी आपल्या संदेशात म्हटले आहे. ◀(वृत्तसंस्था)

# आशियाई मुष्टियुद्धात भारताला चार सुवर्णपदके

### नागपूरच्या अल्फिया पठाणला रौप्य





मीनाक्षी हुडा

◆ **उलानबातर, ९ एप्रिल**

मंगोलियातील उलानबातर येथे आयोजित आशियाई मुष्टियुद्ध अजिंक्यपद स्पर्धेत भारतीय महिला मुष्टियोद्धांनी चमकदार कामगिरी करीत चार सुवर्णपदके पटकावली आणि आशिया खंडातील एक प्रमुख मुष्टियुद्ध शक्ती म्हणून भारताचे स्थान अधिकच बळकट केले. यात नागपूरच्या अल्फिया पठाणने रौप्यपदक पटकावले.

विद्यमान विश्वविजेती मीनाक्षी हुडा व प्रीती पवारने भारतासाठी सुवर्णपदकांची मालिका सुरू केली; त्यांच्यासह आणखी दोन सहकारी मुष्टियोद्धांनीही गुरुवारी झालेल्या अंतिम फेरीत विजय मिळवित आशियाई मुष्टियुद्ध विजेते होण्याचा मान पटकावला.

मीनाक्षी हुडा (४८ किलो गट) व आशियाई क्रीडा स्पर्धेतील कांस्यपदक विजेती प्रीती (५४ किलो गट) यांच्या जोडीला, प्रिया घांघास (६० किलो गट) व विश्व मुष्टियुद्ध चषक स्पर्धेतील सुवर्णपदक विजेती अरुंधती चौधरीनेही (७० किलो गट) विजेतेपदाचा मान मिळवित पदकतालिकेत अव्वल स्थान गाठले.

भारताला सर्वात मोठा धक्का ५७ किलो गटाच्या अंतिम फेरीत बसला. या फेरीत विद्यमान विश्वविजेती जैस्मिन लंबोरिया हिला थायलंडच्या, दोन वेळा विश्व अजिंक्यपद स्पर्धेत रौप्यपदक विजेत्या ठरलेल्या पुनरावी रुएनरोस (जिचे पूर्वीचे नाव जुतामास जितपोंग असे होते) हिच्याकडून ०-५ असा पराभव पत्करावा लागला.

भारताने आणखी एका रौप्यपदकाचीही कमाई केली, यात नागपूरची अल्फिया पठाण (८०+ किलो गट) उपविजेती ठरली. स्पर्धेतील आपल्या एकमेव लढतीत तिला कझाकस्तानच्या दिना इस्लामबेकोवा हिच्याकडून ०-५ असा पराभव स्वीकारावा लागला.

भारतीय महिला संघाने एकूण १० पदकांची (चार सुवर्ण, दोन रौप्य व चार कांस्य) अशी अत्यंत प्रभावी कामगिरी नोंदवत या स्पर्धेचा समारोप केला.

मीनाक्षीने मंगोलियाच्या नोमुंदारी एन्ख-अमगालनवर ५-० असा एकतर्फी आणि दणदणीत विजय मिळवत, भारताचे त्या दिवसाचे पहिले सुवर्णपदक पटकावून विजयाची नांदी केली.

पुरुषांच्या गटात, विश्वनाथ सुरेश (४८ किलो) व सचिन सिवाच (६० किलो) हे शुक्रवारी आपापल्या वजन गटांच्या अंतिम फेऱ्यांमध्ये लढतील. ◀(वृत्तसंस्था)


# संदेश गाडे सोलापूर जिल्हा क्रिकेट संघाचा कर्णधार

## १६ वर्षांखालील संघ जाहीर | आदिराज रणसिंग उपकर्णधार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ एप्रिल-**

सोळा वर्षांखालील जिल्हा क्रिकेट संघाच्या कर्णधारपदी संदेश गाडे व उपकर्णधारपदी आदिराज रणसिंग याची निवड करण्यात आली. निवड समितीचे चेअरमन सुनील मालप, सचिव चंद्रकांत रेंबर्सो, निवड समिती सदस्य अनिल जाधव, उदय डोके, शिवानंद अकलूजकर व किशोर बोरामणी यांनी हा संघ निवडला. हा संघ सोलापूर जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे सचिव चंद्रकांत रेम्बर्सु यांनी जाहीर केला.

या निवडीसाठी विविध टप्प्यांवर सामने घेऊन खेळाडूंची निवड करण्यात आली आहे. यावर्षी जिल्हा संघ निवडताना निवड समितीने प्रथम ६० मुलांची निवड केली होती. त्यांच्या दरम्यान चार संघ तयार करून एक दिवसांचे दोन सामने खेळविण्यात आले. त्यानंतर एकूण २६ मुलांची निवड करून त्यांचे दोन संघ तयार करण्यात आले. या संघांचे लातूर जिल्हा संघाबरोबर दोन दिवसांचे दोन सामने पार पडले. त्यानंतर निवडलेल्या दोन संघांमध्ये पुन्हा दोन दिवसांचा एक सामना खेळविण्यात आला. एकूण पाच सामन्यांनंतर कामगिरीच्या जोरावर संघ निश्चित करण्यात आला असल्याचे रेम्बर्सु यांनी सांगितले.



संदेश गाडे




आदिराज रणसिंग

**सोलापूर जिल्हा संघ:** संदेश गाडे (कर्णधार), आदिराज रणसिंग (उपकर्णधार), श्रवण माळी, मयंक पात्रे, फराहन सय्यद, झैद शेख, आदित्य माने, ऋग्वेद पाटील, ययाती देवकते, सार्थक कन्ना, सुजल गायकवाड, श्रीवर्धन नंदाल, ईश्वर सहारण, पृथ्वीराज खोडवे, राज सांगळे.

**राखीव:** नितिकेश गज्जम, सोहम बाबर, संकेत उबाळे, प्रणव जाधव.

**साउथ झोन संघ:** पृथ्वीराज कणसे, ओम होंगे, अनुज वाल्मिकी, देवदत्त केळकर, आयुष सावळे, अर्जुन दिड्डी.



# आयुष उपांत्यपूर्व फेरीत; सिंधू, प्रणॉय बाहेर

**निंगबो, ९ एप्रिल**

चीनमधील निंगबो येथे सुरू असलेल्या बॅडमिंटन आशिया अजिंक्यपद स्पर्धेत गुरुवारी आयुष शेट्टीने सलग सेट्समध्ये आणखी एक विजय नोंदवित उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला; मात्र पी. व्ही. सिंधू व एच. एस. प्रणॉयला अंतिम सोळाच्या फेरीतूनच स्पर्धेच्या बाहेर पडावे लागले.

विद्यमान यू.एस. ओपन विजेता असलेला २० वर्षीय आयुष याने पहिल्या फेरीत जागतिक क्रमवारीत सातव्या क्रमांकावर असलेल्या चीनच्या ली शी फेंगचा धक्कादायक पराभव केला होता. त्यानंतर, ४१ मिनिटांतच त्याने बीडब्ल्यूएफ क्रमवारीत २० व्या क्रमांकावर असलेल्या चीन तैपेईच्या ची यू जेनचा २१-१६, २१-१२ अशा दमदार फरकाने पराभव केला. जागतिक क्रमवारीत २५ व्या क्रमांकावर असलेला आयुष उपांत्य फेरीत स्थान मिळवण्यासाठी, २०२४ चा विजेता असलेल्या इंडोनेशियाच्या जोनाथन ख्रिस्टीचा सामना करेल. दोन वेळा ऑलिम्पिक पदक विजेती असलेल्या सिंधूला, जागतिक क्रमवारीत दुसऱ्या क्रमांकावर असलेल्या व या स्पर्धेची दोन वेळा विजेती ठरलेल्या चीनच्या वांग झी यी कडून १८-२१, ८- २१ असा पराभव स्वीकारावा लागला. दोन महिन्यांहून अधिक कालावधीनंतर सिंधूची ही स्पर्धेतील पहिलीच सहभाग होता. महिला एकेरीतील भारताचे आव्हानही संपुष्टात आले; उन्नती हुडाला जागतिक क्रमवारीत ९ व्या क्रमांकावर असलेल्या जपानच्या टोमोका मियाझाकीकडून १७-२१, ९-२१ असा पराभव पत्करावा लागला.

# थंडर्स व समर्थ इलेव्हन उपांत्य फेरीत


## ● इंडियन मॉडेल पॅरेंट्स क्रिकेट लीग : गुलमोहरची ग्लोबल वॉरियर्सवर मात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ एप्रिल-**

इंडियन मॉडेल पॅरेंट्स क्रिकेट लीग सोळाव्या पर्वात थंडर्स व समर्थ इलेव्हन संघाने उपांत्य फेरीत प्रवेश केला.

रेल्वे मैदानावरी डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्टेडियमवर सुरू असलेल्या या स्पर्धेत शेवटच्या साखळी सामन्यात थंडर्सने विशाल संघाचा ४६ धावांनी पराभव केला. थंडर्सने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. त्यांनी १२ षटकांत ३ गडी गमावून १२८ धावांचा डोंगर उभा केला. प्रत्युत्तरात विशाल संघ १० गडी बाद ८२ धावाच करू शकला. गुंडूराज गलगोंडा सामन्याचा मानकरी ठरला.

दुसऱ्या सामन्यात गुलमोहोर केके संघाने ग्लोबल वॉरियर्सवर १४ धावांनी मात केली. ग्लोबल वॉरियर्सने नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण स्वीकारले. गुलमोहोर केके संघाने १२ षटकांत ७ बाद ११० धावा केल्या. या आव्हानाचा पाठलाग करताना ग्लोबल वॉरियर्सचा संघ ९ गडी बाद ९६ धावांपर्यंतच मजल मारू शकला. प्रेम राठोड सामनावीर ठरला.



गुंडूराज गलगोंडा



प्रेम राठोड

**संक्षिप्त धावफलक**

**थंडर्स:** १२ षटकांत ३ बाद १२८(राजपाल सरवदे नाबाद ४३ धावा, प्रभुराज पितापुरे २२, सचिन गायकवाड २२ धावा, गजानन पिलगुलवार १५, इम्तियाज शेख १०, प्रविण शिंदे व निरंजन दसवडकर प्रत्येकी १ बळी ) **विजयी विरुद्ध विशाल:** १२ षटकांत सर्व बाद ८२ (विलाक कोडक १७, सुनील राठोड व सागर माळी प्रत्येकी १२, गुंडूराज ४ बळी, गजानन पितकुलवार व प्रभुराज पितापुरे (प्रत्येकी २ बळी) ).

**गुलमोहोर केके:** १२ षटकांत ७ बाद ११० (काशिनाथ कोळी ४२, प्रेम राठोड ३७, सचिन गोरे ३ बळी, योगेश भंडारी व सचिन कामुनी प्रत्येकी२ बळी ) **विजयी विरुद्ध ग्लोबल वॉरियर्स:** १२ षटकांत ९ बाद ९६ (सुनील खट्टे २०, अनिल अंकाराम १४, सचिन कामुनी १३, सोम नाथ किल्लेदार २ बळी, प्रेमनाथ सातपुते, संदीप व्हटकर व नितीन बोगे प्रत्येकी १ बळी)).

**असे होणार उपांत्यपूर्व सामने**

रॉयल्स विरुद्ध मॉडर्न, शिवशंभू विरुद्ध गुलमोहर केके

# खुल्या गटात सिद्धार्थ कोठारी प्रथम

● विश्वरत्न चषक बुद्धिबळ स्पर्धा
● अन्य गटात अनन्या उलभगत, पृथा ठोंबरे अजिंक्य

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. ९ एप्रिल-**

विश्वरत्न चषक बुद्धिबळ स्पर्धेत खुल्या गटात सिद्धार्थ कोठारी याने प्रथम क्रमांक पटकाविला.

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त व महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त संघमित्रा बहुउद्देशीय सामाजिक संस्था व समता बहुउद्देशीय सामाजिक संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच सोलापूर डिस्ट्रिक्ट चेस असोसिएशनच्या मान्यतेने ही स्पर्धा आयोजित केली होती.



प्रत्येक गटामध्ये ९ वे बक्षीस मुलींसाठी उत्तेजार्थ देण्यात आले. त्यामध्ये खुल्या गटामध्ये पद्मजा शहा, १५ वर्ष वयोगटामध्ये सान्वी लाडे व १० वयोगटामध्ये अन्वी दरपे यांनी पारितोषिक मिळविले.

**गुणानुक्रमे अंतिम निकाल (प्रथम आठ) : खुला गट :** सिद्धार्थ कोठारी, शंकर साळुंके, विजय पांगुद्वळे, चंद्रकांत पवार, दत्तात्रय गोरे, प्रसन्नजित जांभळे, संवी गोरे, आदिराज म्हेत्रे.

**१५ वर्षांखालील :** अनन्या उलभगत, साईराज गंभीरे, नोमान करमालकर, उमेर शेख, अथर्व बासर्गीकर, पर्व अग्रवाल, शुभम कदम, हर्ष कांबळे.

**१० वर्षांखालील :** पृथा ठोंबरे, मितांश सिंघवी, वेदांत क्षीरसागर, अनुश्री गोरे, स्नेहा लोळगे, प्रेम कबाडे,भव्या ओहळ, प्रीती लोळगे.

# अखेर सोलापूर-विजयपूर महामार्गावरील काटेरी झाडे काढली

## दैनिक 'तरुण भारत'च्या वृत्ताची दखल



**तभा वृत्तसेवा,**
**दक्षिण सोलापूर,दि. ३ एप्रिल-**

सोलापूर-विजयपूर महामार्गावरील सोरेगाव ते हत्तुर दरम्यान असणाऱ्या दुभाजकांमध्ये मोठ्या प्रमाणात काटेरी झाडांचे साम्राज्य वाढल्याचे दैनिक तरूण भारतमध्ये वृत्त प्रकाशित होताच काटेरी झाडे काढून फुलांच्या झाडांची छाटणी करण्यात आली आहे.

यामुळे वाहनचालक व प्रवाशांमधून दैनिक 'तरूण भारत'चे आभार व्यक्त करण्यात येत आहे. सोलापूर विजयपूर महामार्गावरील दुभाजकामध्ये काटेरी झाडे वाढल्याने वाहन चालकांना जखमा होत होते. याकडे राष्ट्रीय महामार्ग विभागाचे दुर्लक्ष होत होते. दुभाजकावरील काटेरी झाडे काढण्यात यावे अन्यथा राष्ट्रीय महामार्ग कार्यालयासमोर आंदोलन करण्याचा इशारा भंडारकवठेचे सरपंच भीमाशंकर बबलेश्वर यांनी दिला होता.

दैनिक 'तरूण भारत'च्या वृत्ताची दखल घेऊन राष्ट्रीय महामार्ग कार्यालयाकडून काटेरी झाडे काढून टाकण्यात आली आहेत. तसेच दोन वर्षांपासून फुलांच्या झाडांची छाटणी न केल्याने दुभाजकाबाहेर झाडांची वाढ झाली होती. राष्ट्रीय महामार्ग कार्यालयाने दुभाजकाच्या सौंदर्यासाठी छाटणी केली आहे.




### राष्ट्रीय महामार्ग विभागाचे कौतुक

वाहनचालकाच्या त्रासाची दखल घेऊन राष्ट्रीय महामार्ग विभागाने हत्तूर सोरेगाव रस्त्याच्या दुभाजकामधील काटेरी झाडे काढली आहेत. तसेच फुलांच्या झाडांची छाटणी केल्याने सौंदर्यात भर पडणार आहे. त्यामुळे राष्ट्रीय महामार्ग विभागाबद्दल प्रवाशांमधून कौतुक होत आहे.

**-भीमाशंकर बबलेश्वर,**सरपंच भंडारकवठे

## महत्वाचे...

### गणेश चौटे भारतीय जनता पार्टी सहकार सेलचे समन्वयक

**सोलापूर, दि. ९ एप्रिल-**

भारतीय जनता पार्टी, सोलापूर शहर जिल्हा यांच्या सहकार सेल (प्रकोष्ठ) ची नवीन कार्यकारिणी जाहीर करण्यात आली असून संयोजक गणेश चौटे यांची निवड करण्यात आली. महापौर श्री विनायक कोंड्याल, शहर अध्यक्षा रोहिणी तडवळकर, उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, सभागृह नेते नरेंद्र काळे, स्थायी समिती सभापती रंजीता चाकोते यांच्या प्रमुख उपस्थितीत ही कार्यकारिणी जाहीर करुन त्यांना नियुक्ती पत्रे देण्यात आली. पक्ष संघटना अधिक मजबूत करण्यासाठी तसेच सहकार क्षेत्रात प्रभावी काम करण्याचे त्यांनी आवाहन केले. अन्य कार्यकारिणी अशी : किशोर नारायणराव बसूदे व प्रशांत रामकृष्ण हबीब (सह संयोजक) प्रमोद सुनील पवार, कृष्णाथ खंडूसा दलमंजन, राकेश शंकर काशिगाव , अभिषेक श्रीनिवास पवार, सतीश मोतीलाल बिद्री , राहुल मोतीलाल शालगर, बसवराज शिवपुत्र इंडे, शिवानंद पंचय्या पुराणिक, श्रीनिवास मधुकर पेठकर, राजू गिरूसा पवार, चंद्रकांत बुडप्पा मिस्कीन व अर्जुन हणमंसा पवार (सदस्य).

### बनावट सोन्याचे लॉकेट देऊन केली २ लाख ४७ हजारांची फसवणूक

**सोलापूर, दि. ९ एप्रिल-**

सोन्यासारख्या दिसणारे बनावट लॉकेट देऊन एकूण ३ लाख रुपये इतकी रक्कम घेऊन त्यापैकी ५४ हजार रुपये त्यांना परत दिले आहे. उर्वरित २ लाख ४६ हजार रुपये परत न देता एका व्यक्तीची फसवणूक केली आहे. यात हकीकत अशी की, दि. १२ नोव्हेंबर २०२५ रोजी ते १९ नोव्हेंबर २०२५ च्या दरम्यान महावीर चौक येथे राजू चांद शेख, सारिका जगन्नाथ मोरे, अवधूत रामचंद्र माळी, सुरेश बळीराम मुळे, इसाक चांद शेख यांनी मिळून दर्याप्पा राजू हडपद, वय ३०, रा. सुदीप कॉम्प्लेक्स, गाळा नंबर ९, होडगी रोड, सोलापूर यांची अंदाजे ३ तोळे सोन्यासारख्या दिसणारे बनावट लॉकेट देऊन दरेप्पा हडपद यांच्याकडून २ लाख रुपये व दीड तोळे सोन्यासारखे दिसणारे बनावट लॉकेट देऊन १ लाख रुपये असे एकूण ३ लाख रुपये इतकी रक्कम फोन पे व रोग स्वरूपात घेतली असून त्यापैकी ५४ हजार रुपये त्यांना परत दिले आहे व उर्वरित २ लाख ४६ हजार रुपये परत न देता दर्याप्पा यांची फसवणूक केली आहे. याबाबत दि. ८ एप्रिल रोजी सदर बाजार पोलीस ठाण्यात पाच जणांविरोधात गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास काटे करत आहेत.

### माहेरुन पैसे घेऊन ये म्हणत विवाहितेचा छळ

**सोलापूर, दि. ९ एप्रिल-**

पैशाच्या कारणावरून विवाहितेचा सासर्यांनी छळ करत व्यवहार करण्यासाठी माहेरून ५ लाख रुपये घेऊन ये असे म्हणून हाताने मारहाण करून जीवे मारण्याची धमकी दिली आहे.ा हकीकत अशी की, ऑक्टोबर २०२४ ते २०२६ पर्यंत परवीन दस्तगीर बागवान, वय ३४, रा. प्लॉट नं. ४६ सर्वोदय नगर, जुना विडी घरकुल, हैदराबाद रोड, सोलापूर ही सासरी नांदत असताना दस्तगीर (पती), यास्मिन (सवत), खातून (सासू), सैफन (सासरे), अकबर (मोठे दीर), सुमया (मोठी जाऊ), आसान बागवान (लहान जाऊ) रा. मु.पो. काळे, ता. कराड, जि. सातारा यांनी पैशाच्या कारणावरून लग्नात हुंडा दिला नाही. मानपान केला नाही. संसार उपयोगी सामान दिले नाही. तू इथे राहायचे नाही. व्यवहार करण्यासाठी माहेरून ५ लाख रुपये घेऊन ये असे म्हणून हाताने मारहाण करून जीवे मारण्याची धमकी दिली. शिवीगाळ करून परवीन बागवान हिला शारीरिक मानसिक आर्थिक त्रास देऊन छळ केला. याबाबत सातजणां विरोधात एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास नवले करत आहेत.

### महिलेला चाकूचा धाक दाखवत सोन्याचे मिनी गंठण नेले चोरून

**सोलापूर, दि. ९ एप्रिल-**

दुकानाचे शटर खाली करून जात असताना तोंडाला काळे कापड बांधलेला एका व्यक्तीने मागे घरात येऊन महिलेच्या गळ्यातील ओढणीने तोंड दाबण्याचा प्रयत्न केला. त्याला महिलेने प्रतिकार केला असता त्याने खिशातील चाकू काढून १३ ग्रॅम वजनाच्या सोन्याचे मिनी गंठण चोरून नेले आहे. यात हकीकत अशी की, दि. ९ एप्रिल रोजी जयश्री अरुण केत, वय ७२, रा. १०५ / १०६ शिवगंगा नगर, भाग ४, मजरेवाडी, सोलापूर यांच्या दुकानाच्या बाहेरील आवारात साफसफाई करून पुन्हा दुकानात येऊन दुकानाचे शटर खाली करून घरात जात असताना एक अंदाजे २५ ते ३० वयाचा, अंगाने मध्यम बांधाच्या, तोंडाला काळे कापड बांधलेला व अंगात लाल रंगाचा पूर्ण कोट घातलेला अनोळखी इसम अचानक जयश्री केत यांच्या मागे घरात येऊन त्यांच्या हातातील पांढऱ्या रंगाच्या ओढणीने तोंड दाबण्याचा प्रयत्न केला. तेव्हा जयश्री यांनी त्याला प्रतिकार करत असताना त्याने त्यांच्या खिशातील चाकू काढून तो मारण्याची भीती दाखवून गळ्यातील १३ ग्रॅम वजनाच्या ७८ हजार रुपयांचे सोन्याचे मिनी गंठण चोरून नेला आहे. याबाबत एमआयडीसी पोलीस ठाण्यात अनोळखी इसमाविरोधात गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास चंदनशिवे करत आहेत.

### शर्टाच्या वरच्या खिशातील आयफोन नेला चोरून

**सोलापूर, दि. ९ एप्रिल-**

कन्ना चौक येथून एका अनोळखी इसमाने एका व्यक्तीची नजर चुकवून त्याच्या शर्टाच्या वरच्या खिशातील आयफोन चोरून नेल्याची घटना शहराच्या मध्यवर्ती भागात घडली आहे.यात हकीकत अशी की, दि. ३१ मार्च २०२६ रोजी आनंद मोहन जाधव, वय २७, रा. घर नंबर २६७ / १५१ रविवार पेठ, कुचन हायस्कूल जवळ, सोलापूर हे पेट्रोल संपत असल्यामुळे त्यांच्या मोटरसायकल वरून सार्वजनिक वाचणालय समोर कन्ना चौक येथे आले असता एका अनोळखी इसमाने ढकलून आनंद जाधव यांची नजर चुकवून त्यांच्या शर्टाच्या वरच्या खिशामध्ये ठेवलेला एक ऑरेंज रंगाचा आयफोन मोबाईल १८००० रुपयांचा हँडसेट चोरून नेला आहे. याबाबत दि. ९ एप्रिल रोजी जेलरोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास बाबर करत आहेत.

## निधन वृत्त...

### अशोक शेंडगे



**सोलापूर, दि. ९ एप्रिल-**

साखर पेठ येथील रहिवासी अशोक रामचंद्र शेंडगे (वय ८२) यांचे दिनांक ७ एप्रिल रोजी पुणे येथे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या मागे पत्नी, मुलगा, सून, मुलगी, जावई, नातवंडे असा परिवार आहे. ते व्हीजन ग्राफीक्सचे मालक नागेश शेंडगे यांचे चुलते होते

# रिक्षाला पाठीमागून धडक दिल्याने एकाचा मृत्यू

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ एप्रिल-**


रिक्षामध्ये पॅसेंजर घेऊन हायवे रोडने सोलापूरला येत असताना एकाने चार चाकी वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपणाने चालवून रिक्षाला मागून धडक दिल्याने त्यात एक जखमी झाला तर एकाचा मृत्यू झाला.

या हकीकत अशी की, दि. ७ एप्रिल रोजी अजय सदाशिव भडकुंबे, वय २८, रा. मु.पो. कोंडी, ता. उत्तर सोलापूर यांचा भाऊ संजय हा त्याची रिक्षा क्रमांक एम एच १२ सिटी ५४०७ यात पॅसेंजर घेऊन पुणे सोलापूर हायवे रोडने सोलापूरला येत असताना केगाव ब्रिजवर आला असता, रोहित यशवंत काकडे रा. सावळेश्वर, ता. मोहोळ जि. सोलापूर त्याच्या ताब्यातील हायवे पेट्रोलिंग चार चाकी वाहन क्रमांक एम एच १० सी आर ६२१४ ही भरधाव वेगाने, निष्काळजीपणाने चालवून अजय भडकुंबे यांच्या भावाच्या रिक्षाला मागून धडक दिल्याने त्यात पॅसेंजर जखमी झाले. भावास गंभीर जखमी करून त्यांच्या मृत्यू कारणीभूत ठरल्याप्रकरणी काकडे यांच्याविरोधात दि. ८ एप्रिल रोजी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास ढोबळे करत आहेत.

# आकांक्षा योजनेतील टॉयलेटमधील एसीची चोरी

## संबंधित विभागाच्या दुर्लक्षामुळे महापालिकेला फटका

## स्थायी समिती सभापती चाकोते यांच्या पाहणीत धक्कादायक बाब उघड



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ एप्रिल-**

सोलापूर महापालिकेने केंद्र शासनाच्या आकांक्षा योजनेतून शहरात उभारलेल्या एसी टॉयलेट प्रकल्पातील गंभीर निष्काळजीपणा पुन्हा एकदा समोर आला आहे. तब्बल २ कोटी रुपये खर्चून उभारलेल्या या टॉयलेटपैकी नाना-नानी पार्क ,अश्विनी हॉस्पिटलजवळ येथील टॉयलेटमधून दोन एसी यंत्रणा चोरीला गेल्याची धक्कादायक बाब उघडकीस आली आहे. महापालिकेने एसटी स्टँड, जुळे सोलापूर, अश्विनी हॉस्पिटल परिसर, नाना-नानी पार्क आणि पूर्व विभाग वाचनालय येथे प्रत्येकी ५० लाख रुपये खर्चून चार एसी टॉयलेट उभारले होते. मात्र, उभारणी होऊन तीन वर्षे उलटूनही ही सर्व टॉयलेट आजतागायत बंद अवस्थेतच आहेत.बुधवारी स्थायी समितीच्या सभापती रंजीता चाकोते आणि काही नगरसेविकांनी नाना-नानी पार्क येथील टॉयलेटची पाहणी केली असता, तेथील दोन एसी गायब असल्याचे निदर्शनास आले. यावर चाकोते यांनी संताप व्यक्त करत, ''येथे सुरक्षा रक्षक नसल्यानेच ही चोरी झाली,'' असे स्पष्ट केले. गेली तीन वर्षे टॉयलेट बंद असताना देखील महापालिकेने याकडे लक्ष दिले नाही आणि एसी चोरीला गेल्याची बाबही प्रशासनाच्या लक्षात आली नव्हती. यामुळे महापालिकेच्या कामकाजातील ढिसाळपणा आणि निष्काळजीपणा समोर आला आहे. दरम्यान, या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची मागणी होत आहे. संबंधित अधिकाऱ्यांवर काय कारवाई होणार याकडे आता लक्ष लागले आहे.



# वेळापुरात मुक्तेश्वर शिवाचार्य महास्वामीजींच्या महोत्सवानिमित्त ऐतिहासिक कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि.९ एप्रिल -**

श्री बृहन्मठ वेळापूरचे जेष्ठ मठाधिपती श्री.ष.ब्र.१०८ शिवाचार्य शिरोमणी मुक्तेश्वर शिवाचार्य महास्वामीजींचा अमृत आणि सुवर्ण पट्टाभिषेक महोत्सवानिमित्त ऐतिहासिक धार्मिक कार्यक्रमाची सुरुवात झाली.

सकाळी ध्वजारोहण कार्यक्रम श्री.ष.ब्र.१०८ गुरूलिंग शिवाचार्य महास्वामीजी (चिटगुप्पा), श्री.ष.ब्र.१०८ शिवशंकर शिवाचार्य महास्वामीजी (नेरपिंगळाई), श्री.ष.ब्र.१०८ सिद्धलिंग शिवाचार्य महास्वामीजी (नुल), श्री.ष.ब्र.१०८ मरूळाराध्य शिवाचार्य महास्वामीजी (चिटगुप्पा) आणि श्री बृहन्मठ वेळापूरचे नुतन मठाधीपती श्री.ष.ब्र.१०८ सदाशिव शिवाचार्य महास्वामीजी यांच्या हस्ते करण्यात आली. पहाटे गुरुगादीस रुद्राभिषेक संपन्न झाला. सकाळी ८.३० वाजता गणेशयाग व महारुद्रयाग स्वाहाकार कार्यक्रम ५१ दाम्पत्यांच्या हस्ते संपन्न होवून श्रीगुरूंच्या हस्ते दाम्पत्यांना शुभाशिर्वाद देण्यात आले. दुपारी भजन-किर्तन व संगीत करण्यात आले. त्यानंतर दुपारी ४.०० वाजता नवचंडी याग स्वाहाकार कार्यक्रम ५१ दाम्पत्यांच्या शुभहस्ते संपन्न होवून श्रीगुरूंच्या हस्ते दाम्पत्यांना शुभाशिर्वाद देण्यात आले.

सायंकाळी श्री.ष.ब्र.१०८ शिवाचार्य शिरोमणी मुक्तेश्वर शिवाचार्य महास्वामीजी यांचे नाणेतुला, श्रीफळतुला, पेढातुला, दूधतुला, गहूतुला, साखरतुला, गुळतुला व तांदूळतुला संपन्न होवून श्रीगुरू हस्ते दाम्पत्यांना शुभाशिर्वाद देण्यात आले.

### एकत्रित दर्शनाचा लाभ महाराष्ट्रात वीस वर्षानंतर

श्री रंभापुरी जगद्गुरु, श्री उज्जैन जगद्गुरु ,श्री काशी जगतगुरु चंद्रशेखर महास्वामी, काशी जगद्गुरु श्री डॉक्टर मल्लिकार्जुन शिवाचार्य महास्वामी,श्री शैल्य जगद्गुरु या सर्वांचा एकत्रित दर्शनाचा लाभ महाराष्ट्रात वीस वर्षानंतर होत आहे आहे

# व्रतस्थ पत्रकार म्हणजे सामाजिक मूल्यांचा राखणदार

## प्राध्यापिका डॉ. उज्वला बर्वे यांचे प्रतिपादन

## कल्पतरू कै. ल.गो. काकडे पत्रकार पुरस्कार प्रदान



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ एप्रिल-**

पत्रकारितेच्या स्थित्यंतराच्या काळात अनेक बदल होत असले तरी पत्रकारितेचा गाभा तोच राहणार आहे. वाचकांपर्यंत योग्य माहिती पोहोचवण्याचे व्रत घेतलेला व्रतस्थ पत्रकार म्हणजे सामाजिक मूल्यांचा राखणदार असतो, असे प्रतिपादन टिळक महाराष्ट्र विद्यापीठ (पुणे) येथील विद्यमान अधिष्ठाता आणि सावित्रीबाई फुले विद्यापीठ (पुणे) येथील संज्ञापन आणि वृत्तपत्रविद्या विभागाच्या सेवानिवृत्त प्राध्यापिका डॉ. उज्वला बर्वे यांनी केले.

देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण शिक्षणोत्तेजक संस्थेतर्फे देण्यात येणारा कल्पतरुकार कै. ल. गो. काकडे स्मृति पुरस्कार गुरुवारी ज्येष्ठ पत्रकार विजयकुमार देशपांडे यांना डॉ. बर्वे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. श्री हिराचंद नेमचंद वाचनालयाच्या लोकमान्य टिळक सभागृहात हा कार्यक्रम झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. रविंद्र चिंचोलकर होते. याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष प्रा. डॉ. श्रीकांत येळेगावकर, संस्थेचे उपाध्यक्ष दत्तात्रय आराध्ये, सहकार्यवाह प्रा. किरण कुलकर्णी, प्रमुख कार्यवाह प्रमोद जोशी, कोषाध्यक्ष सतीश पाटील, महिला शाखेच्या अध्यक्षा हेमा चिंचोळकर, युवक शाखेचे अध्यक्ष सुशांत कुलकर्णी उपस्थित होते.

यावेळी जेष्ठ पत्रकार देशपांडे यांना सन्मानचिन्ह, शाल, नॅपकिन बुके आणि पाच हजार रुपये रोख देऊन सन्मानित करण्यात आले. यानंतर डॉ. बर्वे यांचे ' पत्रकारिता - कालची, आजची आणि उद्याची' या विषयावर व्याख्यान झाले. याप्रसंगी 'राजकारण व पत्रकारिता' या विषयावरील ग्रंथलेखनाबद्दल रवींद्र चिंचोलकर यांचा विशेष सन्मान करण्यात आला. युवा अध्यक्ष सुशांत कुलकर्णी यांनी प्रमुख पाहुण्यांचा तर सहकार्यवाह प्रा. किरण कुलकर्णी यांनी कार्यक्रमाच्या अध्यक्षांचा परिचय करून दिला. उपाध्यक्ष दत्तात्रय आराध्ये यांनी पुरस्कारप्राप्त देशपांडे यांचा परिचय करून दिला. कार्यवाह श्याम जोशी यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष विजय कुलकर्णी, महिलाध्यक्षा हेमा चिंचोळकर,सल्लागार ॲड. अनिल काकडे, मंगला चिंचोळकर,संजय कुलकर्णी आदी उपस्थित होते.

# जुना वाद उफाळला: मध्यस्थी करणाऱ्या तरुणावर कोयत्याने प्राणघातक हल्ला

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग,दि. ९ एप्रिल-**

बाजार समितीमध्ये झालेल्या भांडणात मध्यस्थी केल्याचा राग मनात धरून एका २९ वर्षीय तरुणावर कोयत्याने हल्ला करून त्याला गंभीर जखमी केल्याची धक्कादायक घटना वैराग येथे घडली आहे. याप्रकरणी पीडित तरुणाने दिलेल्या तक्रारीवरून वैराग पोलीस ठाण्यात चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. एका चांगल्या हेतूने मिटवलेल्या वादाचे रूपांतर वैमनस्यात झाले आणि त्यातून एका तरुणाला आपल्या जीवाला मुकावे लागण्याची वेळ आली होती.

याबाबतची घटना अशी, सागर शिवाजी गरड (वय २९, रा. दत्तनगर, वैराग) असे जखमी तरुणाचे नाव आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, या घटनेची मुळे ५ एप्रिल रोजी झालेल्या एका वादात आहेत.वैराग मार्केट यार्ड येथे म्हशी पळवण्याच्या कार्यक्रमादरम्यान विक्रम सावंत आणि गणेश शिंदे यांच्यात जोरदार भांडण झाले होते. त्यावेळी सागर गरड याने पुढाकार घेऊन मध्यस्थी केली होती आणि दोघांमधील वाद मिटवला होता. मात्र, सागरने मध्यस्थी केल्याचा राग आरोपी विक्रम सावंत याच्या मनात होता. याच रागातून सागरला धडा शिकवण्याचे त्याने ठरवले. बुधवार, ८ एप्रिल रोजी सकाळी ७ वाजेच्या सुमारास, विक्रम सावंत आणि ओम चिकणे (दोघेही रा. सावंत गल्ली, वैराग) हे दोघे मोटारसायकलवरून सागरच्या घरी आले. तुझ्याकडे थोडे काम आहे, आमच्यासोबत चल, असे सांगून त्यांनी सागरला विश्वासात घेतले आणि त्याला दुचाकीवर बसवून लाडोळे रोडवरील खाणीजवळ नेले. त्या ठिकाणी पोहोचल्यानंतर, आधीच्या वादाचा राग काढून आरोपींनी सागरला लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण करीत त्याच्यावर कोयत्याने हल्ला करून गंभीर जखमी केले.जखमी सागर गरड याने वैराग पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार नोंदवली. पोलिसांनी या प्रकरणी विक्रम सावंत, ओम चिकणे आणि इतर दोन साथीदार अशा एकूण चौघांविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे. पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करत असून आरोपींचा शोध सुरू आहे.

**सार्वजनिक सूचना**

महाराष्ट्र शासनाच्या दिनांक ०८/०४/२०२६ रोजीच्या आदेशानुसार, सोलापूर जिल्ह्या तील भीमा नदीवरील खालील वाळू घाटां करिता वाळू उत्खनन हक्क **मेसर्स. मंगेश एंटरप्राइझेस** चे मालक **श्री. मंगेश संधू गडवे** रा.दांडगे निवास म्हाडा कॉलनी जालना-४३१२०३ यांना प्रदान करण्यात आले आहेत १) चिंचपूर वाळू घाट ८८३३ ब्रास

सदर करार दिनांक ३०/०९/२०२६ पर्यंत वैध असून प्रकल्पासाठी आवश्यक पर्यावरणीय मंजुरी प्राप्त असून संबंधित अटी व शासकीय नियमांनुसार उत्खनन करण्यात येत आहे.

सदर वाळू घाटाबाबत कोणत्याही व्यक्ती, संस्था किंवा सर्वसामान्य नागरिकांकडून माननीय राष्ट्रीय हरित अधिकरण अथवा इतर प्राधिकरणाकडे आक्षेप/कार्यवाही दाखल होण्याची शक्यता असल्याने, कंत्राटदाराकडून माननीय राष्ट्रीय हरित अधिकरण, पश्चिमी क्षेत्रीय पीठ पुणे येथे कॅव्हेट दाखल करण्यात येत आहे. त्यामुळे संबंधित विषयासंदर्भात कोणतीही कार्यवाही दाखल करावयाची असल्यास, प्रथम खाली सही करणाऱ्यास पूर्वसूचना देण्यात यावी, अशी सर्व संबंधितांना विनंती आहे.

दि: ०८/०४/२०२६, स्थळ : सोलापूर

**ADV. MANISH M. MORE**
**(BA, MA,MBA, LLB)**

**ADD :** Shop.no.20, KPCT Mall B Wing, Near Vishal Mega Mart, Fatima Nagar Pune-411013. **Mob No: 9860363560**
**E-Mail:** manishmore999@gmail.com

**IDFC FIRST Bank Limited**
(erstwhile Capital First Limited
and amalgamated with IDFC Bank Limited)
CIN : L65110TN2014PLC097792
Registered Office: KRM Towers, 8th Floor, Harrington Road,
Chetpet, Chennai-600031. TEL: +91 44 4564 4000 | FAX: +91 44 4564 4022.

IDFC FIRST Bank

**परिशिष्ट खत नियम ८(१)ताबा सूचना (स्थावर मालमत्तेसाठी)**

मी, अधोस्वाक्षरीकर्ता, IDFC FIRST Bank Limited (पूर्वीची Capital First Limited आणि IDFC Bank Limited मध्ये विलीन झालेली बँक)चा 'अधिकृत अधिकारी' (uthorised Officer) या नात्याने, वित्तीय मालमत्तेचे सिक्युरिटायझेशन आणि पुनर्रचना आणि सुरक्षा हितसंबंधांची अंमलबजावणी अधिनियम, 2002' (SRFESI act, 2002) अन्वये; तसेच सदर अधिनियमाचे कलम 13(12) आणि त्यासोबतच सुरक्षा हितसंबंध (अंमलबजावणी) नियम, 2002 (Security Interest (Enforcement) Rules, 2002) चा नियम 3 अन्वये मला प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, दिनांक 27/11/2024 रोजी एक 'मागणी सूचना' जारी केली होती. या सूचनेद्वारे कर्जदार, सह-कर्जदार आणि जामीनदार क्र. **१. रणजित शरद पाखरे** आणि क्र. **२. अजित शरद पाखरे** यांना, दिनांक 26.11.2024 रोजीची थकीत रक्कम जी रु. 5,23,634.15/- (अक्षरी: पाच लाख तेवीस हजार सहाशे चौतीस रुपये आणि पंधरा पैसे फक्त) इतकी आहे, ती सदर मागणी सूचना प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून 60 दिवसांच्या आत परतफेड करण्याचे आवाहन करण्यात आले होते. कर्जदारांनी सदर रक्कम परतफेड करण्यात कसूर केल्यामुळे, कर्जदार आणि सर्वसामान्य जनतेला याद्वारे सूचित करण्यात येते की, अधोस्वाक्षरीकर्त्याने सदर अधिनियमाचे कलम 13 चे उप-कलम (4) आणि त्यासोबतच 'सुरक्षा हितसंबंध (अंमलबजावणी) नियम, 2002' चा नियम ८ अन्वये मला प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, आज दिनांक 09 नोव्हेंबर 2025 रोजी खाली वर्णन केलेल्या मालमत्तेचा 'प्रत्यक्ष ताबा' घेतला आहे. विशेषतः कर्जदारांना आणि सर्वसामान्य जनतेला याद्वारे सावध करण्यात येते की, त्यांनी सदर मालमत्तेबाबत कोणताही व्यवहार करू नये. सदर मालमत्तेबाबत केलेला कोणताही व्यवहार हा IDFC FIRST Bank Limited (पूर्वीची Capital First Limited आणि IDFC Bank Limited मध्ये विलीन झालेली बँक) च्या, रु. 5,23,634.15/- (अक्षरी: पाच लाख तेवीस हजार सहाशे चौतीस रुपये आणि पंधरा पैसे फक्त) आणि त्यावर आकारले जाणारे व्याज, या रकमेच्या चार्जेच्या अधीन असेल. सुरक्षित मालमत्ता परत मिळवण्यासाठी उपलब्ध असलेल्या कालावधीच्या संदर्भात, कर्जदाराचे लक्ष सदर अधिनियमाचे कलम 13 च्या उप-कलम (8) मधील तरतुदींकडे वेधण्यात येत आहे.

**स्थावर मालमत्तेचे वर्णन**

सर्वे क्रमांक ३७/२ असलेले आणि १,५०० चौरस फूट क्षेत्रफळ असलेले जमिनीचे संपूर्ण क्षेत्र सांगवी ग्राम पंचायतीच्या दप्तरी नोंदवलेले आहे. ही जमीन सांगवी गाव, तालुका पंढरपूर, जिल्हा सोलापूर, महाराष्ट्र-४१३३०२ येथे स्थित असून, तिच्या चतु:सीमा खालीलप्रमाणे आहेत: पूर्व - ग्रामपंचायतीचा मोकळा भूखंड; पश्चिम - दिलीप सर्जेराव जाधव; उत्तर - ग्रामपंचायतीचा रस्ता; दक्षिण - मोकळा भूखंड.प्रकाशनाच्या तारखेपासून 60 दिवसांच्या आत रक्कम अदा करावी. असे करण्यात अयशस्वी झाल्यास, **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेडला (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, जी आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झाली आहे आणि सध्या खऊक्रऊ फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाते) देय असलेली रक्कम वसूल करण्यासाठी, सरफेसी कायद्याच्या कलम 13 (4) आणि कलम 14 अन्वये, वर नमूद केलेल्या गहाण ठेवलेल्या मालमत्तांविरुद्ध कार्यवाही सुरू करण्यास अधोस्वाक्षरीकर्ता बांधील राहील. शिवाय, उक्त कायद्याच्या कलम 13 (13) अन्वये, तुम्हाला उक्त तारण ठेवलेल्या मालमत्ता विक्री/भाडेपट्ट्याने किंवा इतर कोणत्याही प्रकारे हस्तांतरित करण्यास मनाई आहे.

**दिनांक : 09/11/2025**
**स्थळ : महाराष्ट्र**
**कर्ज खाते क्र. : 97679123**

**सही/-**
**प्राधिकृत अधिकारी, IDFC FIRST Bank Limited (पूर्वीची Capital First Limited आणि IDFC Bank Limited मध्ये विलीन झालेली)**

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



### एनसीईआरटीच्या अभ्यासक्रमात मराठा साम्राज्याचा नकाशा समाविष्ट करावा

**सोलापूर, दि. ९ एप्रिल-**

एनसीईआरटीने इयत्ता आठवीच्या अभ्यासक्रमातून मराठा साम्राज्याचा विस्तार दर्शवणारा नकाशा हटवण्याचा निर्णय घेतला आहे; या निर्णयाला संभाजी ब्रिगेडने तीव्र विरोध करुन पूर्वी जो मूळ नकाशा होता तो कायम ठेवण्याची मागणी भारताचे शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान त्यांच्याकडे ईमेलद्वारे करण्यात आली. याबाबतचे निवेदन निवासी उपजिल्हाधिकारी अभिजित पाटील यांच्याकडे देण्यात आले. मूळ नकाशाला विरोध केल्यानंतर त्यात बदल करून काही तत्कालीन राजपूत राज्ये वगळण्यात आली. त्यास ही विरोध करण्यात आल्यानंतर संपूर्ण नकाशाच काढून टाकण्यात आला. मराठा साम्राज्याचा इतिहास म्हणजे केवळ भूतकाळ नाही तर स्वाभिमान, पराक्रम आणि राष्ट्ररक्षणाची जाज्वल्य परंपरा आहे, असेही या निवेदनात नमूद आहे. यावेळी श्याम कदम, संभाजी भोसले, गणेश कदम, इशरत नागोरे, फिरोज सय्यद, जैनुद्दीन नदाफ, असद नागोरे आदी उपस्थित होते.

### महापालिका कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यांवर कार्यवाही करावी

**सोलापूर, दि. ९ एप्रिल-**

महापालिकेच्या कर्मचाऱ्यांना बाबतच्या विविध मागण्यांवर तत्काळ कार्यवाही करावी या मागणीचे निवेदन महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर ट्रेड युनियनच्यावतीने महापौर विनायक कोंड्याल यांना देण्यात आले.सोलापूर महानगरपालिकेकडील २४९ बदली रोजंदारी कर्मचाऱ्यांचा सेवेत कायम करुन न्याय मिळवून द्यावा. विनामूल्य विमा मेडिकल कॅशलेस सुविधा लागू करावी. जीएसटीच्या माध्यमातून ५ कोटी रुपयांची वाढीव मागणी करावी. विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त कर्मचाऱ्यांचे ॲडव्हान्स व वेतन १० तारखेच्या आत खात्यावर जमा करावे, असेही या निवेदनात नमूद आहे. यावेळी कामगार नेते बापूसाहेब सदाफुले, नगरसेवक विनोद भोसले, सत्यजित वाघमोडे यांच्यासह इक्बाल तडकल, अरुण म्हेत्रे, मुजीफ काझी, सुनील शिंदे उपस्थित होते.



### आपुलकी मित्रमंडळ फलकाचे अनावरण

**सांगोला, दि. ९ एप्रिल-**

सांगोला तालुक्यातील आपुलकी मित्र मंडळ, कडलास या संस्थेच्या फलकाचे अनावरण बाबुराव गायकवाड यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सुनिल पाटील, समाधान पवार, तानाजी पाटील, विजयसिंह पाटील, निशा देशपांडे व इतर मान्यवर उपस्थित होते. यावेळी मनोगतात संस्थेचे अध्यक्ष प्रा.डॉ.बबन गायकवाड यांनी संस्थेचे उद्दिष्ट व ध्येय सांगत सामाजिक, शैक्षणिक कार्यातून विद्यार्थ्यांना मदत व प्रोत्साहन देणार असल्याचे सांगितले. बाबुराव गायकवाड यांनी संस्थेस मदत करू असे सांगितले. संस्थेचे सचिव शहाजी पाटील यांनी आभार मानले.



### तामलवाडी पत्रकार संघटना अध्यक्षपदी संतोष मगर; उपाध्यक्षपदी गणेश गायकवाड

**सोलापूर, दि. ९ एप्रिल-**

तुळजापूर तालुक्यातील तामलवाडी येथील पत्रकार संघाची दि. ०९ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजता बैठक पार पडली. या बैठकीमध्ये नुतन पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली. यामध्ये संतोष मगर यांची अध्यक्षपदी, गणेश गायकवाड यांची उपाध्यक्षपदी तर अप्पुराजे भोसले भोसले यांची सचिवपदी एकमताने निवड करण्यात आली. धाराशिव जिल्हा पत्रकार संघ अंतर्गत तुळजापूर तालुक्यातील तामलवाडी येथे तामलवाडी पत्रकार संघ कार्यरत आहे. दि.०९ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजता तामलवाडी पत्रकार संघाची सुयोग हॉस्पीटल येथे ही बैठक पार पडली. या बैठकीमध्ये विविध विषयांवर चर्चा करण्यात आली व मागील कार्यकारिणीची मुदत संपल्याने नवीन पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली. यामध्ये पत्रकार संतोष मगर यांची अध्यक्षपदी तर पत्रकार गणेश गायकवाड यांची उपाध्यक्षपदी तसेच पत्रकार दत्तात्रय (अप्पुराजे) भोसले यांची सचिवपदी निवड करण्यात आली. सर्व पदाधिकाऱ्यांचा फेटा, शाल देऊन यथोचित सन्मान करण्यात आला व त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या. तसेच ग्रामीण भागात काम करत असताना पत्रकारांना अनेक अडचणीचा सामना करावा लागतो. अशा पत्रकारांच्या अडी अडचणी सोडवणे तसेच पत्रकारांवर होणारे अन्याय थांबले पाहिजेत यासाठी पत्रकार संघटना एकजुटीने कार्यरत राहील, असे उपाध्यक्ष गणेश गायकवाड यांनी बोलताना सांगितले. यावेळी दै. तरूण भारतचे वरिष्ठ उपसंपादक अविनाश गायकवाड, पत्रकार संतोष मगर, दादासाहेब काडगावकर, गणेश गायकवाड, सर्जेराव गायकवाड, उमाजी गायकवाड, सचिन शिंदे, दत्तात्रय (अप्पुराजे) भोसले, साधू शिंदे, किसन पांडगळे आदी पत्रकारबांधव उपस्थित होते.



# महापुरुषांच्या पुतळ्यांबाबत ग्रामस्थ, प्रशासन यांच्यात सकारात्मक तोडगा

▸ प्रशासनाच्या विनंतीला मान ▸ जिल्हाधिकारी यांचे आदेश ▸ मोडनिंब येथे शांतता कमिटीची बैठक

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि. ३ एप्रिल-**

मोडनिंब (ता. माढा) येथे ग्रामपंचायत समोर उभारण्यात आलेल्या छत्रपती शिवाजी महाराज आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या दोन्ही महापुरुषांच्या पुतळ्यांबाबत ग्रामस्थ व प्रशासन यांच्यात सकारात्मक तोडगा निघाला आहे. प्रशासनाच्या विनंतीला मान देत ग्रामस्थांनी स्वखुशीने सन्मानपूर्वक हे पुतळे काढण्याबाबतचा निर्णय घेतला.

सोलापूर जिल्ह्यातील मोडनिंब (ता.माढा) येथे माढ्याचे तहसीलदार संजय भोसले यांच्या अध्यक्षखाली पुतळ्यासंदर्भात जिल्हाधिकारी सोलापूर एस. कार्तिकेयन यांच्या आदेशावरून शांतता कमिटीची बैटक घेण्यात आली. यावेळी टेंभूर्णी पोलिस ठाण्याचे प्रभारी राहुल आत्राम, गटविकास अधिकारी महेश सुळ, पोलिस निरीक्षक महेश ढवन, पोलीस उपनिरीक्षक प्रशांत मदने, ग्रामविकास अधिकारी ज्ञानेश्वर कांबळे उपस्थित होते.

छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा काढण्याचे आवाहन प्रशासनाने केले. त्यास सहमती दर्शवत ग्रामस्थांनी संध्याकाळपर्यंत दोन्ही पुतळे आम्ही स्वतः हून काढून घेण्याचे आश्वासन दिले. दरम्यान, दोन्ही पुतळे संदर्भातील अधिकृत मान्यता मिळणेबाबत प्रशासकीय स्थरावर सहकार्य मिळावे अशी अशा ग्रामस्थांनी व्यक्त केली.

**कायदा, सुव्यस्थेचा प्रश्न निर्माण**

सोलापूर जिल्ह्यातील मोडनिंब, चिखलठाण, पुनवर, अंकोली, मोहोळ, परिते, भेंड, अंजनगाव, भोसे, चव्हाणवाडी येथे रातोरात पुतळे उभारले गेले आहेत. अंजनगाव येथे छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा उभारणीनंतर गावात कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला होता.

**मोडनिंबकरांचे अनुकरण करावे**

मोडनिंब शहरातील ग्रामस्थांनी आज संध्याकाळ पर्यंत दोन्ही पुतळे स्वतःहून सन्मानपूर्वक काढून घेण्याचे आश्वासन दिले. या निर्णयाचे पोलीस प्रशासनाकडून स्वागत करतो. या प्रमाणेच इतर गावांनीही मोडनिंबकरांचे अनुकरण करावे, असे टेंभुर्णी पोलिस ठाण्याचे प्रभारी राहुल आत्राम यांनी सांगितले.

**ऐतिहासिक निर्णय घेण्यात आला**

जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशावरून शांतता कमिटीची बैठक घेण्यात आली, मोडनिंब ग्रामस्थांनी पुतळे काढण्याचा इतिहासिक निर्णय घेतला. इतर गावांनीही याचा आदर्श घ्यावा, असे तहसीलदार भोसले यांनी सांगितले.

# देवापासून जो विभक्त होत नाही तो खरा भक्त : काळे

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.९ एप्रिल-**

दास्यभक्ती, सख्यभक्ती, अर्चनभक्ती, श्रवणभक्ती असे भक्तीचे विविध प्रकार आहेत. भक्तीमध्ये लिनता हवी. देवापासून जो विभक्त होत नाही तो खरा भक्त होय, असे प्रतिपादन ज्येष्ठ लेखिका आरती काळे यांनी केले. श्री वटवृक्ष स्वामी देवस्थानच्या वतीने आयोजित केलेल्या धर्म संकीर्तनपर व्याख्यानात ७ वे पुष्प गुंफताना त्या बोलत होत्या.



प्रत्येकाला मोबाईलचे जणू व्यसन लागले आहे. मात्र मोबाईलच्या आहारी गेल्याने अनेकांनेक अपायांना तोंड द्यावे लागते; याबाबत अजिबात विचार केला जात नाही. मोबाईल जसे हितकारक आहे तसे हानीकारकही आहे. कामापुरता मोबाईलचा वापर करायला हरकत नाही. 'मोबाईल'पायी वेडा होणे, हे सर्वार्थाने चुकीचे आहे. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत एकनाथ, संत सावता माळी, समर्थ रामदास स्वामी यांसारख्या संतांनी धर्मापेक्षा भक्ती श्रेष्ठ असल्याचे दाखवून दिले. वारकरी संप्रदायात जातीभेद, लिंगभेद यांना थारा नाही, असेही सांगितले.

वटवृक्ष देवस्थानचे अध्यक्ष महेश इंगळे यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. ओंकार पाठक यांनी वक्त्यांचा परिचय करुन दिला. यावेळी आत्माराम घाटगे, महेश गोगी, उज्वला सरदेशमुख, प्रथमेश इंगळे, प्रा.शिवशरण अचलेर, प्रसाद पाटील, श्रीशैल गंवडी, मनोज जाधव, ऋषी लोणारी, स्वामी लोणारी, काशीनाथ इंडे, बाळासाहेब कुलकर्णी, राजु भोसले, महादेव तेली, लक्ष्मण पाटील, प्रसाद सोनार, अशोक कडगंची, अक्षय सरदेशमुख, गिरिष पवार, संजय पवार, रमेश शिंदे, सुनील पवार, बाळासाहेब मनोहर देगावकर, महादेव तेली, बाळासाहेब एकबोटे उपस्थित होते.

# बृहन्मठ होटगी संस्थेतर्फे विविध उपक्रमांचे आयोजन

**सोलापूर, दि. ९ एप्रिल-**

तपोरत्न योगीराजेंद्र शिवाचार्य महास्वामीजी यांची ९६ वी जयंती, श्री श्री श्री १००८ जगद्गुरु दारूकाचार्य व एकोरामाराध्य जयंती व घोंगडीवर बसून भीमा नदी ओलांडलेले पवाड पुण्य पुरुष चन्नबसव शिवाचार्य महास्वामीजी यांची पुण्यतिथी निमित्त प्रति वर्षाप्रमाणे यंदाही शनिवार दि.१८ एप्रिल ते २१ एप्रिल पर्यंत श्री बृहन्मठ होटगी ता. द. सोलापूर येथे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आल्याची माहिती संस्थेच्या वतीने देण्यात आली.

शनिवार दिनांक १९ एप्रिल ते २१ एप्रिल पर्यंत दररोज श्री श्री श्री १००८ जगदाचार्य मूर्तीस व श्री गुरु गादीस रुद्राभिषेक, रविवार १९ एप्रिल रोजी जगद्गुरु एकोरा माराध्य जयंती निमित्त काशी पिठाचे जगद्गुरु डॉ.मल्लिकार्जुन विश्वाराध्य शिवाचार्य महास्वामीजी यांच्या अमृत हस्ते व अनेक शिवाचार्यांच्या उपस्थितीत वेदमूर्ती परमेश्वर शास्त्री व हल्लाळी शास्त्री यांच्या वैदिकत्त्वाखाली अय्याचार व दीक्षा विधी संपन्न होणार आहे. तरी ज्या माहेश्वर बटूंना व वीरशैव बांधवांना अय्याचार व दीक्षा करून घ्यावयाचे आहे. त्यानी मौजे होटगी येथील मठात आपले नावे नोंदवावीत. मंगळवार दि.२१ एप्रिल रोजी श्री श्री श्री १००८ जगद्गुरु दारूकाचार्य जयंती व श्री चन्नबसव शिवाचार्य यात्रा महोत्सवानिमित्त सकाळी ८.०० वा. जगद्गुरु दारूकाचार्य मूर्तीची मिरवणूक होऊन महामंगलारती व त्यानंतर महाप्रसाद वाटप होणार आहे. तरी या सर्व कार्यक्रमात भक्तानी व जंगम बटूंनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन श्री बृहन्मठ होटगी संस्थेच्या वतीने करण्यात आलेले आहे.

# ज्येष्ठ कार्यकर्त्यांनी घातलेल्या भक्कम पायावरच भाजपाची यशस्वी वाटचाल : महापौर कोंड्याल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ एप्रिल-**

भारतीय जनता पार्टी हा कार्यकर्त्यांच्या निष्ठा, परिश्रम आणि समर्पणावर उभा राहिलेला पक्ष आहे. ज्येष्ठ कार्यकर्त्यांनी घातलेल्या भक्कम पायावरच भारतीय जनता पार्टीची यशस्वी वाटचाल सुरु आहे, असे प्रतिपादन महापौर विनायक कोंड्याल यांनी केले.

भारतीय जनता पार्टीच्या स्थापना दिनानिमित्त सोलापूर शहर-जिल्हा भारतीय जनता पार्टीच्या वतीने आयोजित केलेल्या ज्येष्ठ कार्यकर्त्यांच्या सन्मान सोहळ्यात ते बोलत होते. अखंड पक्षनिष्ठा जपणाऱ्या कार्यकर्त्यांचा शाल व प्रभू श्रीराम यांच्या मूर्ती देऊन गौरव करण्यात आला. सत्कार मुर्तींमध्ये माजी आमदार नरसिंग मेंगजी, माजी नगरसेवक रामचंद्र जन्नू, मल्लेश कावळे, विश्वनाथ बेंद्रे, जगदीश तुळजापूरकर यांच्यासह शशिकला बिरु, नागनाथ सोमा, जक्कप्पा कांबळे, डॉ.रफिक सय्यद, राम तडवळकर, दत्तात्रय शाबादे, दत्ता कल्पवृक्ष आदींचा समावेश होता. याप्रसंगी शहराध्यक्षा रोहिणी तडवळकर, उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, सभागृहनेते नरेंद्र काळे, स्थायी समितीच्या सभापती रंजिता चाकोते, डॉ.नारायण बनसोडे, सुधा अळ्ळीमोरे, अंबादास बिंगी, विठ्ठल बडगंची, लक्ष्मण गायकवाड उपस्थित होते.





# 'सिध्देश्वर'ला ५0 वर्ष; रेल्वेची सजावट

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ एप्रिल-**

मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागातर्फे सोलापूर-मुंबई सिध्देश्वर सुपरफास्ट एक्सप्रेसच्या ५० वर्षांच्या यशस्वी सेवेनिमित्त सोलापूर रेल्वे स्थानक येथे विविध रंगी फुलांद्वारे रेल्वे इंजिनची सजावट आणि केक कापून आनंदोत्सवही साजरा करण्यात आला.

आरपीएफ बँडच्या सुरेल वादनाने कार्यक्रमात रंगत आली होती. तरुण प्रवाशांनी सिध्देश्वर एक्सप्रेसच्या संस्मरणीय क्षणांचा फोटोफ्रेम सोलापूर विभागाला भेट दिला, ज्यातून या गाडीबद्दल लोकांच्या भावनिक नात्याचे दर्शन घडले. याप्रसंगी सोलापूर विभागाने प्रवाशांच्या सुरक्षितता, आराम व सेवागुणवत्तेत सातत्याने सुधारणा करण्याच्या वचनबध्दतेची पुनरुज्जीवन केली. सिद्धेश्वर एक्सप्रेस आपला समृध्द वारसा पुढे नेत लोकांना जोडत राहील, असे सांगण्यात आले.

# वैद्यकीय निष्काळजीपणामुळे सिझेरियननंतर महिलेचा मृत्यू

▸ आरोग्य अधिकाऱ्यांनी बजावली दोन हॉस्पिटलला नोटीस
▸ स्पष्टीकरण सादर करण्याचे आदेश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ एप्रिल-**

वैद्यकीय निष्काळजीपणामुळे सिझेरियन शस्त्रक्रियेनंतर महिलेचा मृत्यू झाल्याचा आरोप करत आरोप करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर सोलापूर महानगरपालिकेच्या आरोग्य अधिकारी डॉ. राखी माने यांनी रुग्णालयांना नोटीस बजावून स्पष्टीकरण मागवले आहे.

निराळे वस्ती येथील रहिवासी सनी राजेंद्र बावळे यांनी दि. ८ एप्रिल २०२६ रोजी दिलेल्या तक्रारीनुसार, त्यांची पत्नी अनुजा सनी बावळे यांच्यावर मुरारजी पेठ येथील डॉ. राजीव दबडे यांच्या कृष्णामाई नर्सिंग होममध्ये सिझेरियन शस्त्रक्रिया करण्यात आली. मात्र, शस्त्रक्रियेनंतर रुग्णाच्या प्रकृतीकडे योग्य लक्ष देण्यात आले नाही, तसेच वेळेवर तज्ञ डॉक्टर उपलब्ध नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. तक्रारीनुसार प्रकृती गंभीर झाल्यानंतर संबंधित रुग्णाला अश्विनी सहकारी रुग्णालय व संशोधन केंद्र येथे हलविण्यात आले. मात्र, तेथे उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाल्याचे नमूद करण्यात आले आहे. या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी व्हावी, अशी मागणी तक्रारदाराने केली आहे. दरम्यान, मनपाच्या आरोग्याधिकारी डॉ. राखी माने यांनी संबंधित दोन्ही रुग्णालयांना नोटीस पाठवून उपचारासंबंधी सर्व कागदपत्रे, तपासणी अहवाल तसेच लेखी स्पष्टीकरण सादर करण्याचे आदेश दिले आहेत. तसेच, प्रतिनिधीसह मनपा आरोग्य मुख्य कार्यालयात उपस्थित राहण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. अनुपस्थित राहिल्यास एकतर्फी निर्णय घेतला जाईल, असा इशाराही देण्यात आला आहे.

# तत्पर ग्राहकसेवा, महसूलवाढ, 'शून्य थकबाकी'ला प्राधान्य द्या

## 'महावितरण'चे संचालक राजेंद्र पवार यांचे निर्देश

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ९ एप्रिल-**

वीज क्षेत्रात काल केलेल्या कामगिरीवर आज तगू शकत नाही. त्यामुळे मागील आर्थिक वर्षात चांगली कामगिरी केली तरीही चालू आर्थिक वर्षामध्ये अभियंते, अधिकारी व कर्मचाऱ्यांनी महावितरणच्या तत्पर ग्राहकसेवा, महसूलवाढ व वीजबिलांची 'शून्य थकबाकी' या त्रिसूत्रीला प्राधान्य देण्यामध्ये सातत्य ठेवावे, असे निर्देश 'महावितरण'चे संचालक (मानव संसाधन) राजेंद्र पवार यांनी दिले.

सोलापूर मंडल अंतर्गत विभाग व उपविभागांतील ग्राहकसेवेसह ग्राहकसेवेसह विविध कामांचा आढावा बैठकीत बोलताना ते पुढे म्हणाले, राज्याच्या ऊर्जा क्षेत्राचा चेहरामोहरा बदलण्याची प्रक्रिया सुरु झाली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीने राज्याच्या वीज क्षेत्रात क्रांतिकारी आणि सकारात्मक लोकाभिमुख बदल घडून येत आहेत. हे बदल महावितरणला आर्थिकदृष्ट्या सक्षम, ग्राहकांना जागतिक दर्जाची सेवा देण्यासाठी नव्याने सज्ज करणारे आहे. व्यासपीठावर बारामती परिमंडलाचे मुख्य अभियंता धर्मराज पेठकर, सोलापूर मंडलचे अधीक्षक अभियंता सुनील माने उपस्थित होते. याप्रसंगी सोलापूर मंडल अंतर्गत सन २०२५-२६ मध्ये उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल पंढरपूर विभाग कार्यालय तसेच मंगळवेढा उपविभाग, अक्कलकोट-२ आणि नातेपुते उपविभाग कार्यालयांचे अभियंते, अधिकारी, कर्मचाऱ्यांसह तीन उत्कृष्ट शाखा अधिकाऱ्यांचाही गौरव करण्यात आला.




उपकार्यकारी अभियंता आशिष खेडीकर व व्यवस्थापक (मानव संसाधन) मृदुला पाटील यांनी सूत्रसंचालन केले. कार्यकारी अभियंता (प्रशासन) संपत गावडे यांनी आभार मानले. यावेळी मंडल, विभाग, उपविभाग व शाखा कार्यालयांचे अभियंते, अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.






**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी.** ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi** - Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

CMYK

सोलापूर तरुण भारत

SOLAPUR TARUN BHARAT

न मे कर्मफले स्पृहा

सोलापूर | शुक्रवार, १० एप्रिल २०२६

▌dainiktarunbharat.com
▌epaper.dainiktarunbharat.com



## जुनी पोलिस लाईन येथे विविध धार्मिक कार्यक्रम

**सोलापूर, दि. ९ एप्रिल-**
स्वामी समर्थ यांच्या १४८ व्या पुण्यतिथीनिमित्त जुनी पोलीस लाईन येथील श्री स्वामी समर्थ मंदिरामध्ये रविवार, दि.१२ ते बुधवार, १५ एप्रिल २०२६ या कालावधीत श्रीस्वामी समर्थ सारा अमृत वाचन, अग्निहोत्र, लघुरुद्राभिषेक, नगर प्रदक्षणा, ह.भ.प.प्रगती गुंड यांचे प्रवचन असे विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आल्याची माहिती अध्यक्ष प्रमोद डोंगरे यांनी दिली. श्री स्वामी समर्थ महाराजांची नीज वस्तू, रुद्राक्ष माळ व चैतन्य पादुका, श्री स्वामी समर्थ महाराज स्थापित दिव्य गुरुपीठ, श्री बाळाप्पा महाराज मठ गुरु मंदिर येथील श्री स्वामी समर्थ महाराजांनी धारण केलेली रुद्राक्ष माळ, गुरुपीठावरील चैतन्य पादुका भक्तांच्या दर्शनासाठी बुधवार दि. १५ एप्रिल रोजी सकाळी १० ते सायंकाळी ९ वाजेपर्यंत मंदिरात दर्शनाकरिता उपलब्ध आहेत.






# विश्वशांतीसाठी णमोकार महामंत्राच्या निनादाने आसमंत दुमदुमला

### वीरसागरजी महाराज यांच्या 'सुख की खोज' ग्रंथाचे अनावरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ एप्रिल-**
जैन तत्वज्ञानातील 'अहिंसा', 'अनेकांतवाद' आणि 'अपरिग्रह' या सार्वत्रिक मूल्यांचा संदेश देणाऱ्या णमोकार महामंत्राच्या सामूहिक पठणाने वालचंद शिक्षण समूह आणि संपूर्ण परिसर भक्तिभाव,

श्रद्धा आणि आध्यात्मिक उर्जेने भारावून गेला होता. परमपूज्य निर्यापक श्रमण मुनीश्री १०८ वीरसागरजी महाराज संघ यांच्या पावन मार्गदर्शनाखाली आयोजित या कार्यक्रमातून 'विश्वकल्याण', 'आत्मशुद्धी' आणि 'विश्वशांतता'चा प्रभावी संदेश देण्यात आला.

''नमो अरिहंताणं...'' या महामंत्राचा गजर घुमत राहिला आणि वातावरण अध्यात्मिक उर्जेने भारावून गेले. नमोकार मंत्राचा संगीताच्या साह्याने शास्त्रीय गायिका नेहा शहा, चेतन बाफना आणि जमलेल्या श्रावकांनी उत्कृष्टपणे वेगवेगळ्या चालीमध्ये उच्चारण केले. सकल जैन समाज व वालचंद शिक्षण समूह आयोजित, मुनीश्री वीरसागरजी महाराज संघ यांच्या पावन मार्गदर्शनाखालील कार्यक्रमात, मुनीश्री वीरसागरजी महाराज रचित 'सुख की खोज' या जैनग्रंथाचे अनावरण खासदार प्रणिती शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी आ. सुभाष देशमुख, भाजप शहराध्यक्षा रोहिणी तडवळकर, वालचंदचे मानद सचिव डॉ.रणजित गांधी, विश्वस्त भूषण शहा, पराग शहा, माया गांधी, अंकिता गांधी आदींची उपस्थिती होती. सूत्रसंचालन पराग शहा व महावीर शास्त्री यांनी केले. खा.प्रणिती शिंदे यांनी आपल्या मनोगतात वालचंद शिक्षण समूहाच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याचे कौतुक करत, उच्च शिक्षणासोबत समाजोपयोगी उपक्रम राबविण्याची परंपरा अत्यंत प्रेरणादायी आहे. जैन समाजाकडून करुणा, सहानुभूती आणि संवेदनशीलता शिकण्यासारखी आहे, असे प्रतिपादन केले. आ.सुभाष देशमुख म्हणाले, अशा आध्यात्मिक कार्यक्रमांमुळे समाजात सकारात्मक ऊर्जा निर्माण होते. संतांचे आशीर्वाद लाभणे ही भाग्याची बाब आहे. विश्वाच्या कल्याणासाठी मी विश्वमंगल मराठी फाउंडेशनची सुरवात एक मेला महाराष्ट्र दिनी ज्ञानेश्वर माऊलीच्या पावनभूमी असलेल्या आळंदीतून करणार आहे. विश्वाच्या कल्याणाचा संदेश पसायदानातून ज्ञानेश्वर माऊलीने दिला, तोच संदेश घेऊन विश्वाच्या कल्याणासाठी हा उपक्रम मी सुरू करीत आहे.

# डीपीडीसी निधीबाबत अधिकाऱ्यांवर दबाव : खा.शिंदे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ एप्रिल-**
डीपीडीसीचा निधी हा वैयक्तिक कामांसाठी नव्हे तर गावकऱ्यांना मूलभूत सोयी-सुविधा पुरविण्याच्या अनुषंगाने मागितला जातो. परंतु सदर निधीबाबत अधिकाऱ्यांवर दबाव टाकला जात आहे. अधिकारीही याला बळी पडत आहेत, असा आरोप काँग्रेसच्या खासदार प्रणिती शिंदे यांनी केला. निधी तात्काळ मंजूर करण्यात यावे. अन्यथा आमरण उपोषण करु, असा इशाराही त्यांनी दिला.



सोलापूर लोकसभा मतदार संघातील विविध विकास कामांसाठी जिल्हा वार्षिक योजनेतून निधी मंजूर करावा, अवकाळी पाऊस व गारपीटीमुळे बाधित शेतकऱ्यांना तात्काळ नुकसान भरपाई द्यावी, संजय गांधी निराधार योजनेतील कागदपत्रांच्या जाचक अटी शिथिल कराव्यात आदी मागण्यांचे निवेदन जिल्हाधिकारी एस.कार्तिकेयन यांच्याकडे सादर करण्यात आले. यावेळी त्या बोलत होत्या. पालकमंत्री व जिल्हाधिकारी यांना प्रत्यक्ष भेटून या कामांना मंजुरी देण्याची मागणी वारंवार करण्यात आली होती. मात्र अद्यापही संबंधित कामांना मंजुरी व निधी मिळाले नाही, असेही त्यांनी सांगितले. यावेळी शहराध्यक्ष चेतन नरोटे, अक्कलकोट तालुकाध्यक्ष मल्लिकार्जुन पाटील, पंढरपूर तालुकाध्यक्ष संदीप पाटील, मंगळवेढा तालुकाध्यक्ष प्रशांत साळे, मोहोळ तालुकाध्यक्ष सुलेमान तांबोळी, दक्षिण सोलापूर तालुकाध्यक्ष भीमाशंकर जमादार, उत्तर सोलापूर तालुकाध्यक्ष भारत जाधव आदी उपस्थित होते.

# शिष्यवृत्ती अपहार : जामीन अर्जावर सोमवारी सुनावणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ एप्रिल-**
फौजदार चावडी पोलीस स्टेशन येथे शासनाला खोटे कागदपत्रे दाखल करून ३, कोटी ६३ लाख रुपयांचा अपहार केल्याप्रकरणी २० जणांवर दाखल असलेल्या गुन्ह्यातील एक आरोपी बाळासाहेब विलास शिंदे वय ४३ रा. पंढरपूर यांच्या जामीन अर्जावरील सुनावणी दिनांक १३/०४/२०२६ रोजी पी. पी.राजवैद्य यांचे कोर्टासमोर होणार आहे.

यात थोडक्यात हकीकत की, बांधकाम कामगारांच्या मुलासाठी असलेल्या विविध शैक्षणिक योजनांसाठी बनावट बोनाफाईड शैक्षणिक कागदपत्रे सादर करून शासनाची रक्कम रुपये ३ कोटी ६३ लाख २० हजारांची फसवणूक केल्याप्रकरणी सहाय्यक कामगार आयुक्त यांनी दि. ४/०३/२०२६ रोजीच्या फिर्यादी नुसार गुन्हा रजिस्टर नंबर २५०/२०२६ अन्वये फौजदार चावडी पोलीस स्टेशन येथे नोंदणी अधिकारी, कंत्राटी कर्मचारी आणि दलाल अशा एकूण २० जणांविरुद्ध गुन्हा दाखल झालेला आहे. सदर गुन्ह्यामधील अटक आरोपी बाळासाहेब शिंदे यांनी ड. शशि कुलकर्णी यांचे मार्फत सोलापूर येथील जिल्हा व सत्र न्यायालयामध्ये जामीन अर्ज दाखल केला असून त्याची सुनावणी सोमवार पी. पी. राजवैद्य यांचे कोर्टात होणार आहे. याकामी आरोपीतर्फे ॲड. शशी कुलकर्णी, ड.गुरुदत्त बोरगांवकर, ॲड. प्रसाद अग्निहोत्री तर सरकारतर्फे एम. एम. देशपांडे हे काम पाहत आहेत.

### जलवाहिनीला लागलेल्या गळतीची आज दुरुस्ती

# शहराचा पाणीपुरवठा एक दिवस उशिरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ एप्रिल-**
जुळे सोलापूर कल्याणनगर येथील रेल्वे ट्रॅकखालील जलवाहिनीला लागलेल्या गळतीची शुक्रवार, दि.१० एप्रिल रोजी दुरुस्ती करण्यात येणार असल्याने शहराचा पाणीपुरवठा एक दिवस उशिरा होणार आहे. दुरुस्तीचे काम रेल्वे रुळाच्या खाली व रेल्वे सिग्नलसाठी कार्यरत असलेले रेल्वे प्रशासनाची परवानगी आणि केबलची काळजी घेवून करावे लागणार आहे, असे महापालिका सार्वजनिक आरोग्य अभियंता व्यंकटेश चौबे यांनी सांगितले.

# अल्पवयीन मुलीचा विनयभंग; आरोपीस ३ महिने कारावास

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ एप्रिल-**
एकतर्फी प्रेमातून अल्पवयीन मुलीचा वारंवार पाठलाग करून तिचा विनयभंग करणाऱ्यास जिल्हा व सत्र न्यायाधीश जयदीप मोहिते यांनी ३ महिने कारावास व २ हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली. आसीफ मलंग मुजावर रा. शास्त्री नगर, सोलापूर असे शिक्षा झालेल्याचे नाव आहे. याबाबत पिडीतेच्या फिर्यादीवरुन वळसंग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.



यातील पिडीतेचा आसीफ मुजावर याने एकतर्फी प्रेमातून वारंवार तिचा पाठलाग करून तिचा हात धरून ओढून तिच्या मनास लज्जा वाटेल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला होता. त्यामुळे याबाबत वळसंग पोलीस ठाण्यात पोक्सो व विनयभंगाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्हयात आसिफ मुजाबर यास अटक करून पोलीसांनी तपास करून न्यायालयात दोषारोपपत्र पाठिवले होते. त्याची सुनावणी जिल्हा व सत्र न्यायाधीश मोहिते यांच्यासमोर झाली. सरकारी पक्षाने केलेला युक्तीवाद, पिडीतेची साक्ष व पुरावा ग्राह्य धरून न्यायाधीश मोहिते यांनी आरोपी मुजावर यास विविध कलमाखाली ३ महिने कारावास व २ हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली. याप्रकरणी सरकारच्यावतीने ॲड. शीतल डोके, ॲड. कविता बागल यांनी तर आरोपीच्यावतीने ॲड. कदेर आवटी यांनी काम पाहिले. कोर्ट पैरवी म्हणून पोलीस शिपाई कोळी यांनी काम पाहिले.

# रेकॉर्डवर नसलेल्या मिळकती शोधण्यासाठी विशेष सर्वेक्षण मोहिम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ एप्रिल-**
सोलापूर महापालिकेच्या मालमत्ता कर विभागाकडून शहर तसेच हद्दवाढ भागामधील नव्याने बांधण्यात आलेल्या इमारती, अपार्टमेंटमधील सदनिका व गाळे, व्यावसायिक मिळकती तसेच खुले प्लॉट यांचा शोध घेऊन त्यांच्यावर कर आकारणी करण्यासाठी विशेष सर्वेक्षण मोहिम हाती घेण्यात आलेली आहे, अशी माहिती महापालिका उपायुक्त आशिष लोकरे यांनी दिली.



या मोहिमेअंतर्गत शहरातील एकूण ५० पेठांमध्ये कार्यरत असलेल्या कर निरीक्षक व वसुली लिपिक यांना एप्रिल महिन्यासाठी सुमारे १० हजार नवीन मिळकतींचा शोध घेऊन त्यांची कर आकारणी करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. या माध्यमातून कर जाळ्यात नव्याने मिळकतींचा समावेश करून महानगरपालिकेच्या महसूलात वाढ करण्यावर भर देण्यात येत आहे.

कर निरीक्षक व वसुली लिपिक यांना देण्यात आलेल्या उद्दिष्टांच्या अनुषंगाने झालेले कामकाज, नवीन मिळकतींचा शोध, तसेच दैनंदिन मालमत्ता कर वसुली यांचा सविस्तर आढावा घेण्यासाठी दर १५ दिवसांनी होणाऱ्या वॉर्ड समितीच्या बैठकीमध्ये संबंधित सदस्यांकडून नियमितपणे परीक्षण करण्यात येणार आहे, असे त्यांनी सांगितले.




# श्रीशैल कावडचे सोलापुरात आगमन

### देशमुख, हिरेहब्बू यांनी केले पूजन


**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.९ एप्रिल-**
हजारो वर्षापासून चालत आलेल्या पंरपरेनुसार श्रीशैल कावडचे गुरुवारी सोलापुरात आगमन झाले. गुरुवारी सकाळी ९ वाजता जोडबसवण्णा चौकातील हनुमान मंदिर येथे श्रीसिध्देश्वर यात्रेचे मानकरीद्वय सुधीर देशमुख, राजशेखर हिरेहब्बू यांच्या हस्ते या कावडचे पूजन करण्यात आले. ग्रामदैवत श्रीसिध्देश्वर मंदिर येथे दिवसभर मुक्काम करुन बाळी वेस येथील मल्लिकार्जून मंदिरमार्गे देशमुख वाड्यात कावड मिरवणुकीचे विर्सजन करण्यात आले.

यावेळी सागर हिरेहब्बु, ओंकार हिरेहब्बु, सुधीर थोबडे, सोमनाथ मेंगाणे, बाळासाहेब मुस्तारे, संजय दर्गोपाटील, अनंत अंजिखाने, गंगाधर कल्याणकर, साईनाथ अंजिखाने, श्रीकांत हवीनाळ, शैलेश वाडकर, गजानन धोत्रे, शिवा सोन्रा, शिवशंकर कंटीकर, सिध्देश्वर कंटीकर, प्रकाश पत्री-स्वामी, संतोष स्वामी-मदगेरी, मल्लय्या स्वामी, तम्मा कल्याणशेट्टी आदी उपस्थिती होती.

# 'निमा'च्या वतीने रविवारी निमारत्न पुरस्कारांचे वितरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.९ एप्रिल-**
१३ एप्रिल हा निमा अर्थात नॅशनल इंटिग्रेटेड मेडिकल असोसिएशनचा वर्धापन दिन; यानिमित्त विविध उपक्रम हाती घेण्यात आले आहेत.

यंदाच्या ७८ वा स्थापना दिनाचे औचित्य साधून रविवार, दि.१२ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता डॉ. निर्मलकुमार फडकुले सभागृह येथे महापौर विनायक कोंड्याल, 'प्रिसीजन'च्या डॉ.सुहासिनी शहा यांच्या प्रमुख उपस्थितीत निमारत्न पुरस्कारांचे वितरण करण्यात येणार आहे, अशी माहिती



अध्यक्ष डॉ.नागनाथ जिड्डीमनी व कोषाध्यक्ष डॉ.प्रवीण नन्नवरे यांनी पत्रकार परिषदेत दिली. सोमवार दि.१३ एप्रिल रोजी दक्षिण सोलापूर तालुक्यातील उळे गाव येथील आरोग्य मंदिर परिसरात वृक्षारोपण, जुना विडी घरकुल परिसरातील गरजू रुग्णांसाठी डॉ.जिड्डीमनी यांच्या कमल मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल येथे मोफत आरोग्य शिबिर यांसह रक्तदान शिबीर, वृक्षारोपण आदी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहेत, असेही त्यांनी सांगितले. या पत्रकार परिषदेस डॉ.विनायक टेंभुर्णीकर, डॉ. साहेबराव गायकवाड, डॉ.रविराज गायकवाड, डॉ.सुभाष भांगे, डॉ.नितीन बलदवा, डॉ.उत्कर्ष वैद्य, डॉ.अभिजीत पुजारी, डॉ. श्रुती मराठे, डॉ.पल्लवी भांगे, डॉ.अश्विनी देगांवकर, डॉ.राजश्री मठ, डॉ.योगेश उडगीकर आदी उपस्थित होते.

**हे आहेत मानकरी**
धन्वंतरी पुरस्कार- डॉ.विजय आरकाल, वैद्य राघवेंद्र नादरगी, निमारत्न पुरस्कार- डॉ.धनंजय कुलकर्णी, डॉ.अनिल पत्की, स्मृती विशेष पुरस्कार-डॉ.माधव गुंडेटी, निमा सुपरस्टार पुरस्कार- डॉ. अमोल माळगे, डॉ.अश्विनी देगांवकर, निमा शायनिंग स्टार पुरस्कार-डॉ.सचिन बोंगरगे, डॉ.वैजनाथ स्वामी, निमा रायझिंग स्टार पुरस्कार- डॉ. सुनील खट्टे, डॉ.आदिल मुल्ला, निमा सोलापूर विशेष गौरव पुरस्कार-डॉ.राजलक्ष्मी गायकवाड, डॉ.मंजिरी कुलकर्णी, डॉ.विलास सरवदे.

# 'अनंत' माणुसकीच्या महोत्सवातून समाजाला नवी दिशा : पवार

### उद्योगपती अनंत अंबानी यांच्या वाढदिवसानिमित्त महाउपक्रम

### शिखर पहारिया फौंडेशनने फुलविले हजारो चेहऱ्यांवर हास्य

### अन्न, शिक्षण, आरोग्य, स्वावलंबनाला देण्यात आले बळ

### शहर, जिल्ह्यातील १४ ठिकाणी राबविले महाउपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ एप्रिल-**
प्रसिध्द उद्योगपती अनंत मुकेश अंबानी यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून शिखर पहारिया फाउंडेशनने अनंत माणुसकीच्या महोत्सवातून समाजाला नवी दिशा देण्याचे महत्कार्य केले. हा उपक्रम प्रत्येकाच्या मनात सेवाभावाची ज्योत पेटवणारा आणि समाजाला दिशा देणारा आहे, असे प्रतिपादन महापालिका अतिरिक्त आयुक्त वीणा पवार यांनी केले.

जुनी मिल कंपाउंड येथे आयोजित केलेल्या महाउपक्रम कार्यक्रमात त्या बोलत होत्या. प्रारंभी महापालिकेच्या अतिरिक्त आयुक्त वीणा पवार, सोलापूर श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष विक्रम खेलबुडे, खजिनदार किरण बनसोडे, फाउंडेशनचे तन्वीर शेख, राज सलगर, धर्मराज गुंडे आदींच्या प्रमुख उपस्थितीत कुंडीतील झाडांना पाणी घालण्यात आले.

उद्योगपती अनंत अंबानी यांच्या प्रेरणेने समाजसेवेचा हा 'अनंत' प्रवास सुरु आहे. ५ हजार कुटुंबांच्या चुली पेटवणे म्हणजे केवळ मदत नव्हे, तर आशेचा दिवा लावणे होय. अशा उपक्रमांतून समाज अधिक






संवेदनशील आणि सक्षम होतो. इतरांच्या आयुष्यात आनंद निर्माण करणारा हा महोत्सव ठरला आहे, असेही त्या म्हणाल्या.

शिखर पहारिया फाउंडेशनच्यावतीने महाउपक्रमांद्वारे जणू माणुसकीचा महोत्सव साजरा करण्यात आला. यानिमित्ताने हजारो महिला, विद्यार्थी आणि नागरिकांच्या चेहऱ्यांवर हास्य फुलविण्यात आले. शहरातील १४ ठिकाणी अन्न, शिक्षण, आरोग्य यांसह स्वावलंबनाला बळ दिले गेले, असेही त्यांनी सांगितले.

सोलापूर शहर व जिल्ह्यात विविध १४ ठिकाणी हे उपक्रम राबवण्यात आले. याद्वारे २०० विद्यार्थिनींना सायकली, १ हजार विद्यार्थ्यांना स्कूल बॅग, अनाथ आश्रमासाठी ५० बेडस्, नॅशनल असोसिएशन फॉर द ब्लाइंड या संस्थेस १० डबल बेडस्, राठोड अनाथ आश्रमात ५ बेडस्, मोहोळ आश्रमशाळेत १५ बेडस्, श्री गेनसिध्द मंदिर येथे ५८.५ केव्हीए जनरेटर, राणी लक्ष्मीबाई मागासवर्गीय विद्यार्थी वसतीगृह मांजरेवाडी येथे आरओ प्लांट, रा.ना.बोमड्याल शाळेला डिजीटल बोर्ड, कुंभारी येथील लोकशाहीर आण्णाभाऊ साठे नगर येथे बोअर, २०० महिलांना शिलाई मशीन, १० शाळांना संगणक संच, ३०० विद्यार्थ्यांना शैक्षणिकदृष्ट्या दत्तक, १०० ठिकाणी जनावरांसाठी पाण्याची सोय, मंदिरांसाठी १ हजार पत्र्यांचे वाटप यांसारखे उपक्रम हाती घेण्यात आले आहेत. तन्वीर शेख यांनी प्रास्ताविक केले. श्वेता हुल्ले यांनी सूत्रसंचालन केले. राज सलगर यांनी आभार मानले. उपक्रमांच्या यशस्वीतेसाठी धर्मराज गुंडे, कौशल शिंदे, सूर्या शेट्टीयार, तुषार जोगदनकर, धीरज खंदारे, धीरज कारंडे, इम्रान शेख, महताब शेख, पवन इगवे, राहुल तलवर, हरीश जाधव, प्रकाश बगलोलू, अजय भंडारे, कृष्ण भंडारे, गणेश आमटेपागुल, ओंकार नवले, राजेश शिंगे, संजय भरड आदींनी परिश्रम घेतले.

**जिल्हा रुग्णालयात ३८ लाखांचे वैद्यकीय साहित्य**
नवनिर्मित सोलापूर जिल्हा रुग्णालयात ३८ लाखांचे वैद्यकीय साहित्य प्रदान करण्यात आले. यावेळी रुग्णालयाचे अतिरिक्त शल्यचकित्सक डॉ. चंद्रकांत क्षीरसागर, जिल्हा वैद्यकीय अधिकारी डॉ. रोहन वायचळ, मेट्रन विजयमाला बेले यांच्यासह अधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## ज्ञानामृत आनंदलहरी-१४०८

**अगा थानीं कीर दूध गूढ । परि थानासीचि नव्हे कीं गोड ।**
**म्हणोनि सरो कां सेवितयाची चाड । जरी अनन्य मिळे ।।**

भगवंतांनी अर्जुनाला आत्तापर्यन्त वेगवेगळया प्रकारचे ज्ञान स्पष्ट करुन सांगीतले आहे. आता भगवंत त्यांच्या अंत:करणातील गुपित असे ब्रम्हज्ञान अर्जुनाला सांगू इच्छित आहेत. अर्जुन हा केवळ बुध्दिमानच नाही तर तो प्रत्यक्ष आस्थेवाईक पणाची मूर्ती असल्याने आणि तो सांगीतलेल्या गोष्टीचा अनादर करणारा नसल्याने हे गुपित रहस्य आपण अर्जुनाला सांगणार आहोत असे भगवंत म्हणाले.



अर्जुनाला हे गुपीत ज्ञान सांगण्याची आपली इच्छा का व कशी झाली याचे स्पष्टीकरण करतांना भगवंत म्हणाले, **अगा थानीं कीर दूध गूढ । परि थानासीचि नव्हे की गोड । म्हणोनि सरो कां सेवितयाची चाड । जरी अनन्य मिळे ।।** अर्थात अर्जुना, स्तनामध्ये दूध गुप्त असते पण स्तनाला त्याची गोडी कळत नाही. यासाठी एकनिष्ठ सेवन करणारा जर प्राप्त झाला तर त्या सेवन करणा-यांची इच्छा स्तनपान करुन जशी पुर्ण होते. तशी स्तनपान करु देणा-याचीही इच्छा पुर्ण होते. कणगीतून बी काढले आणि ते मग मशागत केलेल्या जमिनीत पेरले, तर ते सांडून वाया गेले, असे म्हणता येईल काय? अर्थात ते बी वाया जात नाही, तर चांगल्याप्रकारे ते जमीनीत रुजुन फळाफुलाच्या रुपाने उपयोगाला येत असते. चांगल्या मनाचा, शुध्द बुध्दीचा आणि निंदा न करणारा व एकनिष्ठता बाळगणारा श्रोता जर मिळाला, तर त्या श्रोत्याला आपल्याकडे गुप्त असलेली गोष्ट सांगीतली तर ती योग्यच होत असते. म्हणून अर्जुना, तू या सर्व गुणांनी संपन्न आहेस, तुझ्यासारखा अन्य श्रोता मला मिळणार नाही. म्हणून गुप्त असली तरी ही गुप्त गोष्ट मी तुला सांगणार आहे, असे भगवंत अर्जुनाला म्हणाले.

अर्जुनाला भगवंत प्रपंच ज्ञानासहित आत्मज्ञान पण सांगू इच्छित आहेत. ज्ञान आणि विज्ञानाची फोड करुन भगवंत सांगणार आहेत. एकत्र मिसळलेले ज्ञान, विज्ञान, वेगवेगळे कसे करणार तर, राजहंस पक्षी जसा दूध आणि पाणी वेगळे करतो, त्या प्रमाणे वेगळे करुन सांगणार असे भगवंत म्हणाले. वारा सुटल्यानंतर धान्यातील कोंडा आपाओप उडून जाऊन केवळ धान्य शिल्लक राहते. त्याप्रमाणे ज्ञान-विज्ञानाची निवड जाणताक्षणीच संसाराचे बंध तोडून ती निवड संसांरालाच मोक्षरुपी लक्ष्मीच्या पट्टासनावर बसवित असते. अशा या पवित्र ज्ञानाची जाणीव झाल्यानंतर आत्मसुखाला मर्यादा राहत नाही. अर्जुनाचे भाग्य किती थोर आहे. तो भगवंताना अशा रहस्यमय गोष्टी विचारात नसतांनाही भगवंत अर्जुनाची एकनिष्ठता पाहून स्वत: होऊन त्याला अशा गुप्त गोष्टी सांगत आहेत. अर्जुनासारखा संजयसुध्दा भाग्यवान आहे. कारण त्याला घरी बसल्या हे सर्व पाहायला, ऐकायला मिळत आहे. मात्र पुत्रप्रेमाने मोहग्रस्त झालेल्या राजा धृतराष्ट्राला हे ऐकण्यात आनंद नाही. आपणही अर्जुन, संजयाप्रमाणे भाग्यशाली आहोत, कारण आपणाला हे सर्व ज्ञान,रहस्य वाचायला मिळत आहे. अर्जुनाची एकनिष्ठता पाहून श्रीकृष्ण सर्व ज्ञान मनसोक्तपणे त्याला देत आहेत. तसेच माऊली श्रोत्यांची एकनिष्ठता पाहुन हे ज्ञान श्रोत्यांसमोर स्पष्ट करीत आहेत. आपणही एकनिष्ठता बाळगुन हे ज्ञान मनसोक्तपणे ग्रहण करु या व श्रीकृष्ण, माऊलीप्रमाणे हे ज्ञान आपण मन:पुर्वक इतरांना देऊ या. जय जय राम कृष्ण हरी।

**ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
मो. ९४२२३३६४४८

## सुप्रभात

### आजचा दिवस

**वार : शुक्रवार,**
**दि. १० एप्रिल २०२६**
**विक्रम संवत् २०८३ ।**
**शके -१९४८**
**संवत्सर - पराभव**
**मास - चैत्र कृ. अष्टमी**
**ऋतु - वसंत ।**
**नक्षत्र- पूर्वाषाढा (११.२७)**
**योग - शिव (१८.२९)**
**करण - बालव (१०.२०)**
**राहू काल : शुक्रवार**
**स. १०.३० ते १२.००**

**दिनविशेष : * जागतिक होमिओपॅथी दिन**
*** भूमी अभिलेख दिन**
**१८७५: स्वामी दयानंद सरस्वती यांनी मुंबईत आर्य समाजाची स्थापना केली**
**१८९४: प्रसिद्ध उद्योगपती घनश्यामदास बिर्ला यांचा जन्म.**
**१९६५: स्वतंत्र भारताचे पहिले कृषी मंत्री डॉ. पंजाबराव देशमुख यांचे निधन.**
**१९९५: भारताचे ४थे पंतप्रधान मोरारजी देसाई यांचे निधन.**

# विरोधी पक्षनेत्याचे केबीन सर्व सदस्यांसाठी खुले

## सोलापूर जिल्हा परिषदेत 'विरोधी पक्ष'च नाही



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ एप्रिल-**

जिल्हा परिषदेत भाजपला स्पष्ट बहुमत मिळाल्यानंतर आणि मित्रपक्षांनीही सत्तेसोबत जाण्याचा निर्णय घेतल्याने आगामी पाच वर्षांत विरोधी पक्षनेतेपद अस्तित्वातच राहणार नसल्याचे जवळपास निश्चित झाले आहे. परिणामी, यापूर्वी विरोधी पक्षनेत्यासाठी राखीव असलेली केबिन आता सर्व सदस्यांसाठी खुली करण्यात आली असून, झेडपीच्या राजकारणात हा मोठा बदल मानला जात आहे.

बुधवारी जिल्हा परिषदेच्या सभागृहात विषय समित्यांच्या सदस्य निवडीसाठी महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीला अध्यक्ष दीपक वैद्य, उपाध्यक्ष इंद्रजीत पवार, पक्षनेत्या रश्मी बागल तसेच पालकमंत्र्यांचे ओएसडी घुले उपस्थित होते. पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या सूचनेनुसार, सर्व पक्षांचा समावेश करून 'सर्वसमावेशक' भूमिका घेण्याचा निर्णय घेण्यात आला. या बैठकीत तब्बल ८३ सदस्यांची विषय समित्यांसाठी निवड करण्यात आली असून, ही यादी अंतिम मंजुरीसाठी पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्याकडे पाठवण्यात आली आहे. १५ एप्रिल रोजी होणाऱ्या विशेष सभेत या यादीवर अंतिम शिक्कामोर्तब होणार असून, त्यावेळी लखोटा उघडला जाणार आहे.

दरम्यान, अध्यक्ष व उपाध्यक्ष निवडीनंतर झालेल्या सत्कार समारंभात पालकमंत्री गोरे यांनी स्पष्टपणे सर्व सदस्यांना समान निधी देण्याचे आश्वासन देत, सर्वांना सोबत घेऊन काम करण्याचा संदेश दिला होता. शिंदे सेना व राष्ट्रवादी (अजित पवार गट) यांनीही भाजपसोबत राहण्याची भूमिका घेतल्याने सत्ता अधिक बळकट झाली आहे. विशेष म्हणजे, या सर्वसमावेशक धोरणात राष्ट्रवादी (शरद पवार गट) सदस्यांचाही समावेश करण्याचे संकेत देण्यात आले आहेत. त्यामुळे समित्यांच्या कामकाजात पारदर्शकता आणि समतोल राखण्याचा प्रयत्न होत असल्याचे दिसत आहे.

याच पार्श्वभूमीवर, विरोधी पक्षनेतेपदासाठी कोणतीही जागा उरणार नसल्याने ती केबिन आता 'सर्व सदस्यांसाठी कक्ष' म्हणून खुली करण्यात आली आहे. पूर्वी काका साठे यांनी वापरलेली ही केबिन आता नव्या स्वरूपात झेडपी सदस्यांसाठी उपलब्ध झाली आहे.

सत्तांतरानंतर या केबिनची रंगरंगोटी करण्यात आली असून, त्यावर 'झेडपी सदस्य कक्ष' असा फलक लावण्यात आला आहे. या घडामोडींमुळे जिल्हा परिषदेत पुढील पाच वर्षे विरोधी पक्षनेतेपद नसणार, हे जवळपास स्पष्ट झाले आहे.


### पक्षनेतेपदाबाबत अद्याप अधिकृत निर्णय नाही



पालकमंत्र्यांच्या सूचनेनुसार सर्वसमावेशक यादी तयार करून पाठवण्यात आली आहे. अंतिम निर्णय त्यांच्याकडून घेतला जाईल. विरोधी पक्षनेतेपदाबाबत अद्याप कोणताही अधिकृत निर्णय झालेला नाही.'', सोलापूर जिल्हा परिषदेत 'विरोधकांविना सत्ता' अशी परिस्थिती निर्माण होत असून, यामुळे प्रशासनात गती येईल की लोकशाहीतील संतुलन बिघडेल, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.
**दीपक वैद्य,** अध्यक्ष जिल्हा परिषद सोलापूर

## अमृतवचन : जैन मुनी वीरसागर महाराज

### णमोकार महामंत्र हा श्रध्दा, भक्ती आणि समर्पणाची शिकवण



णमोकार महामंत्र हा केवळ एका व्यक्तीचा मंत्र नसून तो ८४ लाख मंत्रांचा राजा आहे. हा महामंत्र श्रद्धा, भक्ती आणि समर्पणाची शिकवण देतो. या मंत्रातील पंचरंग ध्वज हे पंचपरमेष्ठींचे द्योतक आहेत. जेव्हा आपण मनापासून या मंत्राचे ध्यान करतो, तेव्हा आपल्यातील कठोरता आणि अहंकार गळून पडतो व स्वभावात पवित्रता येते, असे प्रतिपादन जैन मुनीश्री वीरसागरजी महाराज यांनी केले.

वालचंद शिक्षण समूहाच्या नूतन प्रांगणात गुरुवारी 'आंतरराष्ट्रीय णमोकार महामंत्र दिवस' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. त्यावेळी मुनीश्री बोलत होते. उपस्थितांना मार्गदर्शन करताना णमोकार महामंत्राचे आध्यात्मिक रहस्य उलगडून सांगताना मुनीश्री म्हणाले, अरिहंत, सिद्ध, आचार्य, उपाध्याय आणि साधू या पंचपरमेष्ठींच्या ध्यानामुळे मनातील राग-द्वेष नष्ट होतात आणि जीवनाला योग्य दिशा मिळते. साधू पूर्ण अहिंसामय दृष्टीने जगाकडे पाहतात. त्यांच्या ठिकाणी सर्व जीवमात्रांबद्दल उपजतच क्षमेचा भाव असतो. ज्ञानदानासाठी उपाध्याय परमेष्ठींचे तर समाजाचे कल्याण व ताणतणाव दूर करण्यासाठी आचार्यांचे ध्यान करावे. सामुदायिक मंत्र पठणामुळे केवळ आपलेच नव्हे, तर वातावरणातील सर्व जीवजंतूंचे कल्याण होते. 'माझ्यासहित सर्व जीवांचे दु:ख दूर व्हावे' ही भावना जागृत केल्यास पाप कर्म घटून पुण्यकर्माचा उदय होतो, असेही त्यांनी आवर्जून सांगितले. या मंगलमयी वातावरणात आणि सामुदायिक मंत्र पठणाने आंतरराष्ट्रीय णमोकार महामंत्र दिवसाची उत्साहात सांगता झाली.



## विवेक विचार मंचतर्फे शालेय साहित्य वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ एप्रिल-**

सम्राट चौक येथील कर्मवीर भाऊराव पाटील रयत शिक्षण अंतर्गत रावजी सखाराम हायस्कूल येथे विवेक विचार मंचतर्फे शालेय साहित्य वाटप नगरसेवक बिज्जू प्रधाने यांच्या हस्ते करण्यात आले.

याप्रसंगी जिल्हा संयोजिका आश्विनी चव्हाण, कार्यकारणी सदस्य दशरथ वडतीले, अनिकेत प्रधाने, रावजी सखाराम हायस्कूलचे प्राचार्य भारत केत शहर संयोजक सिद्धांत बाबा बाबरे आदी मान्यवर उपस्थित होते. प्रारंभी कर्मवीर भाऊराव पाटील आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. या कार्यक्रमात हायस्कूल आणि प्राथमिक शिक्षक वर्ग कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन गजानन गोरे यांनी केले. आभाररमेश वडवराव यांनी मानले.

# सोलापूरच्या माहितीपटाची आंतरराष्ट्रीय कामगिरी

## 'पुरुष पण भारी देवा'ला इंटरनॅशनल फिल्म फेस्टिवलमध्ये विशेष गौरव

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ एप्रिल-**

'पुरुष पण भारी देवा'या माहितीपटाने अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवांमध्ये आपली छाप उमटवत सोलापूर शहराचे नाव उज्ज्वल केले आहे. नुकत्याच मुंबई येथे पारंबी प्रोडक्शन आयोजित चौथ्या इंटरनॅशनल फिल्म फेस्टिवलमध्ये या माहितीपटाला स्पेशल मेन्शन डॉक्युमेंटरी हा सन्मान मिळाला आहे.

या महोत्सवात देश-विदेशातील तब्बल १२२ लघुपटांचा सहभाग होता. प्राथमिक फेरीचे परीक्षण कल्पेश राणे यांनी केले, तर अंतिम फेरीचे परीक्षण सुप्रसिद्ध कास्टिंग दिग्दर्शक व चित्रपट दिग्दर्शक रोहन मापुस्कर यांनी केले. तसेच आता थांबायचं नाय या चित्रपटातील अभिनेते किशोर बच्चाव यांची प्रमुख उपस्थिती लाभली होती.



या माहितीपटामध्ये आयुष्यातील विविध परिस्थितींमध्ये कणखर राहणाऱ्या पुरुषाच्या जीवनातील संघर्ष, जबाबदाऱ्या आणि त्याच्या मनातील भावना व संवेदनशीलता प्रभावीपणे मांडण्यात आली आहे. कुटुंबासाठी झटणाऱ्या पुरुषाची सामाजिक भूमिका अधोरेखित करतानाच स्त्री-पुरुष समानतेचा संदेशही या माहितीपटातून देण्यात आला आहे. या माहितीपटाची संकल्पना, लेखन व निर्मिती ऋत्विज चव्हाण यांनी केली असून दिग्दर्शन सचिन जगताप यांनी केले आहे. निवेदन व संहिता पुनर्लेखन श्रुती कुलकर्णी-पात्रुडकर यांनी केले आहे. छायाचित्रण संदीप चौहान व निरंजन राऊळ यांनी केले असून ख व्हिडीओ व इफेक्ट्स प्रमोद बंडीवार यांनी साकारले आहेत.

या माहितीपटाने वाराणसी इंटरनॅशनल फिल्म फेस्टिवलमध्ये दोन पुरस्कार मिळवले असून, इंडियन सिनेमा फेस्टिवल (बंगळुरू), इंटरनॅशनल आर्ट फिल्म फेस्टिवल, पुणे इंटरनॅशनल फिल्म फेस्टिवल आणि नवरंग नॅशनल फिल्म फेस्टिवलमध्ये 'बेस्ट डॉक्युमेंटरी'सह अनेक सन्मान प्राप्त केले आहेत. वेगळ्या विषयामुळे हा माहितीपट प्रेक्षकांच्या पसंतीस उतरत असल्याचे निर्माते ऋत्विज चव्हाण यांनी सांगितले.

# श्रीमंत मानाचा कसबा गणपती मंडळातर्फे खा.डॉ.प्रा.ज्योती वाघमारे यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ एप्रिल-**

श्रीमंत मानाचा कसबा गणपती मंडळाच्या वतीने नूतन राज्यसभा खासदार डॉ. ज्योती वाघमारे यांचा विजयालक्ष्मी बाळासाहेब मुस्तारे यांच्या हस्ते सत्कार सोहळा उत्साहात पार पडला. मंडळाच्या वतीने शाल, श्रीफळ, गणपतीची प्रतिमा व पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला.

यावेळी कसबा गणपती मंडळाचे ट्रस्टी अध्यक्ष सोमनाथ भोगडे, उपाध्यक्ष प्रकाश वाले, श्री सिद्धेश्वर यात्रेचे प्रमुख मानकरी राजशेखर हिरेहब्बू नगरसेवक अमोल शिंदे मल्लिनाथ खुने, केदार मेंगाणे, मल्लिनाथ मसरे, गुरुलिंग समाणे, शिवशंकर कोळकूर, बिप्पीन धुम्मा, शिवानंद बुगडे, रामचंद्र जोशी, आप्पासाहेब बिराजदार, अमित गुंगे, नागनाथ मेंगाणे, प्रविण वाले, पुष्कराज मेत्री, आनंद मुस्तारे, जगदीश हिरेहब्बू, अनिल मसरे, लक्ष्मण भाईकट्टी, गुरुशांत मोकाशी, इरप्पा राजमाने यांच्यासह मंडळाचे पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



या प्रसंगी बोलताना डॉ. वाघमारे यांनी मंडळाच्या कार्याचे विशेष कौतुक करत, ''कसबा गणपती मंडळ हे केवळ धार्मिक परंपरा जपणारे नसून समाजसेवेच्या विविध उपक्रमांद्वारे नागरिकांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवणारे एक आदर्श उदाहरण आहे,'' असे गौरवोद्गार काढले.

# पर्यावरण रक्षणासाठी सोसायटीमधील उद्यानांचे अस्तित्व राखण्याची आवश्यकता

## महापालिकेकडून आरक्षित उद्यानांचे सर्वेक्षण गरजेचे !

सोलापूर शहर झपाट्याने वाढत आहे. नवीन सोसायट्या, अपार्टमेंट्स आणि निवासी नगरे उभी राहत असताना शहर नियोजनाच्या दृष्टीने उद्यानांसाठी राखीव जागा ठेवणे ही अत्यंत महत्त्वाची अट आहे. बांधकाम परवाना घेताना या उद्यानांचे आरक्षण ठेवणे बंधनकारक असते. मात्र, प्रत्यक्षात या नियमांची अंमलबजावणी कितपत होते, हा प्रश्न आज गंभीर बनला आहे. शहरातील अनेक भागात उद्यानासाठी राखीव जागा असूनही ती केवळ कागदावरच अस्तित्वात आहे. काही ठिकाणी ही उद्याने पूर्णपणे ओसाड पडलेली दिसतात.

गवत, झाडे, पायवाटा, बसण्याची व्यवस्था यापैकी काहीच नाही. परिणामी, नागरिकांना मिळायला हवी असलेली हरित जागा माळरानात परिवर्तित झाली आहे. ही केवळ प्रशासनाची उदासीनता नसून नागरिकांच्या हक्कांवरच गदा आणणारी बाब आहे.

अधिक चिंताजनक बाब म्हणजे काही ठिकाणी उद्यानासाठी राखीव असलेल्या जागेवर सर्रास अतिक्रमण झाले आहे. ही स्थिती शहर नियोजनाच्या नियमांना उघडपणे हरताळ फासणारी आहे. उद्यानाच्या नावाखाली जागा राखून प्रत्यक्षात व्यावसायिक किंवा निवासी वापरासाठी तिचा गैरवापर होतो, हे गंभीर आहे. महापालिका प्रशासनाने या प्रकरणांकडे तातडीने लक्ष देणे अत्यावश्यक आहे. केवळ नियम बनवून चालत नाही, तर त्यांची कठोर अंमलबजावणीही तितकीच महत्त्वाची आहे. संबंधित अपार्टमेंट आणि सोसायटी धारकांना नोटिसा बजावून उद्यान विकसित करण्यास भाग पाडले पाहिजे. ज्या ठिकाणी अतिक्रमण झाले आहे, तेथे कारवाई करून जागा मोकळी करून घेणे गरजेचे आहे.यासोबतच, विकसित झालेल्या उद्यानांचा योग्य वापर होतोय का, यावरही लक्ष ठेवणे आवश्यक आहे.

अनेक वेळा उद्याने तयार केली जातात, पण देखभाल न झाल्यामुळे ती पुन्हा ओसाड होतात. नागरिकांच्या सहभागातून या उद्यानांचे संवर्धन करण्यासाठी 'अडॉप्ट अ गार्डन' सारख्या योजना राबवता येतील. शहराच्या वाढत्या प्रदूषणाच्या पार्श्वभूमीवर उद्याने ही केवळ सौंदर्याची नव्हे, तर आरोग्याची गरज आहेत. लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि नागरिकांना खुली हवा, व्यायाम आणि विश्रांतीसाठी ही ठिकाणे अत्यंत महत्त्वाची आहेत. पर्यावरण रक्षणासाठी ही उद्याने गरजेची आहेत. त्यामुळे उद्यानांचे अस्तित्व आणि त्यांचा दर्जा टिकवणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे. आज गरज केवळ जागृतीची नव्हे, तर ठोस कृतीची आहे. सोलापूर शहरात सोसायटी, अपार्टमेंट, विविध नगरांतर्गत उद्यानांसाठीच्या आरक्षित जागा किती ? त्या विकसित आहेत किंवा नाहीत ? या संदर्भात तत्काळ माहिती संकलनाची गरज आहे.

सोलापूर महापालिकेने तातडीने सर्व आरक्षित उद्यानांची पाहणी करून, त्यांचे सर्वेक्षण जाहीर करावे. नियमभंग करणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी आणि प्रत्येक उद्यान नागरिकांसाठी खुले व सुस्थितीत ठेवावे. अन्यथा उद्यानाचे आरक्षण






ही संकल्पना केवळ कागदावरच राहील आणि शहर हरिततेपासून वंचित राहील.

महापालिका उद्यान विभागाने शहरातील विविध सोसायटी व अपार्टमेंटमध्ये स्वच्छ उद्यान स्पर्धा आयोजित करणे ही काळाची गरज आहे. यामुळे नागरिकांमध्ये स्वच्छता, हरित संवर्धन आणि जबाबदारीची भावना वाढीस लागेल.

उत्तम देखभाल, वृक्षसंवर्धन आणि नागरिकांचा सहभाग यावर आधारित निवड करावी. विजेत्या सोसायट्यांना पारितोषिक व सन्मान देऊन प्रोत्साहन द्यावे. यातून ओसाड उद्यानेही विकसित होण्यास चालना मिळेल. अशी स्पर्धा शहराला अधिक हिरवे, सुंदर आणि निरोगी बनविण्यास हातभार लावेल. विशेष म्हणजे महापालिकेतील आता नव्या कारभाऱ्यांनी याकडे गांभीर्याने लक्ष देऊन प्रशासनाकडून आवश्यक ती कार्यवाही करून घेण्याची गरज आहे.



# दिव्य णमोकार महामंत्राच्या गजराने दुमदुमला उमाबाई श्राविका विद्यालयाचा परिसर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ एप्रिल-**

शिक्षण क्षेत्रात अग्रेसर असणाऱ्या श्राविका संस्थानगर येथील उमाबाई श्राविका विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात विश्व णमोकार महामंत्र दिनाचे औचित्य साधून सर्व विघ्नविनाशक व सुख-शांती प्रदाता दिव्य णमोकार महामंत्राच्या सामूहिक पटणाने सारा परिसर दुमदुमदुमून निघाला.

या मंगलमय कार्यक्रमाची सुरुवात विश्ववंदनीय श्री १००८ भगवान महावीर स्वामींच्या प्रतिमेस पुष्पांजली समर्पित करून झाली. सहशिक्षक अनंत बळ्ळे यांनी आपल्या प्रास्ताविकेतून संपूर्ण विश्वाला अहिंसा, अपरिग्रह, साद्वाद व अनेकांताच्या माध्यमातून सुख, शांती व समृद्धीचा मार्ग प्रशस्त करणाऱ्या भगवान महावीरांच्या अजरामर तत्वांवर व त्यागमय जीवनावर प्रकाश टाकला. जीवनात जर उत्कर्ष साधायचा असेल तर मनःशांती व एकाग्रता अत्यंत महत्त्वाची असून ती मंत्राद्वारे कशी साधता येते यावर त्यांनी अत्यंत सुंदर असे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन प्रदान केले. आज प्रशालेतील सर्व विद्यार्थी व विद्यार्थिनी तसेच संपूर्ण शिक्षक, शिक्षिका या कार्यक्रमांमध्ये उत्साहाने सहभागी झाला होता. प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयातील १५०० विद्यार्थ्यांनी अत्यंत भक्तीमय वातावरणात सुस्वर व तालासुरात ५१ हजार वेळा दिव्य णमोकार महामंत्राचे पठण करून सारा परिसर निनादून सोडला. शरीर, मन व आत्म्याच्या शुद्धतेसह मंगलमय व पावन णमोकार मंत्राच्या मंत्रोच्चारणाची अद्भुत शक्ती यावेळी प्रत्येक जण अनुभवत होता. प्रशालेचा सारा परिसर पंचरंगी ध्वजेने व हार फुलांनी सुशोभित करण्यात आला होता.

या कार्यक्रमाप्रसंगी प्रशालेच्या वरिष्ठ मार्गदर्शिका दीप्ती शहा, प्राचार्य सुकुमार मोहोळे, उपमुख्याध्यापिका अश्विनी पंडित, पर्यवेक्षक बाळासाहेब पौळ आदी उपस्थित होते. आकर्षक व मनोहारी फलक लेखन कलाशिक्षक श्री प्रवीण कंदले यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी माधवी खोत, सोनल आळंद, प्रिती वऱ्हाडे, सुहास छंचुरे, वैभव बारडकर यांनी परिश्रम घेतले

# अनिता फौंडेशनच्यावतीने अन्नदान



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ एप्रिल-**

अनिता फौंडेशन या सामाजिक संस्थेची अधिकृत स्थापना करण्यात आली. समाजातील वंचित, उपेक्षित व गरजू घटकांच्या उन्नतीसाठी ही संस्था कार्य करणार असल्याची माहिती संस्थापकांकडून देण्यात आली. संस्थेच्या स्थापनेनिमित्त सिद्धेश्वर मंदिर परिसरात भिक्षेकरी, वृद्ध, अपंग आणि गरजू नागरिकांना अन्नदान करण्यात आले. या उपक्रमांतर्गत सुमारे १०० गरजू व्यक्तींना भोजन देऊन त्यांच्या अन्नाची गरज भागवण्याचा छोटासा प्रयत्न करण्यात आला.

अनिता फौंडेशन समाजातील विविध प्रश्नांवर काम करत गरजू व्यक्तींना आधार देण्यासोबतच त्यांना स्वावलंबी बनवण्यासाठी प्रयत्न करणार आहे. महिला सक्षमीकरण, युवक-युवती मार्गदर्शन, विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक मदत, तसेच अबालवृद्धांच्या कल्याणासाठी विविध उपक्रम राबविण्याचा संस्थेचा मानस आहे.

संस्थेचा मुख्य उद्देश म्हणजे समाजातील प्रत्येक व्यक्तीचे दुःख कमी करून त्यांना सन्मानाने जगता यावे यासाठी मदत करणे हा आहे. भविष्यात आरोग्य शिबिरे, शैक्षणिक साहित्य वाटप, रोजगार मार्गदर्शन, आणि आपत्तीग्रस्तांना मदत असे विविध सामाजिक उपक्रम राबविण्याचे नियोजनही संस्थेकडून करण्यात येत आहे.

या अन्नदान कार्यक्रमास अनिता झेंडेकर, संस्थेचे अध्यक्ष किशोर झेंडेकर, सचिव मलेशम कारमपुरी, सदस्य गणेश भोईटे, रुपाली झेंडेकर, विजय सांबळे आदी मान्यवर उपस्थित होते.

# आपला जिल्हा

**सोलापूर तरुण भारत**, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## शिवसेना (ठाकरेगट) जिल्हाप्रमुखपदी संभाजी शिंदे

**पंढरपूर, दि ९ एप्रिल-**

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे ) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या आदेशानुसार सोलापूर जिल्ह्यातील पक्ष पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या जाहीर करण्यात आल्या आहेत. त्यानुसार सांगोला, पंढरपूर व मंगळवेढा या शिवसेना सोलापूर जिल्हा प्रमुख पंढरपूर विभागासाठी संभाजी शिंदे यांची पुनःश्च निवड करण्यात आली.

आहे. शिवसेना पक्ष विभागणीनंतर अनेक ठिकाणी पक्ष संघटना विस्कळीत झाली आहे. असे असताना, जिल्हाध्यक्ष संभाजी शिंदे यांनी मात्र ठाकरे घराण्याशी आपली निष्ठा कायम ठेवली. विरोधी पक्षांकडून आलेल्या विविध ऑफर आणि आमिषांना



धुडकावून लावत त्यांनी पक्षाशी असलेली बांधिलकी ढळू दिली नाही. जिल्ह्यात अनेक भागांत पक्षाची धुरा एकाकीपणे सांभाळत त्यांनी कार्यकर्त्यांना एकत्र ठेवण्याचे काम केले. कठीण काळातही पक्षाशी प्रामाणिक राहून संघटन मजबूत करण्यासाठी त्यांनी घेतलेल्या मेहनतीची दखल घेत पक्षश्रेष्ठींनी त्यांच्यावर पुन्हा विश्वास दाखवला आहे. दरम्यान संभाजी शिंदे यांच्या पुनर्नियुक्तीमुळे सांगोला, पंढरपूर आणि मंगळवेढा भागातील शिवसैनिकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पक्ष संघटना अधिक बळकट होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. संभाजी शिंदे यांनी जिल्हाप्रमुखपदाची धुरा सांभाळत असताना तीन टर्म पंचायत समिती सदस्यपद भूषविले आहे. तसेच विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीमध्ये सदस्य म्हणून देखील सध्या ते काम पाहत आहेत.



### महत्त्वाचे...



## रामलिंगेश्वर यात्रेची जल्लोषात सांगता

**द. सोलापूर, दि. ८ एप्रिल-**

श्रीक्षेत्र तीर्थ (ता. द. सोलापूर) येथील श्री रामलिंगेश्वर यात्रा भक्तिमय वातावरणात व प्रबोधनात्मक डफावरील गाण्यानी, महाप्रसाद भोजनानी वैभवात संपन्न झाली. रात्री आठ वाजता मिरवणूकीला प्रारंभ होऊन अकरा वाजेपर्यंत शोभेच्या दारूकामाच्या आतश बाजीने, मलकारसिद्ध झाँज पथकाच्या अदाकारीने पालखी मिरवणुकीत रंगत आणली. नंदिध्वज मिरवणूक शिस्तबद्ध झाली. या वर्षी गावाकऱ्यांच्या सहयोगाने पंचकमिटीने मंदिरासमोर फुलझाडे लावून आकर्षक पद्धतीने सजावट केली होती.वळसंग येथील सदभक्त चनशेट्टी काकांनी कट्टा बांधण्यासाठी मोफत सिमेंट गट्टू मंदिर समितीला दिले. पालखी मिरवणूकीला भाविक खूप मोठ्या संख्येने उपस्थित होते. पालखी मिरवणूकीने यात्रेची सांगता झाली.



## शेटफळच्या रणजीत पोळची पुणे शहर पोलिसपदी निवड

**जेऊर, दि.९ एप्रिल-**

शेटफळ तालुका करमाळा येथील रणजीत सुधीर पोळ यांची पुणे शहर पोलीसपदी निवड झाल्याबद्दल ग्रामस्थांच्या वतीने सन्मान करण्यात आला. पोळ याचे प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषद शाळा शेटफळ येथे, माध्यमिक शिक्षण भारत हायस्कूल जेऊर व उच्च माध्यमिक शिक्षण यशवंतराव चव्हाण महाविद्यालय करमाळा येथे झाले आहे अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून संघर्ष वाटका वाटचाल करत जिद्द चिकाटी आणि प्रयत्नाच्या जोरावर त्याची पुणे शहर पोलीसपदी निवड झाली आहे. त्याच्या या यशाबद्दल ग्रामस्थांच्यावतीने शेटफळ येथील शिवस्मारकासमोर त्याचा व वडील सुधीर पोळ यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी बापूराव नाईकनवरे महाराज गजेंद्र पोळ सत्यवान लबडे, रोहित घोगरे यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी माजी सरपंच मुरलीधर पोळ, विकास गुंड, साहेबराव पोळ, दशरथ लबडे, राजाभाऊ रोंगे, अशोक घोगरे, संतोष पोळ, शिवाजी पोळ, शंकर पोळ सुहास पोळ, प्रताप पोळ, बाबुराव चोरगे, राजेंद्र पोळ, विशाल पोळ, सचिन पोळ, महेश पोळ, किरण पोळ, नानासाहेब पोळ, बापूराव पोळ, चेतन पोळ, सुंदरदास पोळ आदी उपस्थित होते.



## संघटन सृजन अभियानामधून बार्शीत काँग्रेस पक्षाच्या पदाधिकाऱ्यांसोबत संवाद

**बार्शी, दि.९ एप्रिल-**

काँग्रेस पक्षाची संघटना बूथ स्तरापर्यंत मजबूत करण्याच्या उद्देशाने अखिल भारतीय काँग्रेस कमिटी व महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्यावतीने हे अभियान राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमास आयसीसीचे निरीक्षक देबासिस पटनायक, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सचिव तथा निरीक्षक प्रा. यशराज पारखी, ॲड. भाऊसाहेब आजबे तसेच जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष सातलिंग शटगार यांची प्रमुख उपस्थिती लाभली. श्री. शटगार यांनी बार्शी शहराध्यक्ष विजय साळुंके यांनी मागील नगरपालिका निवडणुकीत उत्तम प्रकारे काम करीत बुथ स्तरापासून कार्यकर्ते जोडणे, काँग्रेस पक्षाचे विचार तळागाळापर्यंत पोहोचवण्यासाठी सर्वांना सोबत घेऊन प्रयत्न केले आहेत. आगामी काळात सर्व काँग्रेस पदाधिकारी यांनी एकजुटीने काम करुन सर्वसामान्य तरुण, शेतकरी, बेरोजगार, कष्टकरी वर्गातील जनतेसाठी काम करावे तसेच आगामी निवडणुकासाठी सज्ज राहून काँग्रेस पक्षाचे उमेदवार निवडून आले पाहिजेत, अशी अपेक्षा व्यक्त केली. यावेळी बार्शी शहर काँग्रेस कमिटीचे शहराध्यक्ष विजय साळुंके, तालुकाध्यक्ष सतीश पाचकुडवे, वरिष्ठ जिल्हा उपाध्यक्ष जुगल किशोर तिवाडी, युवक विधानसभा अध्यक्ष निखील मस्के, अल्पसंख्यांक जिल्हाध्यक्ष वसीम पठाण, युवक काँग्रेस शहराध्यक्ष संतोष शेट्टी, ओबीसी तालुकाध्यक्ष रमेश खांडेकर, महिला तालुकाध्यक्ष रंजना साळुंके, शहराध्यक्ष सोनाली जगझाप, बप्पा सुतार, ॲड. योजना घोलप, रचना साळुंके, विनोद साळुंके आदी उपस्थित होते.

## साहेब... माझे बिल काढू नका, आम्ही चंद्रभागेचे पाणी शुध्द केलेले नाही

### ● चंद्रभागा जलशुध्दीकरणासाठी महर्षी वाल्मिकी संघाचे अनोखे आंदोलन ●

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.९ एप्रिल -**

मंत्र्यांचे दौरे असल्यावर, आठ एकादशी व चार यात्रा कालावधीतच मी चालू असते किंवा बिल काढण्याच्या दोन दिवस अगोदरच मी सुरू असते, इतरवेळी मात्र मी कायम बंदच असते त्यामुळे साहेब माझ्या चंद्रभागा जलशुद्धीकरणाचे कामाचे बील काढू नका, कारण आम्ही चंद्रभागेचे पाणी शुध्द केलेले नाही. अशा आशयाचा डिजीटल फलक चंद्रभागेच्या पात्रात जलशुद्धीकरणासाठी उभारण्यात आलेल्या सेबर टेक्नॉलॉजीच्या मशिनरीवर लावण्यात आलाय.

येथील महर्षी वाल्मिकी संघाचे वतीने हे अनोखं आंदोलन सुरू केले आहे. आमची बहिण चंद्रभागा, भाऊ भक्त पुंडलिकराया दुर्गंधीच्या साम्राज्यात, प्रदुषणाच्या विळख्यात कायमच असतात, हे विदारक चित्रं प्रत्यक्ष मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, पालकमंत्री, खासदार, आमदारांनी येऊन बघावे. म्हणजे दुध का दुध आणि पाणी का पाणी होऊन जाईल अशी उद्विग्न प्रतिक्रिया व्यक्त करत संघाचे संस्थापक अध्यक्ष गणेश अंकुशराव व त्यांच्या सहकाऱ्यांनी संबंधित मशिनरीवर चढून जोरदार घोषणाबाजी केली. अंकुशराव म्हणाले, आजपर्यंत या मशिनरी बसवलेल्या ठेकेदाराचे साडेपाच कोटी बिल शासनाने अदा केलेय, एकुण २४ ते २८ कोटींचे आणखी बील संबंधित ठेकेदारांवर शासनाकडून उधळण्यात येणार आहे. या ठेकेदारावर एका मंत्र्याचा वरदहस्त असल्याने भक्त पुंडलिकरायाच्या समोरंच पवित्रं चंद्रभागेच्या पात्रात ही पत्र्याची बिनकामाची डबडी उभारून शासनाला कोट्यावधीचा गंडा घालण्याचं महापातक चंद्रभागेच्या जलशुद्धीकरणाचे नावाखाली केले जात आहे. ठेकेदाराच्या व या मशिनरीच्या जलशुद्धीकरण कामाची शहानिशा केली तर फक्त एकादशी, यात्रा कालावधीत व मंत्री महोदयांचे दौरे असतात तेंव्हाच या मशिनरी सुरु केल्या जातात. इतरवेळी कायम बंद असतात, मग यासाठीचे कोट्यावधी रूपयांची बीलं शासनाने का द्यावी? एकीकडं शासनाच्या तिजोरीत खडखडाट आहे, पंढरपूर नगरपरिषदेची आर्थिक परिस्थिती सुध्दा नाजूक आहे असे बोलले जाते, आणि त्यामुळे पंढरीतील कित्येक प्रश्न प्रलंबित आहेत. इथं विठुरायाच्या समोरंच सेबर टेक्नॉलॉजी मशिनरीजच्या माध्यमातून कुंपनच शेत खातेय, कोट्यावधी खर्च करून पांढरा हत्ती पोसला जातोय.



**सेबर टेक्नॉलॉजीच्या या मशिनरी भंगारात घालून टाकू :** शासनाने जर यासंदर्भात तातडीने चौकशी लावुन कोट्यावधीचं घबाड घशात घालणाऱ्या ठेकेदारावर व त्याला साथ देणाऱ्या शासनातीलंच काही दलालांना कडक शासन केले नाही तर आम्ही स्वस्थ बसणार नाही, चंद्रभागेच्या पात्रात मोठे जनआंदोलन उभारून सबंध महाराष्ट्राचे लक्ष या भ्रष्टाचाराकडं वेधून घेऊ आणि प्रसंगी सेबर टेक्नॉलॉजीच्या या मशिनरी भंगारात घालून टाकू, यावेळी जर कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला तर याला सर्वस्वी प्रशासन व शासन जबाबदार राहील.

**- गणेश अंकुशराव,** संस्थापक अध्यक्ष महर्षी वाल्मिकी संघ

## मावडीकरांची ४० वर्षांपासून सनई नगारा वादन सेवा

- दुसरी पिढी सेवेत
- स्वामी समर्थ पुण्यतिथी महोत्सवात रोज पहाटे सुरेल सूर पडतात कानी

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ९ एप्रिल-**

श्री दत्त गुरुचे अवतार श्री स्वामी समर्थ महाराज यांचा १४८ वा पुण्यतिथी महोत्सव वटवृक्ष श्री स्वामी समर्थ महाराज मंदिर येथे चालू आहे.

यामध्ये पहाटे पाच वाजता काकडारती नंतर सुम धुर सनई चौघड्याचे स्वर कानी पडतात. वटवृक्ष स्वामी समर्थ महाराजांच्या दरबारात पुण्यतिथी महोत्सवात गेल्या ४० वर्षापासून मावडीकरांची दुसरी पिढी सनई चौघडा वादनाची सेवा सादर करीत अक्कलकोट वासीयांची स्वामी भक्तांची पहाट अविस्मरणीय करत आहेत. सनईवादक मावडीकर हे १९८७ ला सोलापुर येथे काही कामानिमित्त आले होते. तेव्हा ते तीर्थक्षेत्र अक्कलकोट येथे स्वामी समर्थ महाराजांच्या दर्शनासाठी आले. तेव्हा वटवृक्ष स्वामी समर्थ देवस्थानचे तात्कालीन विश्वस्त चेअरमन स्व. बाळासाहेब इंगळे यांची भेट झाली. त्या भेटीत दोघांचे संभाषण होऊन मावडीकर यांना स्वामी समर्थांच्या पुण्यतिथी उत्सवात सनई चौघडा वादनाची सेवा करण्याबाबत बोलणे झाले. १९८७ ला तारद्वारे स्वामीच्या दरबारात सनई चौघडा वादनासाठी आमंत्रित करण्यात आले. सध्या मावडीकर यांची दुसरी पिढी गणेश मावडीकर पुणे हे चौघडा वादनाचे काम करत आहेत. त्यांच्या सोबतीला सध्या स्वामींचे निस्सीम भक्त गोरख धेंडे (रा. पुणे) सनई वादनाची सेवा करीत अहेत.

**भक्तांची पहाट संस्मरणीय**
पहाटेच्या समयी सनई चौघडा वादनाचे समधुर स्वर कानी पडून अक्कलकोट वासीयांची व स्वामी भक्तांची पहाट संस्मरणीय होत असल्याची माहिती
**- महेश इंगळे,** अध्यक्ष वटवृक्ष स्वामी समर्थ देवस्थान



## छत्रपती संभाजी महाराजांचा पुतळा चव्हाणवाडीत शांततेत स्थलांतरित

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि. ९ एप्रिल-**

माढा तालुक्यातील खेलोबाचे अंजनगाव येथे काही दिवसांपूर्वी छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा बसविण्यावरून दोन समाजांमध्ये तणाव निर्माण झाला होता. या प्रकरणात प्रशासन व राजकीय पदाधिकाऱ्यांना हस्तक्षेप करावा लागला होता. काही समाजकंटकांच्या बोलण्यामुळे वाद वाढत गेला असून परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी तब्बल चार दिवस प्रयत्न करावे लागले. अखेर पुतळा स्थलांतरित करून वाद मिटवण्यात प्रशासनाला यश आले.

या घटनेनंतर अवघ्या चार दिवसांतच टेंभुर्णीपासून सुमारे चार किलोमीटर अंतरावर असलेल्या चव्हाणवाडी येथे छत्रपती संभाजी महाराजांचा छोटा पुतळा बसविण्यात आल्याची घटना समोर आली. सोमवारी (दि. ६) मध्यरात्री अज्ञात शिवप्रेमींनी अंगणवाडी शेजारील शासकीय मोकळ्या जागेत हा पुतळा बसविला होता. विशेष म्हणजे, या ठिकाणी कोणताही विरोध किंवा तणाव निर्माण झाला नव्हता. तरीही भविष्यात कोणताही वाद उद्भवू नये, यासाठी प्रशासनाने तातडीने पावले उचलली. घटनेची माहिती मिळताच पोलिस व महसूल विभागाचे अधिकारी घटनास्थळी दाखल झाले आणि ग्रामस्थांशी संवाद साधला. यानंतर टेंभुर्णी पोलीस ठाण्यात शांतता समितीची बैठक घेण्यात आली. बैठकीत शासकीय जागेवर कोणताही पुतळा उभारण्यासाठी आवश्यक कागदपत्रे व शासनाची परवानगी घेणे बंधनकारक असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले. त्यामुळे सध्या बसविण्यात आलेला पुतळा हलविण्याचा निर्णय घेण्यात आला. संबंधित पुतळा शेजारील सुभाष पंढरीनाथ चव्हाण यांच्या खाजगी जागेत शांततेत स्थलांतरित करण्यात आला. या निर्णयामुळे कोणताही वाद न होता गावात शांतता कायम राखण्यात यश आले. या संपूर्ण प्रक्रियेदरम्यान तहसीलदार संजय भोसले, पोलिस अधिकारी अंजना कृष्णा, परिविक्षाधीन अधिकारी राहुल आत्राम यांच्यासह ग्रामसेवक, पोलीस अधिकारी व स्थानिक पदाधिकारी उपस्थित होते. पुढील काळात अशा प्रकारच्या घटनांमध्ये कायदेशीर प्रक्रिया पाळण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.





## अकलूजमध्ये विकासकामांचा धडाका ९ कोटी ३० लाखांच्या कामांचे भूमिपूजन

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. ९ एप्रिल-**

शहराच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण पाऊल उचलत प्रभाग क्र. ११ आणि १२ मधील ९ कोटी ३० लाखांच्या सिमेंट काँक्रिट रस्ता व गटर बांधकामांच्या कामांचा शुभारंभ करण्यात आला.

या कामांचे भूमिपूजन नगराध्यक्ष रेश्माताई अडगळे व उपनगराध्यक्ष शिवतेजसिंह मोहिते पाटील यांच्या हस्ते पार पडले. या प्रसंगी नगरसेवक सयाजीराजे मोहिते पाटील, स्वाती फुले, शितल बनपट्टे, नाशिक सोनवणे तसेच लालासाहेब अडगळे, लखन गायकवाड, राजेंद्र फुले, डॉ. एकतपुरे, डॉ. शेटे, डॉ. सूर्यवंशी यांच्यासह दोन्ही प्रभागांतील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रभाग क्र. १२ मध्ये विजयसिंह मोहिते पाटील क्रीडा संकुल ते सुजयनगर १४ पर्यंत सिमेंट काँक्रिट रस्ता व गटर बांधकामासाठी ५ कोटी ५८ लाखांचा निधी मंजूर करण्यात आला असून या कामास आज सुरुवात झाली.

तसेच प्रभाग क्र. ११ मध्ये हॉटेल व्हेज ट्रीट ते ताम्हाणे कॉम्प्लेक्सपर्यंत सिमेंट रस्ता व गटर बांधकामासाठी ३ कोटी ७२ लाखांचा निधी खर्च करण्यात येणार असून या कामाचाही शुभारंभ करण्यात आला.

या विकासकामांमुळे नागरिकांना दर्जेदार रस्ते, सुलभ वाहतूक आणि सुधारित स्वच्छता सुविधा मिळणार आहेत. परिणामी परिसराच्या विकासाला अधिक वेग मिळणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

अकलूज शहराचा सर्वांगीण विकास हाच आमचा ध्यास असून, अशा पायाभूत सुविधांच्या कामांमुळे शहराच्या प्रगतीला नवी दिशा मिळत असल्याचा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

## चिखलठाण येथील कोटलिंग देवाच्या यात्रेची तयारी पूर्ण; आज छबिना मिरवणूक

**तभा वृत्तसेवा,**
**जेऊर दि.९ एप्रिल-**

करमाळा तालुक्यातील सर्वात मोठी समजली जाणारी चिखलठाण येथील कोटलिंग देवाच्या यात्रेची सर्व तयारी पूर्ण झाली असून शुक्रवारी १० एप्रिल रोजी सायंकाळी छबिना मिरवणूक होणार आहे

राज्यातील सोलापूर सातारा पुणे, नगर, धाराशिव जिल्ह्यातील हजारो भाविकांचे श्रद्धास्थान असणाऱ्या करमाळा तालुक्यातील कोटलिंग देवाची यात्रा चैत्री पौर्णिमेस कोटलिंग जोगेश्वरी विवाह सोहळ्यापासून सुरू झाली असून चैत्र कृष्ण अष्टमी म्हणजेच १० एप्रिल रोजी छबिना मिरवणूक संपन्न होत आहे. यात्रेसाठी पाळणे, प्रसाद , नारळ , खेळणी यासह विविध वस्तूची विक्री करणारे छोटे-मोठे व्यवसायिक विक्रेते यांनी आपली दुकाने थाटली आहेत. चिखलठाण कोटलींग मंदिर येथे तालुक्यातील यात्रेदरम्यान विविध ठिकाणाहून आलेल्या यात्रेकरूंना सुखकरपणे सर्व व्यवस्था व्हावी यासाठी आरोग्य, सार्वजनिक बांधकाम विभाग,महावितरण, राज्य परिवहन महामंडळ, पोलीस विभाग, पंचायत समिती,यात्रा समिती ग्रामपंचायत व ग्रामस्थांची यात्रा कालावधीत



जबाबदारी निश्चित करून कार्यवाहीच्या सचना दिल्या आहेत. यानुसार सर्व विभागांची तयारी पूर्ण झाली असून यात्रा सुरळीत पार पाडण्यासाठी नियोजन करण्यात आले आहे.यामध्ये यात्रा कालावधीत पुरेसा पोलिस बंदोबस्त, तैनात असेल तातडीच्या उपचारासाठी अँब्युलंस, प्रथमोपचार व आरोग्याच्या सुविधा उपलब्ध असतील तसेच यात्रेकरूंच्या सोयीसाठी राज्य परिवहन महामंडळाच्या वतीने जादा बस गाड्यांची व्यवस्था करण्यात आली करण्यात आली आहे. महावितरणच्या वतीने परिसरात पुरेशा प्रकाशनासाठी दिव्यांची व्यवस्था, यात्रासमीती व ग्रामपंचायतींच्या वतीने परिसरात स्वच्छता, स्वच्छ पाणीपुरवठ्याची सोय करण्यात आली आहे.

१० एप्रिल रोजी पहाटे पाच वाजल्यापासून या देवाच्या मानाच्या कावडी धार घालण्यास सुरुवात करतील, दिवसभर दंडवट, नवस फेडणे, देवदर्शन होऊन सायंकाळी साडेअकरा वाजता आरती होऊन छबिना मिरवणूक होणार. यात्रेपुर्वी वीस दिवसांपासून या देवाला तेल लावले जाते. तेंव्हापासून ससा-मासा, देव पारध, देव शिकारीला जाणे, कोटलींग जोगेश्वरी विवाह सोहळा आंबील पौर्णिमा उत्सव असे कार्यक्रम होतात. या कालावधीमध्ये मांसाहार करणे, शेती मशागतीची कामे, दाढी करणे, केस कापणे गादीवर झोपणे या गोष्टी या गावात पूर्णपणे बंद असतात. चैत्र अष्टमीला मुख्य छबिना मिरवणूक होते या दिवशी देवाच्या मानाच्या कावडी धार घालतात यानंतर दुसऱ्या दिवशी शेळी जत्रा नंतर बाजार व तेल उतरवणे असे कार्यक्रम होणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली आहे .

## ग्रामपंचायत निवडणुकीसाठी प्रभाग रचना कार्यक्रम जाहीर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि.९ एप्रिल-**

जानेवारी ते डिसेंबर २०२६ मध्ये मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायती, नव्याने स्थापित झालेल्या ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणूकीसाठी प्रभाग रचना कार्यक्रम जाहीर झाला आहे.

जिल्ह्यातील मंगळवेढा तालुक्यातील अचकदाणी, आगलावेवाडी, अजनाळे, अकोला, आलेगाव, बामणी, भोपसेवाडी, बुद्धेहाळ, बुरंगेवाडी, चोपडी, देवळे, धायटी, डिकसळ, डोंगरगाव, एखतपूर, गायगव्हाण, घेरडी, गौडवाडी, मंगेवाडी (ह.), हलदहिवडी, हंगीरगे, हणमंतगाव, हातीद, इटकी, जवळा, जुजारपूर, जुनोनी, कडलास, कमलापूर, कटफळ, खिलारवाडी, किडबिसरी, कोळे, लक्ष्मीनगर, लोणविरे, लोटेवाडी, महिम, महूद बु., मानेगाव, मंजरी, मेडशिंगी, मेथवडे, नराळे, नाझरे, निजामपूर, पाचेगाव बु., पारे, राजुरी, संगेवाडी, शिरभावी, सोमेवाडी, तरंगेवाडी, तीप्पेहळी, उदनवाडी, वझरे, शिवणे, वाकी घेरडी, वाणी चिंचाळे, वासूद, वाटंबरे, मंगेवाडी व बुरलेवाडी अशा एकूण ६२ ग्रामपंचायतींसाठी प्रारूप प्रभाग रचना तयार करण्यात आलेली आहे.

प्रारूप प्रभाग रचना संबंधित ग्रामपंचायतींच्या तलाठी कार्यालय व ग्रामपंचायत कार्यालय येथे नागरिकांच्या अवलोकनासाठी प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. या अनुषंगाने हरकती व सूचना सादर करण्याचा कार्यक्रम पुढील प्रमाणे आहे. प्रारूप प्रभाग रचनेवरील हरकती व सूचना तहसिलदार यांच्याकडे समक्ष सादर करण्याची अंतिम मुदत १३ एप्रिल, प्राप्त हरकती व सूचना १६ एप्रिल पर्यंत उपविभागीय अधिकारी यांच्याकडे सुनावणीसाठी सादर करण्यात येतील. उपविभागीय अधिकारी, मंगळवेढा यांच्याकडे सुनावणी २१ एप्रिल तरी संबंधित ग्रामपंचायतीतील नागरिकांनी प्रारूप प्रभाग रचना पाहून आपापल्या हरकती व सूचना निर्धारित मुदतीत सादर कराव्यात, असे आवाहन तहसिलदार बाळुताई भागवत यांनी केले आहे.